# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०७/२००७.** **दिनांक २९.०६.२००७**
**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- दुपारी २.३० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे शुक्रवार दिनांक २९ जून, २००७ रोजी आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-९८०८-२००७, दि. २२ जून, २००७ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. या पत्रात कळविण्यात आलेल्या विषयांऐवजी दुसऱ्या विषयांचा अजेंड्यात समावेश केला असल्याबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-९९०९८-२००७, दि. २५ जून, २००७ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा शुक्रवार दिनांक २९ जून, २००७ रोजी दुपारी २.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष
०२. मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग
०३. मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे
०४. मा.श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव
०५. मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर
०६. मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा
०७. मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर
०८. मा.श्री कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्डेय
०९. मा.सौ.सुमित्रा कैलास कोते

मा.श्री.भाऊसाहेब रा. वाकचौरे,
कार्यकारी अधिकारी.

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा. अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष,मा.श्री राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील, मा.श्री शैलेश श्रीहरी कुटे, मा.श्रीमती रिम्पल लोहिया,मा.श्री रमाकान्त गणेश कर्णिक, मा.डॉ.प्यारेलाल तिवारी यांनी दूरध्वनीद्वारे व मा.श्री समि खतिब यांनी फॅक्स पत्राद्वारे कळविले त्याची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१. श्रीगुरुपौर्णिमा उत्सव-२००७ मंडप उभारणेकामी आलेल्या निविदाबाबत.**

**निर्णय क्र.४५०** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी तर्फे श्री गुरुपौर्णिमा उत्सव २००७ शनिवार दिनांक २८/०७/२००७ ते सोमवार दिनांक ३०/०७/२००७ अखेर तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे.

या कामी मंदिर परीसरात खालील ठीकाणी मंडप उभारणे आवश्यक आहे.

**अ) मंडप ( रंगित सुशोभित कापड, प्लास्टीक ताडपत्री, मंडपाचे साईडनी वरिल बाजुस ३ फुटापर्यंत कापड**

**०१)मंदिर परीसरातील मंडप.**

| अ.नं. | (अ) मंडप तपशिल | चौरस फुट |
|---|---|---|
| ०१ | समाधी मंदिर उत्तर बाजू चावडी गेट ते नगरव्दार गेट<br>२८४`x २०` जाड कापडाचा उंची १८` फुट असलेला मंडप | ५६८०.०० |
| ०२ | समाधि मंदिर दक्षिण बाजु द्वारकामाई ते नगरद्वार गेट पर्यत. `१८ x ६००` उंची १८` असावी. | १०८००.०० |
| ०३ | श्री गुरुस्थान मंदिर (निंबवृक्षाच्या) पश्चिम बाजु ५६`x २०` दक्षिणोत्तर | ११२०.०० |
| ०४ | श्री गुरुस्थान मंदिर पुर्व बाजु ५९`x १८` दक्षिणोत्तर जाड कापडाचा पुरेशी उंची असलेला मंडप | १०६२.०० |
| ०५ | `श्री ` चे चावडी समोर ४०`x २५` | १०००.०० |
| ०६ | लेंडीबागेतील मंडप<br>अ) दत्त मंदिर मागील बाजु - ३२`X ४७`<br>ब) दत्त मंदिर समोरील बाजु -७४`X३७` | <br>१५०४.००<br>२७३८.०० |
| ०७ | समाधी मंदिरा समोरील स्टेज करीता<br>१) मेकअप रुम २२`x१०`<br>२) मेकअप रुम पत्रा १८` x१६` | <br>२२०.००<br>२८८.०० |
| ०८ | स्टेजवरील मंडप ३६` x २२` | ७९२.०० |
| ०९ | स्टेजच्या बाजुने मंडप १०` x १०` | १००.०० |
| १० | मेकअप रुम पार्टीशन ७०` x ८` | ५६०.०० |
| ११ | स्टेजसमोर मंडप ६०`x ४०` | २४००.०० |
| | **एकुण चौ. फुट.** | **२८२६४.००** |

**२) प्रसादालय परीसर व इतर ठिकाणचे मंडप.**

| | | |
|---|---|---|
| ०१ | प्रसादालय तिकीट काऊंटर समोर<br>जेवण रेलिंग पुर्व / पश्चिम बाजु १२२`X४२` | ५१२४.०० |
| ०२ | जेवण शेड पुर्व बाजु - ७०`x६०`= ४२००<br>- ४०'x२०'= ८०० | ५०००.०० |
| ०३ | प्रसादालय बुकींग काउंटर पश्चिम बाजू | |

| | | |
|---|---|---|
| | स्वयंसेवीसाठी कापडी मडपाचे पार्टीशन ४५`x२५` | ११२५.०० |
| ०४ | प्रसादालय उत्तर बाजू ३७` x २५` | ९२५.०० |
| ०५ | साईप्रसाद नं.२ समोर चौकशी कार्यालया<br>समोर १६` x १२` | १९२.०० |
| ०६ | पालखीसाठी निर्मळपिंप्री येथे ६०` x ४०`<br>व शिंगवे नाईक येथे ६०` x ४०` | २४००.००<br>२४००.०० |
| ०७ | हॉटेल संस्कृती समोर लस्सी वाटपासाठी २०`x १५ | ३००.०० |
| ०८ | व्हीआयपी साठी प्रसादालय हॉल नं.२मध्ये पार्टीशन ९९`x८` | ७९२.०० |
| ०९ | स्वयंसेवी पार्टीशन १५०`x १०` | १५००.०० |
| | **एकुण चौ. फुट** | **१९७५८.००** |
| | **एकुण चौ. फुट ( १+२) =** | **४८०२२.००** |

उपरोक्त प्रमाणे मंडप उभारणेकामी अंदाजे रु.१,५०,००० मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचे मंडप उभारणे कामी इकडील जा.नं.एसएसएस-वशी-बोधकाम-९५४६-२००७,दि.२०.६.२००७ अन्वये दि.२७.६.२००७ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार खालील ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले आहे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | झुरळे टेंन्ट,खैरी निमगाव |
| ०२ | शर्मा मंडप ॲण्ड डेकोरेटर्स,वैजापूर |
| ०३ | कैलास डेकोरेटर्स,श्री.पंडीतराव खरपुडे,अहमदनगर |
| ०४ | सांवता मंडप,राहाता |
| ०५ | कातुरे मंडप डेकोरेटर्स पुणे |
| ०६ | रोशनी मंडप,संक्रापूर |

विहित मुदतीत खालील ठेकेदारांनी आपल्या निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | झुरळे टेंन्ट,खैरी निमगाव |
| ०२ | कैलास डेकोरेटर्स,श्री.पंडीतराव खरपुडे,अहमदनगर |
| ०३ | सांवता मंडप,राहाता |
| ०४ | कातुरे मंडप डेकोरेटर्स पुणे |
| ०५ | रोशनी मंडप,संक्रापूर |

उपरोक्त प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात आल्या असता, चर्चा/ वाटाघाटीअंती निविदासादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेतील दर | | वाटाघाटीअंती देऊ केलेले दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | दर चौ.फुट | एकुण रक्कम रुपये | दर चौ.फुट | एकुण रक्कम रुपये |
| ०१ | झुरळे टेंन्ट,खैरी निमगाव | २.७५ | १,८०,०८२.०० | -- | १,५०,०००.०० |
| ०२ | कैलास डेकोरेटर्स,श्री.पंडीतराव खरपुडे, अहमदनगर | ६.०० | २,८८,१३२.०० | ३.७५ | १,८०,०८२.५० |
| ०३ | सांवता मंडप,राहाता | ५.३५ | २,५७,३५९.०० | ४.०० | १,९२,०८८.०० |
| ०४ | रोशनी मंडप,संक्रापूर | २.५६ | १,२३,२७८.०० | २.४० | १,१५,२५२.०० |
| ०५ | कातुरे मंडप डेकोरेटर्स पुणे | ८.०० | ३,८४,१७६.०० | -- | अनामत रक्कम न भरल्याने अपात्र |

यावर सविस्तर चर्चा होऊन, अ.नं.०४ चे निविदासादरकर्ते मे.रोशनी मंडप,संक्रापूर यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन,त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.०२.** **श्रीगुरुपौर्णिमा उत्सव-२००७ कलाकार कार्यक्रम ठरविणेबाबत.**

**निर्णय क्र.४५१** श्रीगुरुपौर्णिमा उत्सव २००७ हा दि.२८/०७/२००७ ते दि.३०/०७/२००७ अखेर तीन दिवस साजरा होणार आहे. त्यासाठी खालील कलाकारांनी व कीर्तनकारांनी श्रीगुरुपौर्णिमा उत्सव २००७ मध्ये कार्यक्रम व कीर्तन करणेस मिळावा म्हणून पत्र पाठविलेली आहेत. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे -

| **अ.नं.** | **कलाकार/ किर्तनकार नांव** | **कार्यक्रम तपशील** | **संख्या** | **मानधन** |
|---|---|---|---|---|
| ०१. | ह.भ.प.प्रा.डॉ.एन.आर.राजदेरकर, साईसदन,मिल कॉर्नर रोड, कोतवाल पुरा, औरंगाबाद-१, | कीर्तन कार्यक्रम | २ | संस्थान नियमानुसार |
| ०२. | ह.भ.प.गंगाधरबुवा व्यास, कीर्तनकार, साईसदन, बि.नं.१,तिसरा मजला, मढवी हायस्कुल जवळ, जुना आयरे रोड, डोंबिवली(पुर्व), जि.ठाणे | उत्सवाचे ३ दिवस कीर्तन सेवा. | २ | संस्थान नियमानुसार. |
| ०३. | ह.भ.प.मंदार गंगाधर व्यास बुवा, | तीन दिवस कीर्तन सेवा | ३ | संस्थान नियमानुसार मानधन. |
| ०४. | ह.भ.प.वैभव बुवा ओक, साईसदन १, ३ रा मजला, जुना आयरे रोड, डोंबीवली (पूर्व), मुंबई-४२१ २०१, | तीन दिवस कीर्तन सेवा | ३ | संस्थान नियमानुसार मानधन. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०५. | ह.भ.प.माधवबुवा तुकारामबुवा आजेगांवकर श्री केशवकृपा, संत दासगणू महाराज नगर, कारेगांव रोड, मु.पो.ता.जि.परभणी | तीन दिवस कीर्तन सेवा | ३ | संस्थान नियमानुसार मानधन. |
| ०६. | ह.भ.प.मनोहर वा कोकलेगांवकर, श्री सद्गुरु छाया, ३/३/१३९, चिखलवाडी, नांदेड-४३१ ६०१, मो.नं.९४२०६६७५४९/९४२२१८६२४९ | तीन दिवस कीर्तन सेवा | ३ | संस्थान नियमानुसार मानधन. |
| ०७. | डॉ.लक्ष्मीकांत सहकारी, प्लॉट नं.२३७ पांचाली बंगला,आचोले गांव, नालासोपारा(पुर्व),ठाणे | सुगम संगीत कार्यक्रम | ७-८ | रु.२०,०००/- ते २५,०००/- |
| ०८. | श्री विजय साखरकर,२/१०, दत्तनिवास चाळ,देविपाडा, बोरीवली(पू),मुंबई-४०० ०६६ | साई स्वर गीत संध्या किंवा साई स्वर नृत्योत्सव - साईगीतांचा भक्तिमय कार्यक्रम | १५ | रु. ११,०००/- |
| ०९. | श्री राजीव राज आदित्य, ६८, दिल्ली गव्हर्नमेंट ऑफिसर्स फ्लॅट, ग्रेटर कैलाश-१, न्यु दिल्ली फोन | भजन - साईगीत | ९ | येण्या-जाण्याचा प्रवासखर्च |
| १०. | श्री विनोद नाखवा, कलाविष्कार कलापथक, ठाणे(प), बी-५/२३, रुनवाल नगर, प्रताप सिनेमाजवळ, ठाणे-४००६०१(प), | दर्याचा दरारा -यात महाराष्ट्राची नृत्ये, कोळीनृत्ये इ. | ३० | येण्या-जाण्याचा प्रवासखर्च |
| ११. | श्री शेषनाथ शांताराम पावसकर, गीतरामायण परिवार, २५, नवरोजी सेठ स्ट्रीट, ठाकुरद्वार, मुंबई- | गीत रामायण / भक्तीसंगीताचा कार्यक्रम | १० | रु.०७,०००/- (मानधन व प्रवास खर्चासह) |
| १२. | आर.रेवती, एस.डी.ई., साई रेसिडेन्सी, फ्लॅट नं.३०२, प्लॉट नं. ८८, श्री नगर कॉलनी, हैद्राबाद- | कुचीपुडी नृत्य कार्यक्रम | ०८ | रु.१०,०००/- (मानधन व प्रवास खर्चासह) |
| १३. | कु.सुवर्णा भागवत, ज्ञानसदन, ३ रा मजला, १ ली अक्कलकोट लेन, खाडिलकर रोड, गिरगांव, मुंबई- | सोनपाऊले हा भक्तीमय सांस्कृति कार्यक्रम | ३५ | रु.३५,०००/- (यात नेपथ्य, लाइट,ध्वनी व प्रवासखर्च इ.) |
| १४. | डॉ.आचार्य व्ही.वाय, फौंडर & सेक्रेटरी, ३-४-१७५, राम मंदीर, टोबॅको बाजार, सिकंदराबाद- | कुचीपुडी नृत्य कार्यक्रम | १२ | रु. ०८,०००/- (मानधन व प्रवास खर्चासह) |
| १५. | श्री प्रफुल्ल गणपुले, अध्यक्ष, श्री नादमयी न्यास, अ १-१५/३०, यशोधन सहकारी गृहरचना संस्था मर्या. चिंतामणीनगर भाग-२, बिबवेवाडी, पुणे-४११ ०३७, | भजनांजली - साई भजनांचा कार्यक्रम | ७ | रु.१५,०००/- (मानधन व प्रवास खर्चासह) |
| १६. | श्री अनिल पाटनी, कोमल स्पर्श, जैन मंदिर रोड,कमाल का कुआ, भिलवाडा | भवाई कलश नृत्य कार्यक्रम | ४-५ | रु.१८,०००/- ( मानधन व प्रवास खर्चासह) |
| १७. | सौ.भावना पंत, श्री साई सुमिरन, प्लॉट नं. सी-९, फ्लॅट नं. II अपर्णा अपार्टमेंट-III, शालीमार गार्डन,साहिबाबाद, गाझियाबाद, (उ.प्र.) | साई भजन कार्यक्रम | ०५ | रु. १५,०००/- |
| १८. | श्री रविराज नासेरी, डी-७०२, सिल्व्हर टॉवर, ठाकुर कॉम्प्लेक्स, कांदिवली(पू) | साई भजन कार्यक्रम | १५ | रु.१,००,०००/- (गुरुपौर्णिमा-०६ कार्यक्रम दिला आहे.) |
| १९. | श्री अनिल हर्डीकर, ५७, नरसिंगाश्रम, हनुमान रस्ता, टिळक विद्यालयासमोर, विलेपार्ले(पूर्व),मुंबई-४०० ०५७ | भक्तीगीतांचा कार्यक्रम | ६-७ | मानधन अपेक्षा नाही, प्रवासखर्च रु.५,०००/- |
| २०. | श्री कमलेश बिछे, डी-२/१०, श्रृंगारी अपार्टमेंट, लक्ष्मीबाग सोसायटीजवळ, तळेगांव-दाभाडे, पुणे- | स्वरदा निर्मित स्वररंग - मराठी हिंदी गीतांचा कार्यक्रम. | १५ | रु.६०,०००/- (मानधन,प्रवासखर्च साऊंड सिस्टीम सहीत) |
| २१. | कमलेश हरिपुरी, डी-१४, आचार्य निवास, नेवी नगर, कुलाबा, मुंबई-०५ | भजन संध्या - कार्यक्रम | १० | रु.६०,०००/- |
| २२. | भुवनेश कोमकली, १४/१, भानुकुल, माताजी का रास्ता, देवास-४५५ ००१, | साई भजन कार्यक्रम | ७ | रु.५१,०००/- |
| २३. | श्री पारस सी जैन, शिर्डी, फोन नं.२५५२९१ मो.नं.९८२२५४६८१७ | साई भजन संध्या कार्यक्रम | ७ | मानधन अपेक्षा नाही. |
| २४. | श्री रविंद्र पिंगळे,संचालक, श्रृतीकंकण संगीत विद्यालय, प.पु.जंगलीदास माऊली तपोभुमी (सोमगिरी मठ), भोईगल्ली, येवला | साईभक्तीगीते, भावगीते, देशभक्तीपर गीते, निसर्ग गीते इ. | २० | रु. ३५,०००/- (भोजन, निवास व वाहन व्यवस्था) |
| २५. | श्री बी आर पोटभरे, सचिव, कलारंजन थिएटर्स, निवारा, कोजागिरी, कोपरगांव, | श्री साईबाबांचे जीवनावर आधारित श्री साईलिला कार्यक्रम | २६ | रु.२५,०००/- |
| २६. | पंडीत बिरजू महाराज, मुंबई | नृत्याचा कार्यक्रम | २० | निवास, भोजन व प्रवासखर्च इ. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | मिळणेबाबत. |
| २७. | सौ.सायली हिमांशु कुलकर्णी, फ्लॅट क्र.९, सुमेघाश्री सोसायटी, शिवदर्शन चौक, पर्वती, पूणे-४११ ००९, | भरतनाट्यम् व संतांचे निवडक अभंगावर नृत्य कार्यक्रम | ७ | रु. २५,०००/- |
| २८. | डॉ.पं.कमलाकर परळीकर, सरगम, विद्यानगर, परभणी-४३१ ४०१ | भक्ती गीत कार्यक्रम | ६ | रु.१८,०००/- (मानधन व प्रवासभाडेसह) |

उपरोक्तप्रमाणे अ.नं. ०१ ते ०६ यांनी उत्सवात किर्तन सेवा करण्याची व अ.नं. ०७ ते २८ यांनी श्री गुरुपौर्णिमा उत्सवात गायन/नृत्य इ. कार्यक्रम करणेची संधी मिळावी, अशी विनंती केलेली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे श्री गुरुपौर्णिमा उत्सवात कार्यक्रम आयोजित करण्यात यावे असे ठरले.

**अ) किर्तन कार्यक्रम-**

| अ.न. | वार | दिनांक | वेळ | किर्तनकाराचे नांव | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | शनिवार | २८.०७.२००७ | दुपारी ४.०० ते ६.०० | ह.भ.पं.गंगाधरबुवा नरहर व्यास | संस्थान नियमाप्रमाणे |
| ०२ | रविवार | २९.०७.२००७ | दुपारी ४.०० ते ६.०० | ह.भ.पं.गंगाधरबुवा नरहर व्यास | संस्थान नियमाप्रमाणे |
| ०३ | सोमवार | ३०.०७.२००७ | सकाळी १०.३० वाजता (गोपालकाला कीर्तन व दहीहंडी कार्यक्रम) | ह.भ.प.मनोहरबुवा बा कोकलेगांवकर | संस्थान नियमाप्रमाणे |

**ब) कलाकार कार्यक्रम**

| **अ.न.** | वार | दिनांक | वेळ | कलाकाराचे नांव | मानधन रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | शनिवार | २८.०७.२००७ | रात्रो ८.०० ते ९.०० व ९.३० ते १०.०० | विनोद नाखवा, कलाविष्कार कलापथक,ठाणे यांचा दर्याचा दरारा हा कार्यक्रम | १५,०००.०० |
| ०२ | रविवार | २९.०७.२००७ | दुपारी २.३० ते ४.०० | प्रफुल्ल गणपुले, जोस्ना गणपुले,पुणे यांचा भजनांजली साईभजनांचा कार्यक्रम | ११,०००.०० |
| | रविवार | २९.०७.२००७ | रात्रो ८.०० ते ९.०० | पारस जैन,शिर्डी यांचा साईभजन संध्या हा कार्यक्रम | ११,०००.०० |
| | रविवार | २९.०७.२००७ | रात्रो ९.३० ते १०.३० | रविंद्र पिंगळे, संचालक,श्रृतीकंकण संगीत विद्यालय, जंगलीदास माऊली तपोभूमी, येवला यांचा साईभक्तीगिते, भावगिते,देशभक्तीपर गिते कार्यक्रम | २५,०००.०० |
| ०३ | सोमवार | ३०.०७.२००७ | दुपारी ४.०० ते ५.३० | भुवनेश कोमकली,देवास यांचा साईभजन कार्यक्रम | ३१,०००.०० |
| | सोमवार | ३०.०७.२००७ | रात्रौ ८.०० ते ९.३० | राजीवराज आदित्य, नवी दिल्ली यांचा भजन साईगीत कार्यक्रम | ३१,०००.०० |

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**विषय नं.०३.** **श्रीगुरुपौर्णिमा उत्सव-२००७ करिता निमंत्रण पत्रिका छपाईकामी आलेले कोटेशन उघडून निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.४५२** श्री गुरुपौर्णिमा उत्सव २००७ हा दि.२८/०७/२००७ ते दि.३०/०७/२००७ अखेर साजरा होणार आहे. तह्यात व अजिव सभासदांना निमंत्रण पाठविण्यासाठी छापून घ्यावयाच्या निमंत्रण पत्रिका छपाईकामी १६ प्रेसकडून छपाई कोटेशन्स मागविण्यात आलेली होती. त्यापैकी खालीलप्रमाणे तीन प्रेसची छपाई कोटेशन्स प्राप्त झालेली आहे.

| **अ.नं.** | **कोटेशनधारकाचे नांव व पत्ता** |
|---|---|
| **०१.** | लक्ष्मी प्रिंटर्स,भगवती कोल्हार ता.राहाता, जि.अहमदनगर, |
| ०२. | निट प्रिंटस् ,डब्ल्यु-३६/सी-१,एम.आय.डी.सी.,अहमदनगर, |
| ०३. | त्रिमुर्ती फाईन आर्टस् प्रा.लि., जी-२६,एम.आय.डी.सी, उज्वल एजन्सीज मागे, सातपूर, नाशिक, |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात आले असता कोटेशन्सधारकांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| **अ.नं.** | **कोटेशनधारकाचे नांव व पत्ता** | **तपशील** | **नग** | **दर** | **शेरा (४ % MVAT)** |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | लक्ष्मी प्रिंटर्स,भगवती कोल्हार | ०१)४ कलर, २ फोल्डस् ७० | ११५००० | ०.९० | १,०३,५००.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ता.राहाता, जि.अहमदनगर, | GSMनिमंत्रणपत्रिका<br>०२) ४ कलर, २ फोल्डस् १७० A/P व १०० GSM<br>पाकीटासह निमंत्रणपत्रिका | २००० | ६.९५<br>एकूण- | १३,९००.००<br>१,१७,४००.०० |
| ०२. | निट प्रिंटस् ,डब्ल्यु-३६/सी-१, एम.आय.डी.सी.,अहमदनगर, | ०१)४ कलर, २ फोल्डस् ७० GSM निमंत्रणपत्रिका<br>०२) ४ कलर, २ फोल्डस् १७० A/P व १०० GSM पाकीटासह निमंत्रणपत्रिका | ११५०००<br>२००० | ०.५५<br>६.२०<br>एकूण- | ६३,२५०.००<br>१२,४००.००<br>७५,६५०.०० |
| ०३. | त्रिमुर्ती फाईन आर्टस् प्रा.लि., जी-२६,एम.आय.डी.सी, उज्वल एजन्सीज मागे, सातपूर, नाशिक, | ०१)४ कलर, २ फोल्डस् ७० GSM निमंत्रणपत्रिका<br>०२) ४ कलर, २ फोल्डस् १७० A/P व १०० GSM पाकीटासह निमंत्रणपत्रिका | ११५०००<br>२००० | एकूण- | ६९,५००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन,त्रिमुर्ती फाईन आर्टस् प्रा.लि.,नाशिक यांचे निम्नतम दराचे कोटेशन स्विकारणेत येऊन,त्यांना कार्योदेशन देण्यात यावा,असें ठरले. (कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**विषय नं.०४. संस्थान मालमत्तेचा विमा उतरविणेबाबत.**

**निर्णय क्र.४५३ (अ)** दरवर्षी संस्थानच्या इमारती, फर्निचर, इत्यादी (वाहांशिवाय) चल-अचल मालमत्ता, कॅश इन ट्रॅझीट, कॅश इन सेफ इत्यादीचा विमा एकत्रितपणे उतरविण्यात येतो. मागील वर्षी दिनांक १० जुलै,२००६ ते ०९ जुलै, २००७ या कालावधीसाठी मे. ओरीएटल इंन्शूरन्स कंपनी लि., शाखा संगमनेर यांचेकडे स्पर्धात्मक दरानुसार प्रिमियम स्वरुपात रुपये **९,३४,२०९/-** इतकी प्रिमियम रक्कम अदा करुन इतर सर्व चल, अचल मालमत्ता व कामगार नुकसान भरपाई कायदा, १९२३ चे कलम ३ नुसार सर्व संस्थान कर्मचा-यांचा समुह विमा उतरविण्यात आलेला आहे. या विम्याची मुदत दिनांक ०९ जुलै, २००७ रोजी पूर्ण होत आहे. तसेच चालू वर्षापासुन श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णांलय यांचा सर्वप्रकारचा विमा स्वतंत्रपणे उतरिवण्यात येत आहे. तरी त्यापुढील दिनांक ०९ जुलै, २००८ अखेर पर्यंतच्या एका वर्षासाठी पॉलिसीज घेण्यासाठी राष्ट्रीयकृत सार्वजनिक सर्वसाधारण विमा कंप-न्यांना पॉलीसीजसाठी आवश्यक सर्व माहितीसह पत्र देऊन या कंपन्यांच्या प्रतिनिधींना आजचे सभेसमोर अंतीम दरपत्रके सादर करण्यासाठी उपस्थित राहण्याची विनंती करण्यात आली असता खालील कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

०१) दि न्यू इंडिया एश्योरस कंपनी, शाखा श्रीरामपूर ( राष्ट्रीयकृत)
०२) युनायटेड इंडिया इशुरन्स कंपनी, शाखा श्रीरामपूर ( राष्ट्रीयकृत)
०३) ओरीएंटल इशुरन्स कंपनी, शाखा संगमनेर ( राष्ट्रीयकृत)
०४) नॅशनल इंन्शुरन्स कंपनी, शाखा कोपरगांव ( राष्ट्रीयकृत)

उपरोक्त कंपन्यांचे उपस्थित प्रतिनिधींबरोबर समक्ष चर्चा करुन या कंपन्यांना त्यांची अंतीम दरपत्रके बंद पाकिटात सादर करणेस सांगणेत येऊन त्यांना याबाबत पुन्हा चर्चा-तथा-वाटाघाटी करणेत येणार नाहीत, असे स्पष्ट करुन, या कंपन्यांना सारासार विचार करुन न्यूनतम दर नमुद करण्यास सुचित करण्यात आले.

उपरोक्त कंपन्यांनी देऊ केलेले दरपत्रके आजचे सभेत उघडण्यात आली असता त्यांनी खालीलप्रमाणे अंतिम दर देऊ केलेले आहे.

| अ.नं. | विमा कंपनीचे नांव | देऊ केलेले अंतिम सुधारित दर रुपये |
|---|---|---|
| ०१ | न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनी,श्रीरामपूर | ६,६६,४०८.०० |
| ०२ | ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी,श्रीरामपूर | ८,७३,६८९.०० |
| ०३ | नॅशनल इन्शुरन्स कंपनी,कोपरगांव | ७,१०,४२९.०० |
| ०४ | युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी,अहमदनगर | ७,६४,७११.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनी,श्रीरामपूर यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देऊन, विमा उतरविण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.०५. रूग्णालय विभागाच्या मालमत्तेचा विमा उतरविणेबाबत.**

**निर्णय क्र.४५४ (अ)** दरवर्षी संस्थानच्या इमारती, फर्निचर, इत्यादी (वाहनांशिवाय) चल-अचल मालमत्ता, कॅश इन ट्रॅन्झीट, कॅश इा सेफ इत्यादीचा विमा एकत्रितपणे उतरविण्यात येतो. मागील वर्षी दिनांक १० जुलै,२००६ ते ०९ जुलै, २००७ या कालावधीसाठी मे. ओरीएटल इंन्शूरस कंपनी लि., शाखा संगमनेर यांचेकडे स्पर्धात्मक दरानुसार प्रिमियम स्वरुपात रुपये **९,३४,२०९/-** इतकी प्रिमियम रक्कम अदा करुन इतर सर्व चल, अचल मालमत्ता व कामगार नुकसाा भरपाई कायदा, १९२३ चे कलम ३ नुसार सर्व संस्थान कर्मचा-यांचा समुह विमा उतरविण्यात आलेला आहे. या विम्याची मुदत दिनांक ०९ जुलै, २००७ रोजी पूर्ण होत आहे. तसेच चालू वर्षापासुन श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णांलय यांचा सर्वप्रकारचा विमा स्वतंत्रपणे उतरिवण्यात येत आहे. तरी त्यापुढील दिनांक ०९ जुलै, २००८ अखेर पर्यंतच्या एका वर्षासाठी पॉलिसीज घेण्यासाठी आजचे सभेसमोर प्रस्तावित करण्यात आले होते.

**(ब)** यासाठी राष्ट्रीयकृत सार्वजनिक सर्वसाधारण विमा कंपन्यांना पॉलीसीजसाठी आवश्यक सर्व माहितीसह पत्र देऊन या कंपन्यांच्या प्रतिाधिंनी आजचे सभेसमोर अंतीम दरपत्रके सादर करण्यासाठी उपस्थित राहण्याची विनंती करण्यात आली आहे. या कंपन्या खालील प्रमाणे :

०१) दि न्यू इंडिया एश्योरस कंपनी, शाखा श्रीरामपूर ( राष्ट्रीयकृत)

०२) युनायटेड इंडिया इशुरन्स कंपनी, शाखा श्रीरामपूर ( राष्ट्रीयकृत)

०३) ओरीएंटल इशुरन्स कंपनी, शाखा संगमनेर ( राष्ट्रीयकृत)

०४) नॅशनल इंन्शुरन्स कंपनी, शाखा कोपरगांव ( राष्ट्रीयकृत)

उपरोक्त कंपन्यांचे उपस्थित प्रतिाधिंबरोबर समक्ष चर्चा करुन या कंपन्यांना त्यांची अंतीम दरपत्रके बंद पाकिटात सादर करणेस सांगणेत येऊन त्यांना याबाबत पुन्हा चर्चा-तथा-वाटाघाटी करणेत येणार नाहीत, असे स्पष्ट करुन, या कंपन्यांना सारासार विचार करुन न्यूनतम दर नमुद करण्यास सुचित करण्यात आले. त्यानुसार त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | विमा कंपनीचे नांव | देऊ केलेले अंतिम सुधारित दर रुपये |
|---|---|---|
| ०१ | न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनी,श्रीरामपूर | २,६७,२२०.०० |
| ०२ | ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी,श्रीरामपूर | ४,२०,१५२.०० |
| ०३ | नॅशनल इन्शुरन्स कंपनी,कोपरगांव | २,२१,८८०.०० |
| ०४ | युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी,अहमदनगर | २,६९,६९८.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, नॅशनल इन्शुरन्स कंपनी,कोपरगांव यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देऊन विमा उतरविण्यात यावा ,असे ठरले.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.०६. मंदीर परिसर सुरक्षा कार्यवाहीबाबत.**
**(अ) तात्काळ करण्यात आलेली कार्यवाही.**
**(ब) चालु असलेली व करावयाची कार्यवाही.**

**निर्णय क्र.४५५** मंदिर सुरक्षिततेच्या संदर्भात पुर्ण केलेली व तात्काळ करण्यात आलेली कार्यवाही तसेच चालू असलेल्या कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे माहिती सभेस दिली, तिची नोंद घेण्यात आली.

**अ) मंदिर सुरक्षितते संदर्भात पुर्ण केलेली व तात्काळ करण्यात आलेली कार्यवाही..**

**I) पुर्ण केलेली कार्यवाही.**

१. मंदिर परीसरा भोवती कास्ट आयर्नचे कंपाऊंड व गेट तयार करण्यात आले.
२. समाधी मंदिराचे दक्षिणे कडील भिंताची उंची वाढविण्यात आलेली आहे.
३. भक्त निवास व शांतीनिवास हॉलला अपत्कालीन गेट तयार करण्यात आले.
४. संरक्षण विभागातील कायम, नव्याने कायम व कंत्राटी कर्मचा-यांकरीता सुरक्षितता संदर्भात प्रशिक्षण घेण्यात आले.
५. स्वतंत्र वायरलेस यंत्रणा कार्यरत करण्यात आली.
६. मंदिर परीसराच्या आत मध्ये सी सी टी व्ही यंत्रणा कार्यरत केली आहे.
७. मंदिराचे दक्षिणेकडे असलेल्या दरवाज्यामध्ये बुलेट प्रुफ काच बसविली आहे.
८. गुरुस्थान, अभिषेक व व्ही आय पी गेट येथे स्टील रॅलींग बसविल्या.
९. मंदिर परीसराचे चारही बाजुने लोखंडी बॅरीकेट लावुन सर्व प्रकारच्या वाहनांकरीता मनाई करण्यात आली आहे.
१०. चेकींग करीता डी एफ एम डी व एच एच एम डीचा वापर करण्यात येत आहे.
११. महाद्वार चेकींग करीता स्वतंत्र एजन्सी नेमुन माजी सैनिक सुरक्षा रक्षक नियुक्त केले आहे.
१२. मंदिर परीसर,नविन भक्त निवास, धर्मशाळा, हॉस्पीटल, नविन प्रसादालय इ. ठिकाणच्या सुरक्षितते करीता संरक्षण विभागाकरीता नव्याने आकृतीबंध तयार करण्यात आला आहे.
१३. मंदिर परीसरात साई भक्तांकरीता हॉस्पीटल मार्फत प्रथोपचार केंद्र सुरु केले आहे.

**II)तात्काळ करण्यात आलेली कार्यवाही**

१. चारही महाद्वारांना चार दिशांची नावे देऊन १ ते ४ नंबर देण्यात आलेले आहे.
२. चारही महाद्वारांपैकी नं. १ व नं. ४ महाद्वाराचा वापर आत येण्याकरीता तसेच नं. २,३, व ५ नंबर महाद्वाराचा वापर बाहेर जाण्याकरीता केला आहे.
३. मंदीर परीसरात असलेले मोबाईल, कॅमेरा लॉकर्स आत येण्यासाठी असलेल्या पश्चिम महाद्वार व दक्षिण महाद्वार येथे व्यवस्था करण्यात आली आहे.
४. मंदीर परीसरामध्ये अथवा मंदीरात कोणिही साईभक्तांनी मोबाईल, कॅमेरे आत नेऊ नाही म्हणुन चारही महाद्वारावर सुचना फलक लावले आहे.
५. श्रीसाईबाबा संस्थानचे सर्व साईभक्त निवासस्थानामध्ये व शिर्डी शहरातील तसेच पंचकृषीतील सर्व हॉटेल, लॉजेसमधील प्रत्येक रुममध्ये साईभक्तांनी मंदीरात जातांना मोबाईल, कॅमेरा, इलेक्ट्रॉनीक्स वस्तु, खेळणी इत्यादी मंदीर परीसरात आणण्यास सक्त मनाई आहे. असे चार भाषेत (मराठी, हिंदी, इंग्रजी, तेलगु) फलक तयार करुन लावले आहे.

६. दर्शनरांगेचे व मंदीर परीसराचे गर्दीच्या ठिकाणी साईभक्तांना तात्काळ बाहेर जाणेकरीता सात आपत्कालीन गेट तयार करुन त्याठिकाणी आपत्कालीन गेट अशा अशयाचे सुचना फलक लावले.

७. समाधी मंदीराचे दक्षिणेकडील बाजुस समाधी मंदीराचे मुख्य ठिकाणी बॅरीकेट्स लावले.

८. समाधी मंदीराचे दक्षिणेकडील बुलेटप्रुफ काच बसविलेल्या शेजारील दरवाजा कायमस्वरुपी बंद करण्यात आला.

९. पुर्व, पश्चिम, दक्षिणेकडे असलेल्या चारही महाद्वाराच्या वरती तात्पुरत्या स्वरुपात टेहळणीकरीता पोलिस कर्मचारी उभे केले आहेत.

१०. संरक्षण विभागा अंतर्गत मंदिर परीसरात स्वतंत्र कंट्रोल रुम तयार करुन सी. सी. टी. व्ही. यंत्रणा व वायरलेस यंत्रणा त्या ठिकाणी कार्यरत करण्यात आली.

११. मंदिर परीसरात आत मध्ये असलेले चप्पल स्टॅन्ड बंद करण्यात आले.

१२. सी. सी. टी. व्ही. करीता नव्याने टी व्हीची खरेदी करुन कंट्रोल रुममध्ये बसविण्यात आल्या आहे.

**ब) चालु असलेली व करावयाची कार्यवाही :**

**I ) चालु असलेली कार्यवाही.**

१. मंदीर परीसरात टेहाळणी टॉवर उभारण्याची कार्यवाही चालु आहे.

२. मंदीर परीसरातील चारही महाद्वारांवर मोर्चे बांधण्याचे काम चालु आहे.

३. मंदीर परीसरातील आत येणाऱ्या गेटवर तपासणी करीता स्कॅनर बसविण्याची कार्यवाही चालु आहे.

४. मंदीर व मंदीर परीसरात बसविण्यात आलेले सी. सी. टी. व्ही. चे कॅमेरे रेकॉर्डीग ३० दिवसांपर्यंत संभाळुन ठेवणे बाबतची कार्यवाही ध्वनीक्षेपन विभागामार्फत करण्यात येत आहे.

५. मंदिर परीसराचे दक्षिणेकडे असलेल्या भिंतीवर स्टील रॅलींग बसविण्याचे काम चालु आहे.

६. संरक्षण विभागात कार्यरत कायम, नव्याने कायम व कंत्राटी सुरक्षा कर्मचारी यांना सुरक्षा विषया प्रशिक्षण देण्याची कार्यवाही चालु आहे.

७. संस्थान अंतर्गत अपत्कालीन योजना तयार करण्याची कार्यवाही चालु आहे.

**II ) करावयाची कार्यवाही.**

१. मंदिर परीसरामध्ये आत येण्याकरीता असलेल्या प्रवेशद्वारावर (Entry Gate) चेकींग करीता बॅग स्कॅनर (Expolsive Scanner) व इतर आवश्यक साधने बसविणे.

२. मंदीर परीसराच्या चारही बाजुने सी. सी. टी. व्ही.यंत्रणा, कॅमेरे बसवुन नविन कंट्रोल रुम तयार करणे.

३. मंदीर परीसरात घेण्यात येणारे सार्वजनीक कार्यक्रम मंदीर परीसराचे बाहेर घेणे बाबत.

४. मंदिर परीसरात फुलहार, नारळ व प्रसाद नेणे बाबत.

५. भक्त निवास हॉल तळमजला व पहिला मजला येथे आपत्कालीन गेट तयार करणे.

६ मंदिर परीसरात संरक्षण, मंदिर, व ध्वनीक्षेपण कार्यालये ठेवुन बाकी सर्व विभागाची कार्यालये मंदिर परीसराबाहेर प्रशासकीय भवन बांधुन त्या ठिकाणी स्थानांतरीत करणे.

७. मंदिर परीसरात असलेले बॅकांचे ए टी एम काऊंटर बाहेर स्थानांतरीत करणे.

८. मंदिर परीसरातील महाद्वारावरील चेकींग, संरक्षण मोर्चे, टेहाळणी टॉवर परीसराचे कंपाऊंड लगतची सशस्त्र पेट्रोलिंग करीता पोलिस अधिकारी व कर्मचारी नेमणे बाबत.

९. संरक्षण विभागात असलेल्या कायम, नव्याने कायम झालेले व सुरक्षा एजन्सीकडील सुरक्षा कर्मचा-यांपैकी शैक्षणिक, शारीरीक पात्रता व काम करण्याची क्षमता लक्षात घेता अपात्र कर्मची-यांच्या इतर विभागात बदल्या करणे.

१०. संरक्षण विभागाअंतर्गत संस्थानमध्ये सेवेत असलेल्या अधिका-यांमधुन सहाय्यक संरक्षण अधिकारी पद निर्माण करुन नेमनुक करणे.

११. संरक्षण विभागातील कायम, नव्याने कायम झालेल्या कर्मचा-यांपैकी ५० कर्मचा-यांची निवड करुन त्यांना अग्णीशमन प्रशिक्षणा करीता नाशिक किंवा मुंबई येथील शासकीय प्रशिक्षण केंद्रात संस्थान मार्फत पाठविणे.

१२. संस्थानचा वाढता विस्तार लक्षात घेता स्वतंत्र अग्णीशामक विभाग तयार करुन अग्णीशामक वाहन व प्रशिक्षीत कर्मचा-यांची नेमनुक करणे.

१३. .संस्थानची विविध ठिकाणी असलेली भक्तनिवासस्थाने, प्रसादालय व मालमत्ता भविष्यात होणारे विविध प्रकल्प या ठिकाणी पेट्रोलिंग करीता संरक्षण विभागाकरीता कायम स्वरुपी चार चाकी वाहन (जिप) उपलब्ध करणे.

१४. मंदीर परीसरातील सुरक्षा व्यवस्थेची जबाबदारी एकाच एजन्सीकडे ठेवणे.

(कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख)

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१ गुंतवणूकी बाबत**

**निर्णय क्र.४५६** संस्थानच्या बचत खात्यामध्ये १२ कोटींपेक्षा जास्त रक्कम शिल्लक असल्याने, सदरची रक्कम मुदत ठेवीत गुंतविण्यासाठी मा.अध्यक्ष व मा.विश्वस्त श्री.वाबळे साहेब यांनी निर्देश दिल्यानुसार दि.९ जुन,२००७ रोजी प्रामुख्याने संस्थानला सेवा देणा-या व स्थानिक बँकांच्या प्रतिनिधींची जास्तीत-जास्त व्याजदर प्राप्त करुन घेण्यासाठी सभा बोलविण्यात आली होती. यावेळी बँकांच्या प्रतिनिधीसह खालीलप्रमाणे संस्थानचे विश्वस्त व अधिकारी उपस्थित होते.

१) मा.अध्यक्ष साहेब
२) मा.विश्वस्त श्री वाबळे साहेब
३) मा.कार्यकारी अधिकारी साहेब
४) मा.प्रशासकीय अधिकारी - श्री जोशी साहेब
५) मुख्यलेखाधिकारी
६) लेखाधिकारी

वरील सभेस मा.वैधानिक लेखापरिक्षकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

वरीलप्रमाणे रकमेची १ वर्षाकरीता गुंतवणूक करण्यासाठी एका तक्त्यावर त्या-त्या बँकांच्या प्रतिनिधींकडून व्याजदरांचा तपशील लेखी स्वरुपात घेण्यात आला. सदरच्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे व्याजदराच्या संदर्भात मा.अध्यक्ष सो. यांनी बँकांच्या अधिका-यांशी चर्चा केली. या चर्चेत प्रामुख्याने गुंतवणूक करतांना संस्थानला सेवा देणा-या बँकांचाच विचार करण्यात यावा असे ठरले. सेवा देणा-या बँकांपैकी युनियन बँक ऑफ इंडिया, शिर्डी यांचा व्याजदर हा सर्वात जास्त म्हणजे एक वर्षाकरीता १०.०० % इतका असल्याने इतर सेवा देणा-या बँकांनीही त्याप्रमाणे सोमवार दि.११ जुन,२००७ पर्यंत व्याजदर वाढवून देण्याबाबत सांगण्यात आले. त्यानुसार या बँकाकडून १० % इतका व्याजदर प्राप्त होईल अशा बँकांकडे गुंतवणूकीची रक्कम सम प्रमाणात विभागून गुंतविण्यात यावी असा निर्णय झाला.

उपरोक्त निर्णयानुसार दि.११ जुन,२००७ रोजी संस्थानला सेवा देणा-या खालील बँकांचे व्याजदर प्राप्त झालेले असुन, १ वर्षाकरीता ( ३६६ दिवस ) त्यांनी द.सा.द.शे. १० % इतका व्याजदर देऊ केलेला आहे.

१) आंध्र बँक, शिर्डी
२) बँक ऑफ बरोडा, कोपरगांव
३) बँक ऑफ बरोडा, नासिक
४) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
५) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी

तरी वरील अ.नं. १ ते ५ या बँकांकडे उपरोक्त रु.१२ कोटीपैकी रु.२ कोटी दैनंदिन खर्चासाठी राखुन ठेऊन रक्कम रु.१० कोटी ( प्रत्येकी रक्कम रु.२ कोटी याप्रमाणे ) समप्रमाणात विभागून गुंतविण्यात आले असून,त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२** **संस्थानकडे उपलब्ध असलेल्या शुद्ध चांदीपासून भक्तांसाठी नाणी तयार करणे व सोने-चांदी वस्तू वितळविणेबाबत.**

**निर्णय क्र.४५७** श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणारे भक्तांकडून देणगीरुपाने सोने-चांदीचे अलंकार, वस्तू अर्पण केल्या जातात. तत्कालीन मा. विश्वस्त मंडळाचे दिनांक २१ जुलै, २००१ रोजीच्या सभेतील निर्णय क्रमांक ३३८ अन्वये देणगीव्दारे प्राप्त झालेले सोने-चांदी वस्तु अलंकार वितळविणेसाठी रिफायनरीत नेण्यात येत असत. शुध्दीकरणानंतरच्या ९९% शुध्द लगडीपासून वेळोवेळी आवश्यकते नुसार, श्री साईंची प्रतिमा असलेली चांदीची (२० ग्रॅम), सोन्याची (प्रत्येकी २.५, ५,१० ग्रॅमची ) नाणी साईभक्तांना योग्य किंमतीत उपलब्ध करुन देण्यात येत होती.

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ चे अधिसूचनेनूसार श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे कामकाज शासननियुक्त मा.व्यवस्थापन समिती पहात आहे. मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये देणगी रुपाने प्राप्त होणारे सोने-चांदी वस्तू अलंकारापैकी, जे अलंकार अत्यंत अत्युत्कृष्ट व असामान्य कलाकुसरीचे असतील, असेच अलंकार व्यवस्थापनाकडे सदैव जतन करुन ठेवता इतर उर्वरीत सोने-चांदी वस्तूं अलंकार वितळविणे बाबतचे कार्यपध्दतीस मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांनी त्यांचे पत्रक्रमांक सासंवि-२००५/४०७/(६४)-का.सोळा दिनांक ३१ मे, २००७ अन्वये स्थायी मान्यता देण्यात आलेली आहे.

**(अ)** संस्थानकडे श्रीची प्रतिमा असलेली नाणी व पेंडंटस् ची भक्तांकडून मागणी मोठयाप्रमाणात वाढत असल्यामुळे मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक १७ फेब्रुवारी, २००७ चे सभेतील निर्णय क्रमांक १२६ अन्वये स्टेट बॅक ऑफ ईडिया, मुंबई यांचेकडे सुवर्णठेव योजनेअंतर्गत गुंतविण्यात आलेले सोने त्यांचेकडून स्विकारण्यात येऊन सदर सोने इंडिया गव्हर्नमेंट मिंट, मुंबई यांचेकडे जमा करुन त्यापासुन

पूर्वीप्रमाणेच नाणी व पेंडंटस् तयार करुन घेणेबाबत निर्णय होऊन कार्यादेश देण्यात आलेला असून अल्पावधीच सोन्याची नाणी पेंडंटस् विक्रीसाठी उपलब्ध होतील.

वरील कार्यवाही प्रमाणेच संस्थान मालकीची १३६६३२ ग्रॅम शुध्द चांदी सेंट्रल बॅक ऑफ इंडिया, मुंबई येथील लॉकर शिल्लक आहे. सदर चांदी इंडिया गर्व्हमेंट मिंट, मुंबई यांचेकडे हस्तांतरीत करुन मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे २० ग्रॅम वजनाचे नाणे तयार करुन घ्यावे, असे नम्र मत आहे.

**(ब)** दक्षिणापेटी मोजणीचे वेळी उपलब्ध होणारे तसेच भक्तांकडून देणगी स्वरुपात प्राप्त होणारे सोने-चांदी वस्तु अलंकार मुख्य रोखपाल यांचे ताब्यात स्ट्रॉग रुममध्ये सुरक्षित ठेवण्यात येतात. हे ठेवतानां देणगी पावतीनिहाय स्वतंत्र पिशवीत ठेवण्यात येतात व त्या पिशवीतही देणगीपावती बाबतचा तपशील दर्शविणारी चिठ्ठी टाकण्यात येते. अशाप्रकारे माहे एप्रिल,२००३ पासुन माहे मार्च, २००४ अखेरपर्यन्त साठलेल्या सर्व सोने-चांदी वस्तू अलंकाराची प्रत्यक्ष पाहणी दिनांक ३० मार्च,२००४ रोजी तत्कालीन मा.विश्वस्तांनी समक्ष केली होती. त्यावेळेस देणगी पावतीनिहाय असलेल्या चिठ्ठया काढून टाकण्यात येऊन, सर्व सोने तसेच चांदी वस्तु अलंकार एकत्रित करण्यात आले व त्यांचे समक्ष वजनही करण्यांत आलेले आहे. त्यामुळे एप्रिल, ०३ पासुन आज अखेरच्या सर्व सोने-चांदी वस्तु वितळविण्यात याव्यात, असे नम्र मत आहे.

लेखाशाखेकडे दिनांक ३१ मार्च, २००७ अखेर पुढील प्रमाणे देणगी रुपाने जमा झालेले वितळविण्या योग्य सोने-चांदी वस्तू अलंकार शिल्लक आहेत, त्याचा गोषवारा :

| अ.नं. | तपशिल | वजन (ग्रॅम मध्ये) |
|---|---|---|
| ०१. | सोने वस्तु | ५५,७८०.०२० |
| ०२. | चांदी वस्तु | ९,१९,४४०.४२० |

उपरोक्त सोने व चांदी वस्तुची संख्या / वजन पाहता वितळविण्यास नेताना वर्ष निहाय टप्प्या-टप्प्यांने नेणे सोईस्कर होईल, असे नम्र मत आहे. तरी मा. व्यवस्थापन समितीचे निर्देशान्वये, दिनांक २७ डिसेंबर,२००४ पासुन देणगी स्वरुपात येणां-या सोने-चांदी वस्तूपैकी लिलावाच्या दृष्टीने सुयोग्यवस्तु निवडून वितळविण्यायोग्य सोने चांदी वस्तुची अलंकार आदींची पाहणी मा.सदस्यांकडून होऊन पुढील वेळापत्रक ठरविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त **"अ"** प्रमाणे सेंट्रल बॅक ऑफ इंडिया, मुंबई येथील लॉकरमध्ये असणारी संस्थान मालकीची १३६६३२ ग्रॅम शुध्द चांदी इंडिया गव्हर्मेट मिंट यांचेकडे त्यांची वेळ घेऊन हस्तांतरीत करण्यात यावी. सदर चांदीचे पूर्वीप्रमाणे २० ग्रॅम वजनाचे नाणे तयार करणेकामी कार्यादेश देण्यात यावा.

तसेच वरीलप्रमाणे देण्यात येणारी चांदी व यापूर्वी दिनांक २२.३.२००७ रोजी देण्यात आलेले सोने वितळविणे, शुद्ध करणे, (Melting & Refining) याकामी व त्याअनुषंगाने येणाऱ्या इतर आवश्यक त्या खर्चासही मंजूरी देण्यात आली. इंडिया गव्हर्मेट मिंट,मुंबई यांचेकडून सदरची बिले प्राप्त झाल्यानंतर रक्कम आदा करणेबाबतची कार्यवाही करण्यात यावी,असें ठरले.

त्याचप्रमाणे उपरोक्त **"ब"** मध्ये नमूद केल्यानुसार वर्षनिहाय टप्याटप्याने सोने-चांदी वस्तू वेळापत्रक ठरवून वितळविण्यासाठी इंडिया गव्हर्मेट मिंट,मुंबई यांचेकडे पाठविण्याची कार्यवाही करण्यात यावी असे ठरले. तसेच सदरहू कार्यवाही करणेकामी येणाऱ्या अनुषंगिक खर्चासही मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **मौजे शिर्डी तालुका राहाता येथील सि.स.नं.९३ मधील जागा श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांना सुशोभिकरणसाठी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४५८** **(अ)** मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक २७ डिसेंबर, २००४ रोजीच्या सभेत निर्णय क्रमांक १८२ खालीलप्रमाणे झालेला आहे :

"…. थोडक्यात या जागेच्या मोबदल्यात त्यांना संस्थानकडून वाचनालयाचे इमारतीचे बांधकाम अपेक्षित असल्याचे दिसते. वाचनालयाची सध्याची जागा मोक्याची असल्याने नगरपंचायत प्रस्तुत मिळकत संस्थानला मालकी हक्काने हस्तांतरीत करुन देत असल्यास ती स्वीकारता येईल. तसेच नगरपंचायत शिर्डी यांना वाचनालयासाठी दुसरे ठिकाणी इमारत बांधून देण्यात येईल. तरी त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. "

त्यानंतर नगरपंचायतीशी जागा ताब्यात देणेबाबत वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आला. त्यावर शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचे दिनांक १४ जुलै, २००५ रोजीचे पत्रात, " सदर जागेची मालकी ही भूमी अभिलेख कार्यालयाचे रेकॉर्डवरुन महाराष्ट्र सरकारच्या नावाने असल्याने सदर जागा संस्थानकडे वर्ग करणेसाठी आपलेमार्फत मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे सादर करणेस विनंती आहे. "

त्याप्रमाणे, दिनांक ३० सप्टेंबर, २००५ रोजी मौजे शिर्डी येथील सि.स.नं. ९३ मधील ९३.७ चौरस मीटर जागेची मागणी मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस करण्यात येऊन त्याबाबत वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला. त्या अनुषंगाने, मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी दिनांक २६ जून, २००७ रोजी बैठक आयोजित केली होती. या बैठकीचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे :

मा.जिल्हाधिकारीसो.,अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली नगर निवास, अहमदनगर येथे वरील विषयाबाबत दिनांक २६ जून, २००७ रोजी सायं.०७ वाजता बैठक झाली. सदर बैठकीस खालील अधिकारी / पदाधिकारी हजर होते :

मा.श्री.उमाकांत दांगट, जिल्हाधिकारी, अहमदनगर.

मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग, विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

मा.श्री.भाऊसाहेब रा. वाकुचौरे, कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

मा.श्री. भाऊसाहेब दांगडे, निवासी उपजिल्हाधिकारी, अहमदनगर.

मा.श्री.नंदकुमार सुर्यवंशी, उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर.

मा.श्री.भानुदास पालवे, उपविभागीय अधिकारी, संगमनेर भाग, संगमनेर.

मा.श्री.करंदीकरसो., सहाय्यक नगररचनाकार, नगर रचना कार्यालय, अहमदनगर.

मा.श्री. शांताराम गोसावी, मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी.

सदरहू बैठकीत विषयांकित जागेसंदर्भात सविस्तर चर्चा करणेत आली. मा.सहाय्यक नगररचनाकार यांनी सांगितलेनुसार, सदरची सि.स.नं. ९३ मधील जागा पब्लिक व सेमीपब्लिक कारणासाठी राखीव आहे, तसेच त्यातून रस्ता ही प्रस्तावित आहे. तसेच सदरहू जागा धार्मिक कारणासाठी द्यावयाची ठरल्यास शासनाची मान्यता घ्यावी लागेल, असे सर्व अधिकाऱ्यांचे मत पडले. त्यावर मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांनी सांगितले की, सदरची जागा सुशोभिकरणासाठी संस्थानला देता येईल मात्र जागेची मालकी शासनाकडेच राहिल. त्यामुळे संस्थानने सदरील जागेच्या सुशोभिकरणाचा प्रस्ताव सत्वर सादर करावा, असे सुचविले.

**(ब)** उपरोक्त परिच्छेदातील विवेचनानुसार व मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे सूचनेनुसार मौजे शिर्डी येथील सि.स.नं. ९३ मधील ९३.७ चौ.मी. जागेचे सुशोभिकरणासाठी संस्थानला मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव अलाहिदा सादर करणेत आलेला आहे.

मौजे शिर्डी येथील सि.स.नं.९३ मधील जागेचे सुशोभिकरण संस्थानमार्फत करण्याबाबत खालील बाबतीत निर्णय होणेस विनंती :

०१. मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेसमवेत दिनांक २६ जून, २००७ रोजीच्या बैठकीत ठरलेनुसार, मौजे शिर्डी येथील सि.स.नं. ९३ मधील ९३.७ चौरस मीटर जागेचा मालकी हक्क मिळत नसल्याने, सदरील जागेचे सुशोभिकरण संस्थान मार्फत करण्यास मान्यता मिळणेसाठी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस प्रस्ताव सादर करणेस मान्यता असावी.

०२. मौजे शिर्डी येथील सि.स.नं. ९३ मधील ९३.७ चौरस मीटर जागेवर मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २५ नोव्हेंबर, २००६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ८८० नुसार, सुशोभिकरणासह शिल्प उभारणी करणेसाठी सदरील जागेची निश्चिती करणेस तसेच याकामी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता असावी.

उपरोक्त प्रस्तावावर साधकबाधक चर्चा होऊन, मौजे शिर्डी येथील सि.स.नं.९३ मधील ९३.७ चौरस मीटर ही जागा व्दारकामाई मंदिराचे समोर मोक्यावर असल्याने साईभक्तांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. तेथे भक्तांसाठी संस्थान खर्चाने सुशोभिकरण करुन शिल्प उभारणे उपयुक्त होईल. मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी उपरोक्तप्रमाणे नमूद केल्याप्रमाणे सदर जागेचा मालकी हक्क मिळत नसल्याने, या जागेचे संस्थान खर्चाने सुशोभिकरणासह शिल्प उभारणीस मान्यता देण्यात यावी व मालकी हक्कासाठी पाठपूरावा करण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०४** **समाधी मंदीराकरिता सागवानी लाकडाचे आकर्षक व कोरीव काम केलेले दरवाजे देणगी स्वीकारणे बाबत.**

**निर्णय क्र.४५९** श्री.एम.आर.सोमण व कुटूंबीय कोईमत्तूर सध्या मुक्काम अबुधाबी यांनी आपले २२ जून २००७ चे ई मेल व्दारे श्रीसाईबाबा समाधी मंदिराचे उत्तर व दक्षिण त्याचप्रमाणे नारळी गेट या ठिकाणी कोरीव काम केलेले आकर्षक असे दरवाजे देणगी दाखल देण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

दरवाज्यांच्या अंदाजीत खर्चाकरीता त्यांना तिनही दरवाजांचे मापे देण्यात आलेली आहेत. आता त्यांनी तिनही दरवाजांचे ९० % काम पुर्ण झाले असून फक्त इटालीयन पॉलीस,पितळी वाटया, पितळी कड्या, पितळी पट्टया याचे काम बाकी असलेचे कळविले असून १५ जुलै २००७ पर्यंत ते पुर्ण होईल असे लीहीले आहे.

या तीन दरवाजांसाठी अंदाजे ७ ते ८ लाख रुपये पर्यंत ते खर्च करणार आहेत. दरवाज्या वरील कोरीव कामाची काही चित्रे त्यांनी ई मेल व्दारे पाठविली आहेत.

तरी सदरचे दरवाजे देणगी म्हणून स्विकारण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०५** **रबर मॅटस् खरेदीस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४६०** सध्या पावसाळा सुरु झालेला आहे. मंदिर परिसरात शहाबादी फरशी व मार्बल फरशी आहे. ओलेपणा मुळे भक्तांचे पाय घसरतात. यासाठी १०० नग रबर मॅटस् त्वरीत खरेदी करुन टाकण्यात यावेत अशा तोंडी सूचना मा. अध्यक्ष साो यांनी आपले मागील भेटीत दिल्या आहेत.

या बाबत चौकशी केली असता, ३'×५' मापाचे रबरी मॅटकरीता अंदाजे रु.८००/- पर्यंत खर्च अपेक्षीत आहे.

१०० नग मॅटस् खरेदीसाठी अंदाजे रु. ८०,०००/- (रु.ऐंशी हजार ) मात्र खर्च अपेक्षित असून, त्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तप्रमाणे मॅटस् विहित पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ८०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,मंदीर विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०६** **गुरुपौर्णिमा उत्सवासाठी फुलांचे सजावट करण्यास परवानगी मिळणे बाबत**
**निर्णय क्र.४६१** श्री साई अन्नपूर्णेश्वरी ट्रस्ट,बंगलोर यांनी संस्थानला फॅक्स पाठवून कळविले की, मागील वर्षी त्यांच्या ट्रस्टच्या मार्फत समाधी मंदिर व मंदिर परिसरास फुलांची सजावट केली होती. त्यांना यावर्षी गुरुपौणिमा उत्सवामध्ये समाधी मंदिर व मंदिर परिसरास फुलांची सजावट करण्यास परवानगी मागितली आहे.

सदर पत्रात त्यांनी संस्थान कडून खालील प्रमाणे मागणी केलेली आहे.

०१) दिनांक २६ जुलै २००७ रोजी सजावट करण्यासाठी येणा-या १० लोकांची राहण्याची सोय करणे.

०२) दिनांक २८ जुलै २००७ रोजी रात्रौ २ वाजेपासून समाधी मंदिर व मंदिर परिसरास फुलांची सजावट करणेसाठी परवानगी दयावी.

०३) बंगलोर येथील १५० ते २०० साईभक्तांना (कारागीरांना) राहण्यासाठी ,जेवणाची व दर्शानाची सोय संस्थानने करावी.

दिनांक ०२/०६/२००७ रोजी श्री साई अन्नपूर्णेश्वरी ट्रस्ट,बंगलोर यांचे प्रतिनिधी श्री कृष्णा,श्री सत्यप्रकाश ,श्री आंनदकुमार यांनी समाधी मंदिर व मंदिर परिसराची पाहणी केली.

प्रत्येक उत्सवामध्ये मंदिर व मंदिर परिसरामध्ये फुलांची सजावट संस्थानमार्फत करण्यात येते.

गुरुपौणिमा उत्सवासाठी श्री साई अन्नपूर्णेश्वरी ट्रस्ट,बंगलोर.यांनी मंदिर व मंदिर परिसरामध्ये फुलांची सजावट ( विनामुल्य) देणगी स्वरुपात करण्यास परवानगी मागितली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख/बगीचा विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०७** **स्टेशनरी छपाई व खरेदी बाबत**
**निर्णय क्र.४६२** श्रीसाईबाबा हॉस्पिटल आता सुरळीतपणे चालू असून विविध विभाग सुरु झाले आहेत तसेच M.R.I. व इतर विभाग लवकरच सुरु होण्याच्या मार्गावर आहेत.त्याबरोबरच लवकरच सुरू होणाऱ्या संगणकीय प्रणाली करीता प्रिंटेड व प्रि प्रिंटेड पेपर खरेदी करणे गरजेचे आहे. नवीन सुरु होणाऱ्या विभागांकरीता व पुर्वी छपाई केलेले परंतू पेशंटची वाढती संख्या व त्यामुळे वाढणाऱ्या मागणीचा विचार करीता संपत आलेल्या पेपर्स व रजिष्टरची खालीलप्रमाणे छपाई तातडीने करुन घेणे गरजेचे आहे.

**अ) <u>रेडिओलॉजी विभाग</u> -**

| अ.नं. | तपशील | २००६-२००७ या आर्थिक वर्षात प्रत्यक्षात झालेला खर्च. | २००७-२००८ या आर्थिक वर्षात प्रस्तावित खर्च |
|---|---|---|---|
| १ | संगणक सी.डी. | १,८६०/- | २०,०००/- |
| २ | खाकी पाकिटे | १,१३,१२०/- | २,५०,०००/- |
| ३ | लेटर पॅड ,फॉर्म | ६,४२५/- | १०,०००/- |
| ४ | रिपोर्ट पेपर | ३,५००/- | ५,०००/- |
| ५ | रजिष्टर | ५,१००/- | ६,०००/- |
| | एकूण खर्च | १,६५,३४५/- | २,९१,०००/- |

वरिलप्रमाणे रेडिओलॉजी विभागाकरिता अंदाजे रु. ३,००,०००/- (अक्षरी रु. तीन लाख मात्र) खर्च प्रस्तावित आहे. तथापि, M.R.I. मशीन लवकरच कार्यान्वित होत असल्याने जरुर भासल्यास पॉलिथिन बॅग बनवून घेणे झाल्यास उपरोक्त खर्चात वाढ होण्याची शक्यता आहे.

**ब) <u>इतर विभाग</u> -**

| अ.नं. | तपशील | २००६-२००७ या आर्थिक वर्षात प्रत्यक्षात झालेला खर्च. | २००७-२००८ या आर्थिक वर्षात प्रस्तावित खर्च |
|---|---|---|---|
| १ | रजिष्टर | ९७,५५९/- | १,००,०००/- |
| २ | फॉर्म | १,९३,०२२/- | २,००,०००/- |
| ३ | व्हिजीटिंग कार्ड | २२,५००/- | २५,०००/- |
| | एकूण खर्च | ३,१३,०८१/- | ३,२५,०००/- |

वरिलप्रमाणे रजिष्टर, फॉर्म, संगणक स्टेशनरी व इतर छपाईकामी अंदाजे रु.४,००,०००/- (अक्षरी रु. चार लाख मात्र ) प्रस्तावित आहे. सदरकामी संगणक प्रणाली कार्यान्वित झाल्यानंतर प्रिंटेड-प्रि-प्रिंटेड स्टेशनरीकामी वाढीव खर्च होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**क)** कार्यालयीन स्टेशनरी खरेदी कामी हॉस्पिटल सुरु झाले पासून आजपर्यंत रु.१,९९,३३०/-(अक्षरी रु.एक लाख नव्व्यान्नव हजार तीनशे तीस मात्र) इतका खर्च आला आहे. पुढील एक वर्षे करिता कार्यालयीन स्टेशनरी खरेदी करणेकामी अंदाजे रु .३,००,०००/- (अक्षरी रु.तीन लाख) खर्च प्रस्तावित आहे.

उपरोक्त प्रमाणे **अ.ब** व **क** करिता चालू आर्थिक वर्षात अंदाजे रु. १०,००,०००/- (अक्षरी रु. दहा लाख)पर्यंत खर्च अपेक्षीत आहे.

तरी उपरोक्त छपाई व स्टेशनरीची खरेदी विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून करणेस व सदरच्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **लिनन खरेदी बाबत**

**निर्णय क्र.४६३** श्रीसाईबाबा हॉस्पिटल सुरु होउन एक वर्ष पूर्ण झाले असून हॉस्पिटलमधील न्यूरो सर्जरी विभागही आता लवकरात लवकर सुरु होणार आहे. सदरील ओ.टी.करीता जास्तीच्या लिननची आवश्यकता आहे. सध्या लिनन स्टोअरमध्ये गडद निळा व फिक्कट हिरवा या रंगाचे बरेच कापड शिल्लक आहे.

परंतु ओ.टी. करीता लागणारे कपडे यातून शिवता येत नाहीत कारण हा कपडा अतिशय जाड असून मागील अनुभव पाहता शिवून घेतलेल्या कपडयांचा शिलाईचा दर्जा चांगला नाही.

उपरोक्त कारणास्तव न्यूरो ओ.टी.करीता लागणारे कपडे व ओ.टी असिस्टंटकरीता लागणारे कपडे खालील तक्यात दर्शविल्याप्रमाणे व्यावसायीक पुरवठाधारकांकडून विहीत पध्दतीने रेडीमेड खरेदी करावेत, असे मत आहे.

| अ.नं. | तपशील | साईज | प्रत्येकी किंमत | आवश्यक नग | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | सर्जन ड्रेस | S M L | २२५ | ५० नग | ११२५०/- |
| २ | सर्जन गाउन | S M L | २२५ | ५० | ११२५०/- |
| ३ | फिमेल ओ.टी.ड्रेस | S M L | २२५ | ५० | ११२५०/- |
| ४ | कॅप | std | १५ | १०० | १५००/- |
| ५ | मास्क | std | १० | १०० | १०००/- |
| ६ | होलशीट (बीग) | ४x६.५ | १२० | ५० | ६०००/- |
| ७ | होलशीट (स्मॉल) | ३x५ | ८० | ५० | ४०००/- |
| ८ | ओ.टी टेबलशीट | २.५x६.५ | १२५ | ५० | ६२५०/- |
| ९ | ड्रॉ शीट | २.५x३.५ | ६५ | २०० | १३०००/- |
| १० | पेशंट ड्रेस | std | २२५ | ६५ | १४६२५/- |
| ११ | पेशंट गाउन | S M L | १६० | ६५ | १०४००/- |
| १२ | ओ.टी. इन्स्ट्रुमेंट ट्रॉली कव्हर | Std | १२५ | ५ | ६२५/- |
| १३ | ओ.टी. इन्स्ट्रुमेंट ट्रॉली कव्हर | Miny | ९५ | ५ | ४७५/- |
| | | | | एकुण | ९१६२५/- |

रउपरोक्तप्रमाणे खरेदीस साधारणत: रु.१,००,०००/-(अक्षरी रू. एक लाख मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे. हॉस्पिटलमध्ये बन्सल ट्रेडिंग कंपनी, हे भोपाळचे फक्त हॉस्पिटलच्या लिननचे वितरक समक्ष आले असता त्यांचेकडील रेडीमेड लिननचे कपडयांचा दर्जा चांगल्या प्रतीचा असल्याचे दिसले तरी तातडीची बाब म्हणून भोपाळचे, किंवा नाशिकचे किंवा इतर कोणत्याही रेडीमेड कपडयांचे पुरवठा धारकांकडून सदर कपडयांचे नमूने पाहून व कपडयांचा दर्जा व किंमत पाहून उपरोक्त तक्त्यात दिल्याप्रमाणे लिनन खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९** **श्रीसाईबाबा रुग्णालयासाठी रेडीमेड फोल्डर खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.४६४** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१४.१०.२००६ निर्णय क्र.७८५(१३) नुसार श्रीसाईबाबा रुग्णालयासाठी आवश्यक असणारे गोदरेज कंपनीचे १०० नग लोखंडी फोल्डर्स कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे रक्कम रु.३ लाख पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार रुग्णालय विभागाचे प्रतिनिधींनी गोदरेज तसेच इतर नामांकित कंपन्यांशी पत्रव्यवहार करुन व फोल्डर्सचे डिझाईन पाठवून पोष्टाने तसेच फॅक्सद्वारे दरपत्रकांची मागणी केलेली होती. मागणी करणेत आलेल्या दरपत्रकात गोदरेज कंपनीचे एक व इतर उत्पादीत कंपन्यांचे दोन असे तिन कोटेशन प्राप्त झालेले आहेत. त्यातील दरांचा तुलनात्मक तपशील खालीलप्रमाणे-

एम.एस.किंवा स्टील फोल्डर्स १०० नग

साईज : १२०० एमएम x ६०० एमएम

चार उतरते कप्पे, पावडर कोटींग

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नाव व गांव | कंपनी/मेक | दर प्रती नग |
|---|---|---|---|
| ०१. | खिरा स्टील वर्क्स प्रा.लिमीटेड, अहमदाबाद | खिरा | रु.१९७१/-+१२.५%व्हॅट = रु.२२१७.३८ + जकात |
| ०२. | गोदरेज बॉयज ॲण्ड मॅन्युफॅक्चरींग कंपनी लिमीटेड, पुणे | गोदरेज | रु.१७००/-+१२.५%व्हॅट = रु.१९१२.५० |
| ०३. | अरिहंत इंडस्ट्रीज, नाशिक | अरिहंत | रु.१७००/-+१२.५%व्हॅट = रु.१९१२.५० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, गोदरेज कंपनीचे व अरिहंत इंडस्ट्रीज, नाशिक यांचे दर सारखे आहेत तथापि गोदरेज ही नामांकित कंपनी असल्याने अ.नं. ०२ गोदरेज बॉयज ॲण्ड मॅन्युफॅक्चरींग कंपनी लिमीटेड, पुणे यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१०** **रत्ना निधी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांचे शिबीर आयोजनाबाबतचे पत्र.**
**निर्णय क्र.४६५** रत्ना निधी चॅरीटेबल, ट्रस्ट, मुंबई यांनी दि.२३.०६.२००७ रोजीच्या पत्राने असे कळविलेले आहे की, दि.२०.०६.२००७ रोजीच्या पत्रान्वये आमच्या संस्थेच्या श्रीमती ठक्कर व श्री साईबाबा संस्थान शिरडी यांच्यात झालेल्या चर्चेनुसार त्यांनी कळविलेले आहे की, पुर्वी ठरलेल्या तारखेत बदल होऊन आता दि.२१.०७.२००७ ते २३.०७.२००७ अखेर अपंग शिबीर आयोजित करावे व झालेल्या बदलाची नोंद घ्यावी तसेच दि.०७.०७.२००७ ते ०८.०७.२००७ अखेर रुग्ण तपासणी शिबीर आयोजित करावे.

उपरोक्त शिबीर आयोजित करणेबाबत दि.२०.०७.२००७ चे पत्र प्रशासनास मिळालेले नाही. श्रीमती ठक्कर व वैद्यकिय अधिक्षिका यांच्यात चर्चेप्रमाणे सदर संस्थेस फक्त प्रस्ताव दाखल करणेबाबत कळविलेले होते. परंतु त्यांनी नियोजनाबाबत चर्चा न करता शिबीराच्या तारखा निश्चित करुन पाठविलेल्या आहेत.

सदर शिबीर आयोजित करावयाचे झाल्यास रत्ना निधी चॅरीटेबल, ट्रस्ट खालील सेवा पुरविणार आहेत.

०१. तपासणी शिबीर दि.०७.०७.२००७ ते ०८.०७.२००७ रोजी ठेवण्यातबाबत कळविलेले आहे.

०२. वस्तु वाटप (कॅलिपर, जयपुर फुट, व्हिल चेअर, टी सायकल, कुबडया) दि. २१.०७.२००७ ते २३.०७.२००७ अखेर आयोजित करणार आहेत.

०३. सदर शिबीराकरिता सदर संस्था त्यांची आर्थोपेडीक व्हॅन तसेच साहित्य व इतर वस्तु दि.२०.०७.२००७ रोजी घेऊन येणार आहेत.

०४. सदर शिबीर आयोजनासाठी या संस्थेकडून त्यांचे को-ऑर्डीनर, इंजिनिअर, सोशल वर्कर, तंत्रज्ञ अशी टिम येणार आहे.

०५. सदर शिबीरासाठी हि संस्था जवळ-जवळ बारा लाख रुपये खर्च करणार आहेत त्यांनी संस्थानकडून हा खर्च मिळण्याबाबत अपेक्षा केलेली नाही.

संस्थानकडून खालीलप्रमाणे सेवा मिळण्याबाबत कळविलेले आहे.

०१. कॅम्प आयोजनासाठी जागा- सदर शिबीरासाठी संस्थानचे रुग्णालयात जागा उपलब्ध करुन द्यावी. याकरिता धर्मशाळा विभागाचा एक हॉल घेऊन सदर व्यवस्था करता येईल.

०२. या संस्थेच्या कर्मचाऱ्यांसाठी राहण्याची व जेवणाची, रहाण्याची व चहापाण्याची व्यवस्था करण्याबाबत कळविलेले आहे. सदर व्यवस्था संस्थानचे निवासस्थानात व भोजन गृहात करता येईल.

०३. त्यांनी रुग्णांना जेवण अथवा नाष्टा देणेबाबत कळविलेले आहे. सदर व्यवस्था तपासणीच्या ठिकाणी भोजनगृहामार्फत करता येईल.

वरीलप्रमाणे व्यवस्था करणेबाबत रत्ना निधी चॅरीटेबल, ट्रस्ट यांनी कळविलेले आहे. सदर शिबीरासाठी त्यांनी ६२५ रुग्ण याचा लाभ घेतील असे कळविलेले आहे. परंतु हे रुग्ण येण्यासाठी किंवा रुग्णांना माहितीसाठी जाहिरात अथवा प्रचार कोण करणार आहे. याबाबत पत्रात नमुद केलेले नाही. तसेच शिबीराची तपासणी त्यांनी दि.०७ जुलै अशी कळविलेली आहे. एवढया कमी कालावधीत जाहीरात न करता रुग्ण जमा होणे अशक्य वाटते.

तरी वरीलप्रमाणे शिबीराचे नियोजन करुन सदर शिबीर दि.०७ जुलै ऐवजी ऑगष्ट- २००७ मध्ये आयोजित करण्यास व शिबीरासाठी होणाऱ्या अंदाजे रु.४०,०००/- खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.११** **प्रसादालय किराणा माल वाढीव खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत**
**निर्णय क्र.४६६** सन २००६-०७ मध्ये ( दि.०१.०५.२००६ ते दि.३०.०४.२००७ अखेर) प्रसादालय व कॅन्टीन विभागाचे दैनंदिन वापरासाठी आवश्यक किराणा माल खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०२.२००६ निर्णय क्र.११६ नुसार मान्यता मिळालेली असून त्यानुसार खरेदी करणेत येत होता.

**अ)** प्रसादालयामार्फत साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडे नव्याने प्रसादभोजन स्वयंसेवी कक्ष सुरु करणेत आलेला असून दररोज सुमारे ३५०० ते ४५०० साईभक्त त्या ठिकाणी प्रसाद भोजन घेत असतात. सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल मध्ये रुग्णांसाठी भोजनाची व्यवस्थाही प्रसादालयामार्फत करणेत आलेली आहे. मा.व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने जिल्हयातील पुरग्रस्त भागात पुर संपेपर्यंत नाष्टा पाकिटे पोहोच करणेत आलेली असून वेळोवेळी होणारे हरीनाम सप्ताह, पारायण आदी कार्यक्रमांना देणगी स्वरुपात संस्थानमार्फत शिधा देणे चालू आहे. त्यामुळे मालाचा खप हा खुपच वाढल्याने मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०६.०१.२००७ निर्णय क्र.४० नुसार काही मालाचे वाढीव खर्चास मंजूरी घेण्यात आलेली होती. मात्र यावर्षी श्री साईभक्तांची गर्दी फारच वाढलेली असून वाढीव मंजूरीचा मालही संपलेला आहे. परिणामी काही माल मंजूरीपेक्षा जास्त खरेदी करणेत आलेला आहे.

**ब)** संस्थानमार्फत एप्रिल २००७ मध्ये सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करणेत आलेला होता. सन २००६-०७ मधील पुरवठादारांचे वार्षिक मागणीचा पुरवठा पुर्ण झालेने व सन २००७-०८ ची खरेदीची कार्यवाही चालू असलेने प्रसादालय विभागाने तातडीने हरबराडाळीची मागणी केलेली होती. त्यानुसार वार्षिक पुरवठाधारकांशी दूरध्वनीवरुन संपर्क साधून फॅक्सवर दरपत्रक मागणी करणेत येऊन रु.३,२७५/- प्रती क्विंटल या न्युनतम दराने २०० क्विंटल हरबराडाळ खरेदी करणेत आलेली होती. मात्र साईभक्तांची गर्दी फारच वाढलेने मागविणेत आलेली डाळ प्रसादलाडूसाठी वापरणेत आलेली असून विवाह सोहळयासाठी पुन्हा त्याच दराने १५० क्विंटल हरबराडाळ अशी एकुण ३५० क्विंटल हरबराडाळ खरेदी करणेत आलेली आहे.

**क)** मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार प्रसादालय किराणा माल पुरवठा कालावधी वर्ष एप्रिल २००७ ते मार्च २००८ असे केलेले आहे. मात्र सन २००७-०८ चा पुरवठा आदेश देऊन माल खरेदी करणेस एक ते दिड महिन्याचा कालावधी लागलेला आहे. या कालावधीत सन २००६-०७ चे पुरवठादारांकडून मान्य दराने माल खरेदी करणेत आलेला आहे.

उपरोक्तप्रमाणे जादा खरेदी करणेत आलेल्या मालाचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | मालाचा तपशिल | जादा खरेदी क्विंटलमध्ये | दर प्रति क्विंटल | एकुण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| | **प्रसादलाडूंसाठी लागणारा किराणा माल** | | | |
| १ | हरबराडाळ | १९०.३२ | २६८७.०० | ५११३८९.८४ |
| | | ३४२.५८ | ३२७५.०० | ११२१९४९.५० |
| २ | गावरान तूप (दुसरी सहामाही) | १४०१.५३ | ११५.०० | १६११७५९५.०० |
| ३ | काजू तुकडा | २३.७१ | २३१९२.०० | ५४९८८२.३२ |
| ४ | हिरवी विलायची | ३.८० | ४०५६०.०० | १५४१२८.०० |
| ५ | प्लॅ.पिशवी -लाडू पॅकेट | ५७.८५ | १०४००.०० | ६०१६४०.०० |
| | | | | **१९०५६५८४.६६** |
| | **नाष्टा पाकिटे व प्रसाद भोजनासाठी लागणारा किराणा माल** | | | |
| ६ | खादयतेल | २५०.०८ | ५०६५.०० | १२६६६५५.२० |
| ७ | वनस्पती तूप | ६९.२० | ४९९३.०० | ३४५५१५.६० |
| ८ | वाटाणा | ३३.९५ | १६४१.०० | ५५७११.९५ |
| ९ | मठ | ५७.७५ | ३१२१.०० | १८०२३७.७५ |
| १० | प्लॅ.पिशवी ८"x१०" | २६.५० | ९५६८.०० | २५३५५२.०० |
| ११ | प्लॅ.पिशवी ४"x६" | २.१६ | ८६३२.०० | १८६४५.१२ |
| १२ | प्लॅ.पिशवी ३"x५" | २.३७ | ८६३२.०० | २०४५७.८४ |
| १३ | मिरची | ०.८३ | ४९५०.०० | ४१०८.५० |
| १४ | हळद | १२.०५ | ३७००.०० | ४४५८५.०० |
| १५ | जिरे | २.१८८ | ७५९२.०० | १६६११.३० |
| १६ | धने अखंड | ११.९३ | ३९००.०० | ४६५२७.०० |
| १७ | रवा | ७.४८ | १३३५.०० | ९९८५.८० |
| १८ | खोबरेवाटी | ८.२५३ | ५९२८.०० | ४८९२३.७८ |
| १९ | हिंग पावडर | १.२९५ | १३९३६.०० | १८०४७.१२ |
| २० | चिंच | ३.१२ | ३६४०.०० | ११३५६.८० |
| २१ | कच्चे पोहे | ०.७५ | १२६०.०० | ९४५.०० |
| २२ | पापड | ०.५० | ११९६०.०० | ५९८०.०० |
| २३ | आमसुल | २.५० | १५७५.०० | ३९३७.५० |
| २४ | बडीशोप | ०.१५ | ९९८४.०० | १४९७.६० |
| २५ | शहाजिरे | ०.१०० | ३२३४४.०० | ३२३४.४० |
| २६ | मसाला विलायची | ०.१९५ | १९९६८.०० | ३८९३.७६ |
| २७ | खसखस | ०.१०० | २२६७२.०० | २२६७.२० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २८ | खडा हिंग | ०.२५ | १४९७६.०० | ३७४४.०० |
| २९ | कॉफी | २.४५७ | १३५.०० | ३३१६९.५० |
| ३० | पत्रावळ | ४००००.०० | २४०.०० | ९६००.०० |
| ३१ | पॉलीकप | ५०००००.०० | १५९.७५ | ७९८७५.०० |
| ३२ | पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर-१/२ लिटर | ७९३६.०० | ३.६५ | २८९६६.४० |
| ३३ | बिस्कीटे १०० ग्रॅम | ३०१६०.०० | ४.०० | १२०६४०.०० |
| ३४ | मोनॅको/ टाईमपास-सॅक्स | ३२४.०० | ६.०० | १९४४.०० |
| | | | | **२६४०६१५.१२** |
| | | | **एकुण रक्कम रु.** | **२१६९७१९९.७८** |
| | | | पुर्णांकित रक्कम रु. | **२१६९७२००/-** |

माहे नोव्हेंबर २००६ ते एप्रिल २००७ अखेर ६ महिन्यात २.०४ कोटी प्रसादलाडूची विक्रमी विक्री झाल्याने त्यासाठी आवश्यक असणारी हरबराडाळ, गावरान तूप, काजू तुकडा, हिरवी विलायची व प्लॅस्टीक पिशवीचा खप जास्त दिसत असून त्यासाठी रु.१,९०,५६,५८५/-जादा खर्च झालेला आहे. तसेच नाष्टा पाकिटांचीही ११.०३ लक्ष विक्री झाल्याने तेल, मिरची, मठ, वाटाणा,प्लॅस्टीक पिशवीचा खप वाढलेला दिसत असल्याने त्यासाठी व इतर प्रसादभोजनासाठी रु.२६,४०,६१५/- असा एकुण रु.२,१६,९७,२००/- जादा खर्च झालेला आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे 'अ','ब, व 'क' चे झालेल्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१२** **बेडशिट खरेदीस मान्यता मिळणे बाबत**
**निर्णय क्र.४६७** संस्थानमार्फत नव्याने बांधण्यात आलेले साईनिवास अतिथीगृह येथे २४ एसी व्हीआयपी रुम्स आहेत. या ठिकाणी मा.अध्यक्ष, विश्वस्त व येणारे मान्यवर तसेच साईभक्तांची व्यवस्था केली जाते, सदरील इमारत चालू केली त्यावेळी खरेदी करणेत आलेले बेडशीट व उशीकव्हर हे वारंवार वापरामुळे खराब झालेले आहेत. त्यामुळे येथील २४ रुम्सकरीता चांगल्या प्रतीचे बेडशीट व उशीकव्हर खरेदी करणे गरजेचे आहे. तरी खालीलप्रमाणे बेडशीट व उशीकव्हर तातडीने खरेदी करावे लागतील असे नम्र मत आहे.

| अ.नं. | तपशिल | मागणी | अंदाजे दर रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | बेडशीट सेट- सिंगल बेड, बॉम्बे डाईंग-गोल्डलाईन साईज :६० x ९० (१ बेडशीट + १ उशीकव्हर) | १०० सेट | २५०/- प्रती सेट | २५,०००/- |
| ०२. | बेडशीट सेट- डबल बेड, बॉम्बे डाईंग-गोल्डलाईन साईज :९० x १०० (१ बेडशीट + २ उशीकव्हर) | १५० सेट | ४५०/- प्रती सेट | ६७,५००/- |
| | | | एकुण रक्कम | ९२,५००/- |

उपरोक्त बॉम्बे डाईंग- गोल्डलाईन बेडशीट खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.९२,५००/-पर्यंतचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.(कार्यवाही-चौकशी व निवासस्थान प्रमुख/अधिक्षक,खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१३** **सन २००७-२००८ खिसमिस खरेदी करणेबाबत**
**निर्णय क्र.४६८** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१७.०२.२००६ मधील निर्णय क्र.१५०(अ) नुसार सन २००७-०८ मध्ये प्रसादलाडूसाठी आवश्यक असणारा २५ क्विंटल खिसमिस कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पिंपळगांव बसवंत, तासगांव, सांगली व पंढरपूर येथील मोंढयावरुन जाहिर लिलावाने तसेच मे.प्रवरा फळे भाजीपाला व प्रक्रिया खरेदी विक्री शेतकरी सहकारी संस्था मर्यादित, प्रवरानगर यांचेकडून खरेदी करणेस व अहमदनगर येथील शितगृहात ठेवणेस मान्यता मिळालेली आहे. सन २००६-०७ मध्ये जादा खिसमिस खरेदी करणेत आलेला असल्याने सन २००७-०८ मध्ये कमी खिसमिसची मागणी केलेली होती. मात्र श्री साईभक्तांची गर्दी खुपच वाढल्याने व प्रसादलाडूच्या विक्रीत वाढ झाल्याने ७५ क्विंटल जादा खिसमिस खरेदी करणेस मा.व्यवस्थापन समिती सभा दि.३०.०४.२००७ निर्णय क्र.३३९ नुसार मान्यता मिळालेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयानुसार दि.२८.०५.२००७ रोजी मा.विश्वस्त श्री अभंग सो. व श्री.वाबळे सो., यांचे उपस्थितीत अधिक्षक खरेदी विभाग यांनी तासगांव येथील मा.ॲड.आर. आर. पाटील शेतकरी सह. खरेदी विक्री संघ लि., येथील खिसमिसच्या मोंढयास भेट देऊन, नमुने पाहून लिलाव पद्धतीने ५१.०३५ क्विंटल खिसमिस खरेदी केलेला आहे.

तरी मा.विश्वस्तांचे उपस्थितीत मा.ॲड.आर.आर. पाटील शेतकरी सह. खरेदी विक्री संघ लि., तासगांव येथून खरेदी करणेत आलेल्या ५१.०३५ क्विंटल खिसमिस खरेदीस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.४,०२,७८१/-चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४** **सुरक्षा अनामत रक्कम परत करणेबाबत**

**निर्णय क्र.४६९** सन २००६-०७ करीता संस्थानचे विदयुत, ध्वनीक्षेपण, पाणीपुरवठा विभागासाठी आवश्यक असणारे इलेक्ट्रिकल्स व प्लंबींग साहित्य खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१९.०८.२००६ निर्णय क्र.५८१ नुसार संबंधितांना न्युनतम दराने एकुण ०८ पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देणेत आलेले होते. त्यापैकी ०४ पुरवठाधारकांनी सर्व साहित्याचा मागणी प्रमाणे पुरवठा पुर्ण केलेला आहे. निविदेतील शर्ती व अटीनुसार पुरवठा करावयाची हमी म्हणून साहित्याच्या एकुण रकमेच्या ५ टक्के रक्कम सुरक्षा अनामत म्हणून पुरवठा कालावधी वर्षात संस्थानकडे जमा असते. पुरवठाधारकाने एखादया साहित्याचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा पुरवठा न केल्यास सदरील साहित्य हे आवश्यकतेनुसार खरेदी करणेत येऊन जादा येणारी रक्कम संबंधित पुरवठाधारकांचे सुरक्षा अनामत रकमेतून वसुल करणेत येत असते.

खालील पुरवठाधारकांनी अपुर्ण साहित्याचा पुरवठा केल्याने संस्थान कामात वेळोवेळी अडचण निर्माण झालेली आहे. त्यांना वारंवार दूरध्वनी करुन तसेच लेखी कळवूनही त्यांनी साहित्याचा मागणीप्रमाणे पुरवठा पुर्ण केलेला नाही. त्याचा तपशिल-

| अ.नं | पुरवठाधारकाचे नांव | पुरवठाआदेशाची रक्कम रुपये | केलेला पुरवठा रक्कम रुपये | शिल्लक पुरवठा रक्कम | पुरवठा प्रमाण टक्केवारीत |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | शहा ट्रेडींग कंपनी, श्रीरामपूर | १६,१५,१०९/- | ७,५९,८३७/- | ८,५५,२७२/- | ४७.०४% |
| ०२. | काशिको ट्रेडींग कंपनी, कोपरगांव | ६,४३,३९६/- | ३,२३,०९२/- | ३,२०,३०४/- | ५०.२१% |
| ०३. | पुजा इलेक्ट्रिकल्स, मुंबई | २,८५,५२४/- | २,०७,०३९/- | ७८,४८५/- | ७२.५१% |
| ०४. | इंटरनॅशनल इलेक्ट्रिकल्स, अ.नगर | १,३५,४४४/- | ६८,१२३/- | ६७,३२१/- | ५०.२९% |

उपरोक्त पुरवठाधारकांची ५% सुरक्षा अनामत रक्कम संस्थान खाती जमा असून त्यांनी सदरची अनामत रक्कम परत मिळणेची मागणी केलेली आहे. मागणी करणेत आलेल्या साहित्याचा सन २००६-०७ मध्ये १००% पुरवठा न झाल्याने, विदयुत विभागाने सन २००७-०८ मध्ये त्यातील काही साहित्याची पुन्हा मागणी केलेली आहे. त्यामुळे पुरवठा न झालेल्या साहित्याचे दर हे वाढीव येण्याची शक्यता आहे. पुरवठा न झालेले साहित्य बाजारभावाने खरेदी केलेले नाही त्यामुळे संस्थानचे नुकसान झालेले नाही मात्र पुरेशा पुरवठयाअभावी संस्थान कामात अडचण निर्माण झालेली आहे.

तरी उपरोक्त पुरवठाधारकांनी पुरवठा आदेशानुसार १००% मालाचा पुरवठा न केल्याने त्यांची ५% सुरक्षा अनामत रकमेपैकी काही रक्कम दंडात्मक रक्कम म्हणून कपात करावयाची किंवा संस्थानकडे जमा असलेली त्यांची ५% अनामत रक्कम परत करावयाची याबाबत निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त पुरवठाधारकांनी पुरवठा आदेशानुसार १००% मालाचा पुरवठा न केल्याने त्यांची पुरवठा न केलेल्या एकूण साहित्याच्या रकमेच्या १ % सुरक्षा अनामत रक्कम दंड म्हणून जप्त करण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **संगणक प्रि-प्रिन्टेड प्रसाद पाकिटे छपाईबाबत.**

**निर्णय क्र.४७०** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२०.०५.२००७ मधील निर्णयानुसार संगणक प्रि-प्रिंटेड उदीप्रसाद पाकिटे-८३,००० शिटस (४लाख नग पाकिटे) खरेदीकामी मे.क्लासिक ऑफसेट, श्रीरामपूर यांना जा.क्र.८६२६ दि.०४.०६.२००७ अन्वये रु.१७३८.८५ प्रती हजारी शिटस या न्युनतम दराने रक्कम रु.१,४४,३२४.५५चा पुरवठा आदेश देणेत आलेला आहे. त्यांचे व इतर कोटेशनधारकांचे दरांचा तुलनात्मक परिशिष्ट खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव व गांव | कोटेशनमधील दर प्रती हजारी शिटस | सुट | अंतिम दर प्रती हजारी शिटस |
|---|---|---|---|---|
| ०१. | प्रिमीअर डाटा फॉर्म्स प्रा.लिमीटेड, मुंबई | रु.२१७५/- + ४%व्हॅट = रु.२२६२/- | अनुपस्थित | रु.२१७५/-+४%व्हॅट = रु.२२६२/- |
| ०२. | क्लासिक ऑफसेट, श्रीरामपूर | रु.२०९५/- (व्हॅटसह) | १७% सुट | रु.१७३८.८५(व्हॅटसह) |
| ०३. | साई डाटा फॉर्म्स, मुंबई | रु.२३५०/- + ४%व्हॅट = रु.२४४४/- | अनुपस्थित | रु.२३५०/-+४%व्हॅट = रु.२४४४/- |
| ०४. | कुलोडे बिझनेस फॉर्म्स, मुंबई | रु.२४९५/- + ४%व्हॅट = रु.२५९५/- | अनुपस्थित | रु.२४९५/-+४%व्हॅट = रु.२५९५/- |

पुरवठा आदेशानुसार मे.क्लासिक ऑफसेट, श्रीरामपूर यांनी दि.१८.०६.२००७ रोजी ३००० शिटसचा पुरवठा केलेला आहे. तसेच पुरवठा केलेले शिटस प्रत्यक्ष मशीनवर पुरवठाधारकांसमोर वापरणेत आलेले असून पेपर कमी जीएसएमचा वापरल्याने शिटसच्या घडया व्यवस्थित होत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. परिणामी प्रिंटींग व्यवस्थीत होत नसल्याने पुरवठाधारकास मागणीप्रमाणे पाकिटे पुरविणेबाबत

समक्ष सांगणेत आलेले होते. मात्र मे.क्लासिक ऑफसेट यांनी दि.२०.०६.२००७ रोजी पत्राने मागणीप्रमाणे पुरवठा करणेस असमर्थता दर्शविलेली असून पुरवठा आदेश रद्द करणेची विनंती केलेली आहे.

श्री गुरुपोर्णिमा उत्सव दि.२८ ते ३०.०७.२००७ असा साजरा होणार असल्याने उदीप्रसाद पाकिटे पाठविणे गरजेचे आहे. करीता द्वितीय पुरवठाधारक मे.प्रिमीअर डाटा, मुंबई यांना विचारणा केलेली असून ते त्यांचा दर रु.२२६२/-प्रती हजारी शिटस दराने छपाई करणेस तयार आहे. त्यांचे दराने ८३,००० शीटस छपाईस रु.१,८७,७४६/-खर्च येईल. मे.प्रिमीअर डाटा यांनी यापूर्वी संस्थेस वेळोवेळी मागणीप्रमाणे पाकिटाचा पुरवठा केलेला आहे. तसेच मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५.११.२००६ मधील निर्णयानुसार वार्षिक स्टेशनरी छपाईस रु.३१,६६,०००/-पर्यंतचे खर्चास मान्यता आहे.

तरी मे.प्रिमीअर डाटा फॉर्म्स प्रा.लि., मुंबई यांचेकडून पाकिटे छपाई करुन घेणेस व त्याकामी येणारे खर्चास तसेच मे.क्लासिक ऑफसेट, श्रीरामपूर यांचे नाव काळया यादीत समाविष्ट करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१६** **नविन प्रसादालयाकरिता एल.पी.गॅस यंत्रणा उभारणीकामी येणाऱ्या अंदाजे खर्चास व वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४७१** सध्या प्रसादालयामध्ये भोजन , अन्नपाकीट पदार्थ व मोतीचूर लाडू तयार करणेकामी एल.पी. गॅस चा वापर करीत आहोत. नविन प्रसादालयामध्येही एल.पी.गॅसचा वापर करणेचा आहे. त्याकामी अद्ययावत, धोकाविरहीत जास्तीत जास्त स्वंयचलित यंत्रणा उभारणे आवश्यक आहे.
सदर यंत्रणेमध्ये खालील बाबींचा समावेश आहे.

१) एल.पी. गॅस साठवण टँक - माउंडेड पध्दतीच्या प्रत्येकी १० टन क्षमतेच्या टाक्या - २
२) २०० किलो गॅम प्रति तास क्षमतेचा व्हेपरायझर नग - १
३) डिकॅन्टींग पंप व शेड नग - १
४) कॉम्प्रेसर फॉर डिकॅन्टींग व शेड - १
५) स्वंयचलित व निमस्वयंचलित फायर हायड्रंट यंत्रणा
६) फ्लेम प्रुप लाईटिंग व इतर इलेक्ट्रीक यंत्रणा व शेड
७) लिकेज डिटेक्शन यंत्रणा
८) न्युमॅटिक कंट्रोल वॉल्व्ह व इतर इन्स्टुमेंट
९) मेन पॅनल बोर्ड व शेड
१०) गॅस प्लॅन्ट ते किचन एल.पी.गॅस पाईप लाईन

उपरोक्त यंत्रणा उभारणीकामी मोठया प्रमाणावर खर्च होणार आहे. तसेच सदर यंत्रणा उभारणी ही विस्फोटक विभाग , भारत सरकार यांचे विहीत नियमावलीप्रमाणे होणे गरजेचे आहे. मा. व्यवस्थापन समिति दिं. २५/११/२००६ सभेतील निर्णय क्रं. ८८३, दिं. ६/१/२००७ सभेतील विषय क्रं. १५ वरील निर्णय क्रं. १५ तसेच दिं. १७/२/२००७ सभेतील निर्णय क्रं. ११३ अन्वये मे. सफेस क्वालीटी मॅनेजमेंट प्रा.लि., मुंबई यांची तज्ञ सल्लागार म्हणून नियुक्ती केलेली आहे.

मे.सफेस क्वालीटी मॅनेजमेंट प्रा.लि., मुंबई यांनी समक्ष गॅस प्लॅन्ट जागेची पहाणी केलेली असून त्यानूसार एल.पी. गॅस यंत्रणा उभारणीकामी आवश्यक निवीदा फॉर्म तयार करुन दिलेला असून एल.पी.गॅस यंत्रणा उभारणीसाठीचे अंदाजपत्रक दिलेले आहे. त्यानूसार उपरोक्त संपूर्ण एल.पी.गॅस यंत्रणा उभारणीकामी अंदाजे रु. २,००,००,०००/- ( अक्षरी रु. दोन कोटी मात्र ) खर्च अपेक्षीत असल्याचे नमूद केलेले आहेत.

सदर यंत्रणा उभारणीकामी मोठयाप्रमाणात खर्च होणार असल्याने वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निवीदा मागविणे गरजेचे आहे. मात्र निवीदा मागवितांना ज्या एजन्सी विस्फोटक विभाग , भारत सरकार यांचे अधिकृत मान्यताप्राप्त यादीमध्ये समाविष्ट असेल अशा एजन्सीनींच निवीदा भराव्यात असे नमूद करणे योग्य राहील. जेणेकरुन कुणीही अनधिकृत व काम करण्याची क्षमता नसलेल्या एजन्सीने निवीदा भरुन दर्जाहिन व विस्फोटक विभागाचे नियमावलीस सोडून काम होऊ नये असे वाटते.

तरी नविन प्रसादालयाकरीता एल.पी. गॅस यंत्रणा उभारणीकामी येणा-या अंदाजे रु.२ कोटी खर्चास व यंत्रणा उभारणीकामी महाराष्ट्रातील वृत्तपत्रात जाहिरात देउन निवीदा मागविण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१७** **श्रीसाईबाबा हॉस्पिटलसाठी वाढीव लोड महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून मिळणेसाठी कंपनीने कळविलेली रक्कम भरणे बाबत**

**निर्णय क्र.४७२** श्री साईबाबा हॉस्पिटल व साईनगर परीसराकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून २०० के.व्ही.ए. डिमांड असलेला उच्च दाबाचा वीज पुरवठा सन १९९४ साली घेतलेला असून त्याठिकाणी ५०० केव्हीए

क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर बसवून उच्च दाबाचे वीज पुरवठयाचे लघु दाबात रुपांतर करुन त्याचे वितरण केले जाते.या परीसरातील लोड तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं | तपशील | लोड किलो वॅट |
|---|---|---|
| अ) | पूर्वीचा **लोड** | |
| ०१ | रूग्णालय | ०३६ |
| ०२ | साईनगर कर्मचारी वसाहत | १३२ |
| | एकुण :- | १६८ |
| ब) | **सध्याचा लोड** | |
| ०१ | कॅथलॅब | ०५० |
| ०२ | सी.टी.स्कॅन | ०५० |
| ०३ | सेन्ट्रल ए.सी. | ०५० |
| ०४ | एम.आर.आय. | १५० |
| ०५ | ऑपरेशन थिएटर - ऑटोक्लेव्ह वगैरे | १०६ |
| ०६ | रुग्णालय लाईटिंग | ००७ |
| ०७ | साईनगर कर्मचारी वसाहत | १३२ |
| | एकुण :- | ५४५ के.डब्ल्यू |
| | ८० % डायव्हरसिटी | ४३६` .डब्ल्यू |
| | ८० % डायव्हरसिटी | ३५०` .व्ही.ए. |

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या संदर्भीय पत्र क्र. अअ, अनगर /प्रविका /टेक/ एच.टी.-२८१ / ८७५३ दिनांक १३-०९-१९९६ (१) नुसार, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून वरील एच.टी. ग्राहक क्रमांक १६५१८-९००४४२- ६ ( फाईल क्रमांक २८१) या श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता असलेल्या एच.टी. सप्लायसाठी २०० केव्हीए इतका लोड मंजुर असून संस्थानची त्या ठिकाणची आवश्यकता, गेल्या काही महिन्यात पाहिली असता ३५० केव्हीए च्या आसपास आहे.

त्याकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे वाढीव वीजपुरवठ्याकामी विहीत नमुन्यातील कागदपत्रे पाठवून लोड २०० केव्हीए ऐवजी ३५० केव्हीए इतका वाढवून मिळणेबाबत पत्रव्यवहार केला होता. हे सर्व लक्षात घेता वरील संदर्भीय विषयानुसार संस्थान परीसरासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून वरील एच.टी.कन्झ्युमर क्रमांक १६५१८-९००४२-६ ( फाईल क्रमांक २८१) या एच.टी. सप्लाय ग्राहक क्रमांकावरील लोड वाढवून मिळणेबाबत संस्थानने पत्रव्यवहार केलेला होता. मा.अधिक्षक अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,अहमदनगर यांनी वरील संदर्भीय पत्र क्र.एसई/एएनआरसी / टेक / ५१६६ / दिनांक :-१७-०४-२००७ पाठवून संस्थानची वाढीव लोडची मागणी मान्य केल्याचे व त्यापोटी खालील प्रमाणे रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ , अहमदनगर यांचे कडे भरणेबाबत कळविले आहे.

| अ.क्र. | तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१ | फिक्स्ड सर्व्हिस कनेक्शन चार्जेस | १५,०००.०० |
| ०२ | इन्स्टालेशन टेस्टींग फी | ०००.०० |
| ०३ | १.३ % नॉन रिफंडेबल सुपरव्हीजन चार्जेस | ०४,२००.०० |
| ०४ | टेस्टींग ऑफ मीटरींग इक्विपमेंट | ००,२००.०० |
| ०५ | सिक्युरीटी डिपॉझीट | ३,२५,५००.०० |
| ०६ | कॉस्ट ऑफ ॲग्रीमेंट ॲड बुकलेट फी | २५०.०० |
| ०७ | ॲप्लिकेशन ॲण्ड रजिस्ट्रेशन फी | १,०००.०० |
| | एकुण रुपये | ३,४६,१५०.०० |

या वीजपुरवठ्याचे (वीजवापराचे ) आवश्यक असणारे ट्रायव्हेक्टर मीटर व क्युबिकल बॉक्सबाबत त्यांनी उपरोक्त पत्रात ट्रायव्हेक्टर मीटर व क्युबिकल बॉक्स संस्थानने खरेदी करून बसवून घ्यावा असे कळविले आहे व सोबत या ट्रायव्हेक्टर मीटर व क्युबिकल बॉक्सच्या ॲप्रुव्हड मेकची यादी दिली आहे.

दिनांक ०६-०१-२००७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील मे. आदिति इलेक्ट्रिकल्स, नासिक यांना नविन प्रसादालयाच्या इलेक्ट्रिफिकेशनच्या कामासाठी रु. ३,०३,९९,६६१.१५ इतक्या रकमेचा कार्यादेश संस्थान पत्र क्र. एसएसएस / विद्युत / ६५१ / २००७ दिनांक १२-०१-२००७ अन्वये देण्यात आलेला आहे. नविन प्रसादालयाचे काम महाराष्ट्र शासनाच्या सी.एस.आर. रेटवर आधारीत आहे. व या सी. एस. आर मध्ये सी. एस.आर कोड १०-५-२ नुसार ट्रायव्हेक्टर मीटर व क्युबिकल बॉक्सची किंमत रु.१,३९,०९८.७५ व सी.एस. आर कोड १०-४-५ नुसार ऑईल सर्किट ब्रेकरची किंमत रु.१,७४,११६.२५ मिळून रु.३,१३,२१५.०० इतका खर्च अपेक्षित आहे. नविन प्रसादालयाचे दिलेले काम हे महाराष्ट्र शासनाच्या सी .एस . आर . रेटवर आधारीत आहे. त्यामुळे मे. आदिति इलेक्ट्रिकल्स, नासिक यांचे कडून सी. एस .आर . रेटवर श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी लागणारे ट्रायव्हेक्टर मीटर व क्युबिकल बॉक्स व ऑईल सर्किट ब्रेकर पुरवून बसवून चालू करण्याचे काम व खालील अनुषंगिक कामे करुन घेता येईल. ट्रायव्हेक्टर मीटर व क्युबिकल बॉक्स बसविताना हाय टेन्शन

केबल, केबल जॉईंट, अर्थिंग वगैरे अनुषंगिक कामे करावी लागणार आहेत. त्यासाठी सीएसआर रेटनुसार रु.१,००,०००.०० इतका खर्च अपेक्षित आहे.

श्रीसाईबाबा हॉस्पिटलचा इलेक्ट्रिकलचा लोड वाढल्यामुळे त्याठिकाणी असणारा जुन्या डिस्ट्रिब्युशन पॅनेलची क्षमता कमी पडत असून त्याऐवजी नविन जादा क्षमतेचा डिस्ट्रिब्युशन पॅनेल बसवावा लागणार आहे. या डिस्ट्रिब्युशन पॅनेलसाठी सी. एस. आर रेट नुसार रु. १०,००,०००.०० इतका खर्च अपेक्षित आहे. हे काम वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागवून करून घेता येईल.

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी वाढीव लोड महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून मिळणेसाठी लागणा-या (१) रु. ३,४६,१५०.००+ (२). रु.३,१३,२१५.०० + (३) रु. १,००,०००.०० + (४) रु. १०,००,०००.०० मिळून रु.१७,५९,३६५.०० इतका खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१८** **श्रीरामनवमी उत्सव-२००७ मध्ये मंदीर परिसरात गेटमध्ये उभारलेल्या देखाव्यासाठी श्रीद्वारकामाई मंडळ, मुंबई यांनी भाडे तत्वावर आणलेल्या साहित्याचे भाडे आदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४७३** " श्री रामनवमी उत्सव - २००७ " हा दिनांक २६-०३-२००७ ते दिनांक २८-०३-२००७ अखेर साजरा करण्यात आला आहे. श्री रामनवमी उत्सवामध्ये गेल्या २९ वर्षापासून विद्युत रोषणाई करणेसाठी येणाऱ्या मुंबई येथील श्री द्वारकामाई मंडळ, मुंबई यांचेमार्फत प्रतीवर्षाप्रमाणे या उत्सवात " लेणी व वीणा देखावा " उभा केलेला होता. हा देखावा दिनांक २०-०४-२००७ पर्यंत श्री साईबाबा संस्थानचे परिसरात भक्तांना पाहणेसाठी ठेवला होता.

याबाबत श्री द्वारकामाई मंडळ, मुंबई यांनी आता एक पत्र दिले असून त्यात, गेल्या २९ वर्षापासून श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांच्यामार्फत प्रतिवर्षी श्री रामनवमी व श्री पुण्यतिथी उत्सवात विविध प्रकारचे देखावे सादर केले जातात. या वर्षी श्री रामनवमी ऊत्सवात लेणी व वीणा देखावा उभा केलेला होता. हा देखावा उत्सवानंतर काही दिवस भक्तांना पाहणेसाठी दिनांक १८-०४-२००७ पर्यंत श्री साईबाबा संस्थानचे परिसरात भक्तांना पाहणेसाठी ठेवला होता. या देखाव्यासाठी दिनांक १५-०३-२००७ ते दिनांक ३०-०३-२००७ पर्यंत ४०० फळयांचे १५ दिवसाचे एकुण भाडे रू.४०० X १५ X १०= रु. ६०,०००.०० इतकेच पूर्वी आमच्याकडून कळविले गेले. व ते आम्हाला संस्थानमार्फत आदा करण्यात आलेले आहे. हा देखावा उत्सवानंतर काही दिवस भक्तांना पाहणेसाठी दिनांक २०-०४-२००७ पर्यंत श्री साईबाबा संस्थानचे परिसरात भक्तांना पाहणेसाठी ठेवला होता. या काळातील ४०० फळयांचे २० दिवसाचे एकुण भाडे रू.४०० X २० X १०= रु. ८०,०००.०० इतके झाले आहे. एवढी मोठी रक्कम संबंधितांना आदा करावी लागणार असून त्यातील ५० टक्के रक्कम आम्ही डेकोरेटर्स वर्गणी करून आदा करण्याची व्यवस्था करीत आहोत. व राहिलेली ५० टक्के रक्कम रु.४०,०००.०० इतकी संस्थानकडून मिळावी, अशी या पत्राद्वारे विनंती करीत आहोत.तरी उपरोक्त रक्कम रुपये ४०,०००.०० (रुपये चाळीस हजार मात्र ) श्री व्दारकामाई मंडळास श्री.शशिकांत एकनाथ दळवी यांचे नांवे व आंध्र बॅक, शिरडी शाखेच्या चेकद्वारे मिळावी, अशी विनंती केलेली आहे.

" श्री रामनवमी उत्सव - २००७ " मध्ये मंदिर परीसरात गेटमध्ये दिनांक ०१-०४-२००७ ते दिनांक २०-०४-२००७ पर्यंत देखावा ठेवण्यासाठी भाडे तत्त्वावर आणलेल्या साहित्यासाठी आलेला खर्च पुढीलप्रमाणे :-

| | | |
|---|---|---|
| ०१) | दिनांक ०१-०४-२००७ ते दिनांक २०-०४-२००७ पर्यंत<br>४०० फळयांचे २० दिवसाचे एकुण भाडे रू.४०० X २० X १० | = रु. ८०,०००.०० |
| ०२) | यापैकी द्वारकामाई मंडळाचे मागणीनुसार देय ५० % रक्कम | = रु.४०,०००.०० |

गेल्या २९ वर्षात श्री व्दारकामाई मंडळाकडून अशा प्रकारची मागणी प्रथमच होत आहे. व श्री व्दारकामाई मंडळाकडून अशा प्रकारची मागणी प्रथमच होत असल्याने मागणीनुसार देय एकुण रक्कमेच्या ५० % रक्कम रुपये ४०,०००.०० (रुपये चाळीस हजार मात्र ) श्री व्दारकामाई मंडळास आदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१९** **जुने काचेचे लॅम्प, ग्लोब लॅम्प राईट ऑफ करणेबाबत.**

**निर्णय क्र.४७४** सन १९९३ मध्ये ५०० रुमचे काम या इमारतीचे कन्सल्टंट, श्री.पठारे यांचे मार्गदर्शनाखाली चालू होते. त्यावेळी तत्कालीन मा.चेअरपरसन यांचे आदेशानुसार कन्सल्टंट यांचेमार्फत खालील बाबी खरेदी करुन ५०० रुममध्ये बसविण्यात आल्या होत्या.

०१). **ग्लोब लॅम्प :-** हा ग्लोब लॅम्प म्हणजे काचेची हंडी असून ती आरशावरील होल्डरवर बसविण्यात आली होती. गेल्या १४ वर्षातील दैनंदिन वापराने, उष्णतेने, वातावरणातील घटकांनी ह्या काचेच्या हंडया फुटत गेल्या. आता या काचेच्या हंडया शिल्लक नाहीत.

०२). **१०२८ वॅट लाईट :-** हे लाईट काचेच्या बल्ब टाईप होते. गेल्या १४ वर्षातील दैनंदिन वापराने हे उडालेले आहेत. त्याजागी आता साधे बल्ब बसविण्यात आलेले आहेत.

०३). **२५० वॅट सन / ई लॅम्प :-** हे लाईट सोडीअमव्हेपर लॅम्प असून गेल्या १४ वर्षातील दैनंदिन वापराने उडालेले आहेत.

सविस्तर तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | तपशील | संगणकाचा कोड व दिनांक | नग | किंमत |
|---|---|---|---|---|
| ०१) | ग्लोब लॅम्प सुटेबल फॉर फिटींग | LAMP / ००२ / १३-०३-९३ | १०६० नग | रु. २,०६,८९२.८० |
| ०२) | १०२८ डब्लु लाईट | LAMP / ००३ / ०२-०९-९३ | ०११३ नग | रु.०,७९,९०५.०० |
| ०३) | २५० वॅट सन / ई लॅम्प | LAMP / ००४ / १९-०६-९१ | ००१५ नग | रु.०,०७,३१४.०० |

वरील सर्व लॅम्प हे काचेचे आवरण असलेले व नाशवंत आहेत. हे लॅम्प १९९३साली बसविण्यात आले होते. दैनंदिन वापरात हे काचेच्या हंड्या/लॅम्प खराब झालेले आहेत, फुटलेले आहेत. मटेरीअल आल्यावेळी ते किरकोळ स्टॉकला घेण्यात येऊन खर्ची पडलेले आहे. ते आता राईट-ऑफ करणे गरजेचे आहे. आता उपरोक्त काचेच्या हंड्या / लॅम्प अस्तित्वात नसल्याने राईट-ऑफ करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२०** **मारुती ओमनी रुग्णवाहिका देणगीबाबत**
**निर्णय क्र.४७५** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे अंगिकृत असलेल्या श्री साईनाथ हॉस्पिटल व श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये अल्पदरात गरीब व गरजु रुग्णांवर उपचार केले जातात. दोन्ही हॉस्पिटलकडे रूग्ण ने-आण करणे कामी खालील प्रमाणे रूग्णवाहिका वापरात आहे.

| अ.नं. | वाहन क्रमांक | वाहन प्रकार |
|---|---|---|
| ०१ | एमएच-१७/टी-७१०१ | टाटा४०७ रूग्णवाहिका |
| ०२ | एमएच-१७/टी-७१४१ | टाटा४०७ रूग्णवाहिका |
| ०३ | एमएच-१७/टी-७१६१ | टाटा सुमो रूग्णवाहिका |
| ०४ | एमएच-१७/के-६६५१ | मारूती रूग्णवाहिका |
| ०५ | एमएच-१७/के-९५०१ | टेम्पो ट्रॅव्हलर कार्डीयाक रूग्णवाहिका |
| ०६ | एमएच-१७/टी-७१३१ | टाटा४०७ शववाहिका |

दि.०७/०६/२००७ रोजी मुंबई येथील साईभक्त सौ. दुर्गा शंकर चैनानी यांनी त्यांचे चिरंजीव कै. निलेश शंकर चैनानी यांचे स्मरणार्थ एक मारूती ओमनी रूग्णवाहिका (पेट्रोल), इन्शुरन्स, आर.टी.ओ. पासींग, रजिस्ट्रेशन, इ.चा खर्च करून देणगी दिलेली आहे. सदर रूग्णवाहिकेची किंमत रू.२,६४,५०७/- मात्र आहे, त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२१** **शिर्डी-नगरसुल रेल्वेस्टेशन-शिर्डी या मार्गावर बसेस संख्या वाढविणेबाबत**
**निर्णय क्र.४७६** दि.१७/०४/२००५ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.१५९ अन्वये, साईभक्तांचे सुखसुविधाकरीता शिर्डी-नगरसुल रेल्वेस्टेशन- शिर्डी या मार्गावर बससेवा ना नफा ना तोटा या तत्वावर सुरू करावे असे ठरले उपरोक्त निर्णयानुसार मा. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, श्रीरामपूर यांचेकडे सदर मार्गावर बससेवा सुरू करणे करीता परमिट मिळणे बाबत पत्रव्यवहार केला होता. आपले मागणीनुसार उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, श्रीरामपूर यांनी त्यांचे कडील जा.क्रं.९१३/२००५/परवाना/उपप्रापका/श्रीपूर/ २००५ ने प्रायव्हेट सर्व्हिस व्हेईकल (Charity Basis) या प्रयोजनासाठी परवाना मंजुर केलेला आहे. त्यानुसार सदर मार्गावर आपल्या दोन बसेस चालु आहेत. सदर बसेस ला साईभक्तांकडुन चांगला प्रतिसाद मिळत आहे.

दि.१०/०६/२००७ चे संदर्भिय पत्राने, पोलीस निरीक्षक, येवला यांनी, येवला तालुका पोलीस स्टेशन हद्दीतील नगरसुल या रेल्वेस्टेशन वरून हैद्राबाद (आंध्र.) तसेच तामीळनाडू राज्यातून (१) काचीगुडा एक्सप्रेस (२) काकीनाडा एक्सप्रेस व (३) तिरूपती एक्सप्रेस या रेल्वेने हजारो साईभक्त शिर्डी येथे दर्शनासाठी येत असतात व सदरच्या रेल्वे ह्या फक्त नगरसुल रेल्वेस्टेशन पर्यंतच असतात. तेथून त्यांना शिर्डी येथे जाणेसाठी आपले संस्थानने दोन बसेसची व्यवस्था केलेली आहे. परंतू दोन बसेस अपुर्ण पडत असलेने संबंधित साईभक्तांचे जाणे येण्याचे हाल होवून अवैध प्रवासी वाहातूकीस उत्तेजन मिळत आहे. तरी सदर प्रकरणी लक्ष देवून आपले संस्थेच्या बसेसची संख्या वाढविणे बाबत विनंती केलेली आहे.

परंतु, शिर्डी-नगरसुल रेल्वेस्टेशन-शिर्डी या मार्गावर सध्या चालू असलेल्या बसेस चालु करणेपुर्वी एस.टी.महामंडळाकडून नाहरकत प्रमाणपत्र न घेतल्याने एस.टी. महामंडळाने त्यांचेकडील पत्र (१) जा.क्रं.राप/नाशिक/वाह/चालन/९३०/दि.१९/०७/२००६ वि.नि.का.नाशिक, (२) जा.क्रं.राप/ अ.नगर/ वाह/चालन/९४८५/दि.०७/०८/२००६ वि.नि.का. अहमदनगर ने शिर्डी-नगरसुल रेल्वेस्टेशन- शिर्डी या मार्गावरील बससेवा त्वरीत बंद करावी असे कळविले आहे. परंतु साईभक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून त्या बसेस अद्याप पर्यंत चालु आहेत.

दि.०३/०६/२००६चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील, निर्णय क्रं.३९२ अन्वये, रोटेगांव (वैजापूर) रेल्वेस्टेशन येथे बसेस चालू करणेस मान्यता मिळालेली आहे. परंतु एस.टी. महामंडळाकडून (NOC) ना हरकत प्रमाणपत्र मिळत नसलेने प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद हे सदर मार्गासाठी परमिट देत नाही, त्यामुळे आजपावेतो बसेस चालू करता आलेल्या नाहीत.

त्यामुळे पोलीस निरीक्षक, येवला यांचे विनंती पत्रानुसार सदर मार्गावर जादा बसेस चालू करणेपुर्वी एस.टी.महामंडळाकडून ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल. ना हरकत प्रमाणपत्र मिळाले नंतर नवीन बसेस खरेदी करता येतील असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी-नगरसुल रेल्वेस्टेशन-शिर्डी या मार्गावर संस्थानतर्फे बसेस वाढविण्याऐवजी तूर्त प्रायोगिक तत्वावर खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या एजन्सीकडून पाच बसेस भाडेतत्वावर लावणेकामी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन, निविदा मागविण्यात यावीत व त्यांचेकडून साईभक्तांची ने-आण करण्यात यावी,असें ठरले. (कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२** **न्यासाच्या/समितीच्या वाहनांचा खाजगी कारणासाठी वापर**

**निर्णय क्र.४७७** विधी व न्याय विभाग पत्र क्रं.संकिर्ण २००७/२०३/(३२)-का.सोळा, दि.०२ जून २००७चे संदर्भिय पत्राने न्याय व विधी विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी न्यासाचे / समितीचे कोणते ही वाहन न्यासाच्या / समितीच्या सदस्यांना / कर्मचाऱ्यांना कोणत्याही खाजगी कामासाठी वापरता येणार नाही. असे कळविले आहे.

शासनाचे संदर्भिय पत्राप्रमाणे, जा.नं.९४८६/ दि.१९/०६/२००७ ने मा.अध्यक्ष / उपाध्यक्ष / सदस्य तसेच जा.क्रं.१५४६ दि.१८/०६/२००७ ने अधिकारी / कर्मचारी यांना न्यासाच्या / समितीच्या वाहनांचा खाजगी कारणासाठी वापर करता येणार नाही. असे कळविलेले आहे.

दि.१९-२० जानेवारी, २००२ चे मा. व्यवस्थापन मंडळाचे सभेतील निर्णय क्रं.४२ अन्वये, मा. विश्वस्त व अधिकारी हे अकस्मित प्रसंगी वाहनांचा खाजगी कामासाठी वापर करीत असतात. या वाहनांचे वापरा करीता ए.सी. वाहनांसाठी प्रति कि.मी. रू.५/- व नॉन ए.सी. वाहनासाठी प्रति कि.मी. रू.४/- प्रमाणे दर निश्चित करण्यात येऊन दि.२१ जानेवारी, २००२ पासून अमलात आणण्यात यावेत. असे ठरलेले आहे. या निर्णयाच्या अनुषंगाने, उपलब्ध असलेली वाहने मा. सदस्य / अधिकारी यांचे मागणीनुसार खाजगी कामाकरीता देण्यात येतात. तसेच निश्चित केलेल्या दरानुसार कि. मी. प्रमाणे झालेला सेवाआकार त्यांचेकडून वसुल करण्यात येतो. या बाबत कोणाची ही तक्रार नाही.

दि.१९/०६/२००७ ने मा. प्रधान सचिव विधी व न्याय विभाग यांचेकडे, खाजगी वाहने अकस्मित प्रसंगी उपलब्ध होत नसलेने मा.अध्यक्ष / उपाध्यक्ष / सदस्य तसेच अधिकारी / कर्मचारी यांना अकस्मित प्रसंगी न्यासाच्या / समितीच्या वाहनांचा खाजगी कामाकरिता वाहन वापरास मान्यता देणे बाबत पुनर्रविचार करणे बाबत पत्र देण्यात आलेले आहे त्याची नोंद घेण्यात आली.

तरी न्यासाच्या / समितीच्या वाहनांचा खाजगी कामाकरिता वापर न करणे बाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्याची नोंद घेण्यात आली. तथापि शासनाकडून उपरोक्त दिनांक १९.६.२००७ चे पत्रास अनुसरुन मान्यता येईपर्यन्त आकस्मीत प्रसंगी मा.विश्वस्त व अधिकारी यांचेसाठी पूर्वीचे कार्यपध्दतीनुसार वाहनांचा वापर चालू ठेवावा व त्यासाठी ए.सी.वाहनाकरिता रु.६/- प्रती कि.मी. व नॉन ए.सी. वाहनाकरिता रु.५/- प्रति कि.मी. असे सुधारित दर निश्चित करण्यात आले.

सदर आदेशाचे कार्यवाही दिनांक ०१/०७/२००७ पासून करण्यात यावी.

(कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३** **सादिल स्वरुपाचे टाकाऊ निरुपयोगी भंगार साहित्य वार्षिक उच्चतम दराने स्थानिक परिसरातील खरेदीदारांकडून निविदा मागवून विक्री करणे बाबत**

**निर्णय क्र.४७८** रुग्णालयाकडील रिकाम्या सलाईनच्या प्लॅस्टिकच्या/ काचेच्या बाटल्या सिरींज, चहा/कॉफीचे वापरलेले पॉलीकप, औषधाचे रिकामे प्लॅस्टिकचे ड्रम, तेला-तूपाचे / काजूचे रिकामे ड्रम, बारदान, मिनरल वॉटर/औषधाचे रिकामे होणारे पुठ्ठाचे खोके, नारळाच्या शेंडया वगैरे सोबतच्या परिशिष्ठातील सादिल स्वरुपाचे टाकाऊ/निरुपयोगी भंगार साहित्य दैनंदिन वापरामुळे वारंवार जमा होत असते.

असे साहित्य वेळचेवेळी विक्री न केल्यास जागेचा तसेच सार्वजनिक आरोग्याच्या प्रश्न निर्माण होतो. वेळच्या-वेळी विक्री केल्याने विक्रीची रक्कम वेळोवेळी जमा होते. वरील बाबी विचारात घेता दरवर्षी व्यापाऱ्यांकडून निविदा मागवून वार्षिक उच्चतम दराने प्रचलित पध्दतीनुसार विक्री करण्यात येते.

महाराष्ट्र शासन अधिनियम क्रं.१४ मधील कलम नं.१७(४) मध्ये "विश्वस्त संस्थेमध्ये निहित केलेले पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक किमतीचे कोणतेही जडजवाहीर दागिने व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्व मंजूरी असेल त्याखेरीज समितीकडून विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रमीत करण्यात येणार नाहीत." अशी तरतूद आहे. सोबतच्या यादीतील वस्तू जडजवाहीर, दागीने व इतर मौल्यवान जंगम स्वरुपाच्या नाहीत. सबब त्यांची विल्हेवाट उपरोक्त प्रचलित पध्दतीनुसार लावण्यास हरकत नसावी अशी धारणा आहे. ती पक्की होणेबाबत मा.प्रधान सचिव व वरिष्ठ विधी

सल्लागार विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना जा.नं.एसएसएस/वशी-दप्तर/८५/७८११/०६ दि.१५/०६/२००६ चे पत्रानुसार प्रस्ताव सादर केला होता.

त्यावर विधी व न्याय विभागाने सा.सं.वि.२००६/५१२/(९०) का.सोळा दि.१८/०५/२००७ च्या पत्राने "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम,२००४ च्या कलम नं.१७(४) मध्ये नमूद केल्यानुसार, रु.५०,०००/- मुल्याच्या आतील, सादिल स्वरुपाच्या दैनंदिन वापरामुळे जमा होणाऱ्या टाकाऊ/ निरुपयोगी वस्तू वार्षिक दराने स्थानिक परिसरातील खरेदीदारांकडून निविदा मागवून व्यवस्थापन समितीने ठराव करुन त्याबाबत योग्य तो निर्णय घेणे योग्य होईल." असे कळविले आहे.

दरवर्षीच्या नेहमीच्या प्रचलित पध्दतीनुसार दि.०१/०४/२००७ ते दि.३१/०३/२००८ अखेर विक्री करणेच्या वस्तूंच्या निविदा संबंधीत व्यापाऱ्यांकडून मागवून दि.०७/०५/२००७ रोजी उच्चतम वार्षिक दर निश्चित करण्यात आलेले असून त्यानुसार संबंधीत व्यापाऱ्यांना त्यांचे मंजूर झालेले दर पत्राव्दारे कळविण्यात आलेले आहे.

यावर्षी नेहमीच्या प्रचलित पध्दतीनुसार कार्यवाही करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,दप्तर विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२४** **भंगार वस्तूच्या लॉटची जाहिर लिलावाने विक्री केलेल्या कार्यवाहीचा अहवाल.**
**निर्णय क्र.४७९** **अ)** दि.०५/०६/२००७ रोजी जाहीर लिलावाने विक्री केलेल्या लॉटची (लॉट नं.१४ खेरीज) माहिती खालील प्रमाणे.

| लॉट नं. | लॉटचा तपशील | अंतीम बोली | व्हॅटचा दर | व्हॅटची रक्कम | एकूण रक्कम | खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्याचे नाव/पत्ता/फोन |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | तांबे / कॉपर जॉब , जुना ताब्यांचा बंब संस्थान दप्तरी नोंद नसलेला | १०१०००.०० | ४ % | ४०४०.०० | १०५०४०.०० | राजेश इंटरप्राईजेस, पुणे, ९८५०६९८७८३ |
| ०२ | पितळी वस्तू | ११३०००.०० | ४ % | ४५२०.०० | ११७५२०.०० | हरिओम मेटल कॉर्पोरेशन, नाशिक, ९३७१०३०३२२ |
| ०३ | अॅल्यूमिनीयम | ४२०००.०० | ४ % | १६८०.०० | ४३६८०.०० | हरिओम मेटल कॉर्पोरेशन, नाशिक, (आर.बी.शेख) ९०९०४०५९५४ |
| ०४ | लोखंडी सामान | १४३०००.०० | ४ % | ५७२०.०० | १४८७२०.०० | न्यु इंडिया स्क्रॅप सेंटर, कोपरगांव, ९८५०८८१२१८. |
| ०५ | स्टील सामान | ८५०००.०० | ४ % | ३४००.०० | ८८४००.०० | आयुब मुझा शेख, शिर्डी |
| ०६ | इलेक्ट्रीक/इलेक्ट्रॉनिक्स/गोदरेज टायपरायटर मराठी / इंग्लिश तसेच इतर सामान | २१०००.०० | १२.५० % | २६२५.०० | २३६२५.०० | मनियार शंहशाह, संगमनेर, ९२२६७६७२२०. |
| ०७ | नादूरुस्त मशिनरी | ६४०००.०० | १२.५० % | ८०००.०० | ७२०००.०० | न्यु इंडिया स्क्रॅप सेंटर, कोपरगांव, ९८५०८८१२१८. |
| ०८ | फर्नीचर (स्टील चेअर, रिव्हॉल्वींग,लोखंडी खूर्ची, स्टूल) | १०१००.०० | ४ % | ४०४.०० | १०५०४.०० | अब्दुल रशीद खान, ९८२२८२०९०३ |
| ०९ | प्लॉस्टिक पी.व्ही.सी.मटेरिअल अॅक्रेलिकच्या रबरच्या वस्तू,सिंटेक्स टाक्या पी.व्ही.सी कॅबीन्स | ११२००.०० | ४ % | ४४८.०० | | न्यु इंडिया स्क्रॅप सेंटर, कोपरगांव, ९८५०८८१२१८ |
| १० | कापडाच्या वस्तू | २५२००.०० | ---- | ---- | २५२००.०० | अकबर सांडेखाँ पठाण, कोपरगांव,९८९०१४५७६८ |
| ११ | उर्वरित रुग्णालय साहित्य | १९०००.०० | १२.५० % | २३७५.०० | २१३७५.०० | रंगनाथ बारकु कानडे, कोपरगांव |
| १२ | सोलर वॉटर हिटींग सिस्टीम | ५४१००.०० | ४ % | २१६४.०० | ५६२६४.०० | रफिक शेख, श्रीरामपूर |
| १३ | चैनपुली | २१००.०० | ४ % | ८४.०० | २१८४.०० | मनियार शंहशाह, संगमनेर, ९२२६७६७२२०. |
| १४ | इलेक्ट्रीक गिझर | ----- | ---- | ---- | ---- | **रक्कम १६१०००.०० चे बोलीचा लिलाव चालू असतांना सदरच्या लॉटचा लिलाव रद्द करण्यात आला.** |
| १५ | बांधकाम विभागाकडील जुन्या सागवानी दारे, खिडक्या, चौकटी इ. तसेच दप्तर विभागाकडे जमा असलेल्या लाकडी टेबल,स्टुल, सोफा वगैरे लाकडी साहित्य. | ७२००००.०० | १२.५० % | ९००००.०० | ८१००००.०० | मल्लिक काळेमुल्ला, येवला. |

उपरोक्त लॉटपैकी संबंधीत व्यापाऱ्यांनी लॉट नं.२,३,४,६,७,८,९,१०,११,१३ (एकूण लॉट १०) ची रक्कम भरुन माल घेऊन गेलेले आहेत.

**ब)** लॉट नं.१४ इलेक्ट्रीक गिझर ची बोली रक्कम रु.१,६१,०००.०० पर्यंत चालू असतांना सदरच्या लॉटचा (योग्य किंमत न आल्यामुळे) लिलाव रद्द करण्यात आला.

**क)** ३ वार लिलाव झाल्यानंतर ७ दिवसात माल घेऊन जाणेबाबत अटी शर्तीत उल्लेख आहे.

उर्वरीत लॉट नं. १,५,१२ व १५ घेणेस अद्यापपावेतो व्यापारी आलेले नाहीत. लिलाव घेणारे व्यापारी दुसरे व्यापारी शोधून त्याला माल विकत असतात. लिलाव मंजूर झालेल्या व्यापाऱ्यांना माल घेऊन जाणेची संधी म्हणून सदर अट एक महिन्यासाठी शिथील करीत आहोत. त्यांनी भंगार माल न नेल्यास त्यांची अनामत रक्कम नियमाप्रमाणे जप्त करण्यात येईल व पुढील लिलावात सदर मालाची विक्री करता येईल.

**ड)** सदर लिलावाचे वेळी काही बाबी निदर्शनास आलेवरुन पुढील लिलावाचे वेळी लिलावाच्या कार्यपध्दतीत खालील प्रमाणे सुधारणा करीत आहोत.

१. डिपॉझीटची रक्कम आदल्या दिवशी सकाळी ९.३०ते संध्याकाळी ६.३० या कार्यालयीन वेळेत स्विकारणे व संबंधीतास टोकण नंबर देणे.

२. लिलाव मंजूर न झालेल्या व्यापाऱ्यांचे डिपॉझीट दुसऱ्या दिवशी ९.३० ते ६.३० या कार्यालयीन वेळेत परत करणे.

३. डिपॉझीट स्विकारतेवेळी डिपॉझीट स्विकारणाऱ्याने संबंधीताचे ओखळ पत्र पाहून सोबतच्या विहीत नमून्यात तपशीलवार माहिती संबंधीत व्यापाऱ्याकडूनच भरुन घेणे.

४. व्यापाऱ्याकडे रोख रक्कम नसल्यास विहीत नमून्यातील अर्जासोबत चेक स्विकारणे.

**इ)** झालेल्या लिलावाची कार्यवाही विधी व न्याय विभागास कळविण्यात यावी असे विधी व न्याय विभाग मंत्रालय,मुंबई यांनी त्यांचेकडील जा.क्रं.सासंवि-२००५/३८९/(११६) /सोळा. दि.०३/०१/२००६ च्या पत्राने निर्देश दिलेले आहेत त्यानुसार त्यांना कार्यवाही बाबत कळविण्यात येईल, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,दप्तर विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२५** **व्दारकामाई धुनीकरीता गोवऱ्या, सरपण साठवण व्यवस्थेबाबत**
**निर्णय क्र.४८०** द्वारकामाईमध्ये श्रींनी प्रज्वलीत केलेली धुनी अखंडपणे प्रज्वलीत आहे. या धुनीतून काढण्यात येणारी उदी भक्तांना प्रसादरुपात द्यावी लागते. वाढत्या गर्दीमुळे उदीची मागणी सातत्याने वाढत आहे. जास्तीत जास्त उदी निघावी या करीता रान गोवऱ्या व मोठया आकाराचे सरपण जास्तीत जास्त वापरावे लागते. सरपण व गोवऱ्यांचा मोठया प्रमाणात साठा भक्तनिवास शेजारील शेडमध्ये केलेला आहे. परंतू दररोजचे वापरण्याकरीता याकामी चावडी लगतची खोली द्वारकामाई जवळील श्यामसुंदर हॉल यामध्ये केला जातो. तसेच उदी चाळण्याकरीता चावडी मागील खोलीचा वापर करण्यात येतो. त्याठिकाणी दोन सिमेंटचे हौद आहेत. या सर्व जागा पुरातन आहेत.

गोवऱ्या व सरपण हे ज्वलनशील असून त्याचा साठा याठिकाणी करणे धोकेदायक आहे तसेच, चाळण्यात येणाऱ्या उदीमध्ये विस्तव असतो. यापुर्वी सरपण व गोवऱ्या साठवणीकरीता उदी चाळण्याकरीता द्वारकामाई लगत मोठया आकाराची खोली होती परंतू मंदिरन विस्तारीकरणाचे वेळी या बाबींचा विचार केला गेला नाही व ती खोली काढण्यता आली. त्यामुळे आता अडचणी निर्माण होत आहेत. सरपण व गोवऱ्यांचा साठा चावडीजवळ ठेऊ नये असे संरक्षण विभागाने सांगितले आहे. यासाठी मारुती मंदिराचे शेजारील मोकळया जागेत धुनीकरीता सरपण, गोवऱ्या साठवण व वरच्या मजल्यावर उदी चाळणेची जागा असा कक्ष उभारता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू जागेची स्थानिक विश्वस्तांनी समक्ष पहाणी करुन निर्णय घ्यावा,असें ठरलें. (कार्यवाही-अधिक्षक,मंदीर/बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२६** **पुस्तके व फोटो छपाई करणेबाबत.**
**निर्णय क्र.४८१** खाली दर्शविल्याप्रमाणे पुस्तके/फोटो यांचा साठा भांडार विभागात सध्या स्थितीत अल्प प्रमाणात साधारणतः २ ते ३ महिने पुरेल एवढाच शिल्लक आहे. तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दि.१९.०८.२००६ चे सभेतील विषय नं.२७ निर्णय ७०५ नुसार आदेश क्र.२९३९ दि.०६.११.२००६ अन्वये पारित करण्यात आलेल्या आदेशानुसार प्रकाशने विभागाअंतर्गत बुकस्टॉलवर पुस्तके/फोटोंचे कमीत कमी २५ प्रती व त्यापेक्षा जास्त प्रती खरेदीदारास यात साईभक्त, साईमंदिरे, स्थानिक दुकानदार यांना विक्री किंमतीवर १५% सवलतीचे दराने विक्री कार्यवाही चालू असल्याने त्यामुळे विक्रीचा खप वाढला असल्याने खालील पुस्तके/फोटो छपाई करून घेणे गरजेचे आहे.

**अ) पुस्तके छपाई**

| अ.नं | पुस्तकाचे नांव | भाषा | मागिल छपाईची तारीख | मागिल छपाई दर | नवीन छपाई संख्या | छपाई अंदाजे दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईसत्‌चरित्र | तामिळ | १९.०१.२००७ | ३१.३१ | २०,००० | ३५.०० | ७,००,०००/- |
| | | | | | | **एकूण रु.** | **७,००,०००/-** |

**ब) फोटो छपाई**

| अ.नं | फोटोचे नांव | **साईज** | छपाई केल्याची तारीख | मागिल छपाई दर | छपाई संख्या | छपाई अंदाजे दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | द्वारकामाई फोटो चार रंगात | १४"X २०" | ०६.०२.२००५ | १.९९ | २,००,००० | २.२५ | ४,५०,०००/- |
| | | | | | | **एकूण रूपये** | **४,५०,०००/-** |

उपरोक्त "अ " व "ब" नुसार नमुद केलेप्रमाणे:-

१) "अ " या रकान्यात दर्शविल्याप्रमाणे पुस्तके छपाई कामी अपेक्षित खर्च रूपये - ७,**००,०००/-**

२) "ब " या रकान्यात दर्शविल्याप्रमाणे फोटो छपाई कामी अपेक्षित खर्च रूपये - ४,५०,०००/-

--------------

एकूण रूपये - ११,५०,०००/-

वरील तपशिलाप्रमाणे "अ " व "ब" मिळूण अंदाजे रूपये - ११,५०,०००/- (अक्षरी रुपये अकरा लाख, पन्नास हजार, ) मात्र खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्तप्रमाणे खर्च हा पुस्तके/फोटो छपाईसाठी सन २००७-२००८ मंजूर बजेट तरतूद रूपये- १५०,००,०००/- मधून करता येईल.

तरी वरील "अ " व "ब" यात दर्शविलेप्रमाणे पुस्तक/फोटोंची छपाई ही मा.व्यवस्थापन समितीचे समंत निर्णयानुसार निवडक प्रेसधारकांकडून छपाई कामाचे कोटेशन्स मागविणेस तसेच याकामी अंदाजे एकूण ११,५०,०००/- (अक्षरी रुपये अकरा लाख, पन्नास हजार, ) मात्र अपेक्षित खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

याचवेळेस श्रीसाईबाबांचे जीवन,कार्य तसेच शिकवणूकीचा प्रसार सर्वदूर अधिक जलदगतीने व्हावा याकरिता सर्व भाषेतील श्रीसाईसच्चरित्र ग्रंथ साईभक्तांना अत्यल्प दराने उपलब्ध व्हावे याबाबत लेखापरिक्षकांचा अहवाल घेऊन सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करावा,असे ठरले.

(कार्यवाही-प्रकाशने विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२७** **श्री साईलीला व्दैमासिक अंक २००७-२००८ छपाईबाबत**
**निर्णय क्र.४८२** कार्यकारी संपादक, श्री साईलीला संपादकीय कार्यालय, मुंबई यांचे दि.१५.०५.२००७ चे पत्रान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रकाशित श्री साईलीला द्वैमासिक मराठी व हिंदी-इंग्रजी अंक छपाई आदेशाची मुदत माहे ३० जून २००७ अखेर संपत आहे. सध्याचे अंक छपाईचे काम मे. परफेक्ट प्रिंट प्रॅाडक्ट प्रा.लि., मुंबई यांचेकडून छपाईकामाची कार्यवाही चालू आहे. त्याची मुदत संपत आल्याने सन २००७-२००८ साठी अंकांची छपाई करुन घेणे गरजेचे आहे.

माहे सप्टेंबर -ऑक्टोबर २००६ ते माहे मे-जून २००७ या कालावधीसाठी श्री साईलीला द्वैमासिक अंक छपाईचे काम खालील दर्शविल्या तपशिलानुसार करुन घेण्यात आले आहे. त्याच धर्तीवर माहे जुलै -ऑगस्ट २००७ ते मे-जुन २००८ या कालावधीसाठी छपाईचे काम करुन घेणे आहे.

अ) श्री साईलीला मराठी व हिंदी-इंग्रजी द्वैमासिक सर्वसाधारण अंक आतिल रंगीत ३२ पाने + मुख पृष्ठाचे ४ पाने ४ रंगीत लॅमिनेशन करुन अशी एकूण ३६ पानांचा अंक प्रकाशित करणे आहे.

ब) श्री साईलीला मराठी व हिंदी-इंग्रजी विशेषांकातील आतील रंगीत ६४ पाने + मुख पृष्ठाचे ४ पाने ४ रंगात रंगीत लॅमिनेशन केलेली अशी एकूण ६८ पाने पोटात तार मारुन बांधणी करावयाची आहे.

क) श्री साईलीला मराठी व हिन्दी -इंग्रजी व विशेषांक ८.००" X १०.५०" या साईजमध्ये उपलब्ध करुन देणे आहे.

ड) मुखपृष्ठ छपाईसाठी १७० जी.एस.एम लाईकेम आर्ट पेपर वापरणे आहे.

इ) साईलीला अंकाचे आतिल रंगीत पृष्ठे छपाईसाठी ७० जी.एस.एम. LWC, UPM, ULTRA Paper वापरावयाचा आहे.

उपरोक्त "अ","ब","क","ड","इ" यात दर्शविल्या तपशिलानुसार मागिल वर्षाप्रमाणे चालू वर्षीही सन २००७-२००८ या कालावधीसाठी अतिशय उत्कृष्टपणे अंकांची छपाई करुन अंक साईलीला सदस्य यांना उपलब्ध करुन देणे आहे.

सन २००७-२००८ (माहे जुलै -ऑगष्ट २००७ ते मे-जुन २००८) सालासाठी खालीलप्रमाणे अंदाजे अंकांची छपाई करुन घेणे आवश्यक आहे.

०१) श्री साईलीला द्वैमासिक अंक मराठी १५,००० प्रती

०२) श्री साईलीला द्वैमासिक अंक हिंदी-इंग्रजी २५,००० प्रती

०३) श्री साईलीला द्वैमासिक दसरा विशेषांक मराठी १५,००० प्रती

०४) श्री साईलीला द्वैमासिक दसरा विशेषांक हिंदी-इंग्रजी २५,००० प्रती

यासाठी उपरोक्त प्रमाणे सर्वसाधारण मराठी अंक प्रती माह १५,००० प्रती छपाईकामी अंदाजे छपाई दर रुपये १५/- एकूण रुपये २,२५,०००/- याप्रमाणे ५ अंकांचे ११,२५,०००/- तसेच सर्वसाधारण हिंदी- इंग्रजी अंक प्रती माह २५,००० प्रती छपाईकामी अंदाजे छपाई दर रुपये १५/- एकूण रुपये ३,७५,०००/- याप्रमाणे ५ अंकांचे १८,७५,०००/- त्याप्रमाणे श्री साईलीला द्वैमासिक दसरा विशेषांक मराठी १५,००० प्रती छपाईकामी अंदाजे दर रुपये २५/- प्रमाणे एकूण रुपये ३,७५,०००/- तसेच हिंदी-इंग्रजी अंक २५,००० प्रती छपाईकामी अंदाजे दर रुपये २५/- प्रमाणे एकूण रुपये ६,२५,०००/- असा एकूण रुपये ४०,००,०००/- (अक्षरी रुपये चाळीस लाख) मात्र इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

श्री साईलीला सदस्य संख्येत वाढ झाल्यास कार्यकारी संपादक सांगतील त्यानुसार वाढीव साईलीला अंक छपाईचे काम करुन घ्यावे लागेल. याप्रमाणे श्री साईलीला नियतकालीकाचे मराठीचे ५ अंक अधिक पुण्यतिथी विशेषांक मराठी असे एकूण ६ अंक व हिंदी -इंग्रजीचे ५ अंक अधिक पुण्यतिथी विशेषांक हिंदी-इंग्रजी असे ६ अंक याप्रमाणे एकूण १२ अंक छपाई करुन घेणे आहे.

श्री साईलीला संपादकीय कार्यालय, मुंबई यांनी त्यांचेकडील दि.०७.०६.२००७ चे पत्रान्वये नमुद केलेप्रमाणे साईलीला नियतकालीकेचे छपाईचे काम सप्टेंबर-ऑक्टोबर २००६ ते मे-जून २००७ या कालावधीतील अंकांच्या छपाईचे काम संबंधीत मे.परफेक्ट प्रिंट प्रॉडक्ट प्रॉ. लि., मुंबई यांचेकडून करुन घेण्यात आले असून, त्यांनी दिलेल्या छपाई आदेशानुसार समाधानकारक काम करुन दिले असून, अंकाचे नवीन स्वरुप आवडल्याचे वाचकांनी कळविले आहे. संबंधीत मे.परफेक्ट प्रिंट प्रॉडक्ट प्रॉ. लि., मुंबई यांचेकडून जा.नं. एसएसएस-वशी-प्रकाशने-११८०६/२००६ दिनांक-०२.०९.२००६ नुसार खाली दर्शविलेल्या तपशिलाप्रमाणे साईलीलाअंक छपाईचे काम करुन घेण्यातआले आहे.

| अ.नं. | तपशिल | छपाई संख्या | प्रति अंक छपाई दर सर्व करांसहीत शिर्डी पोहोचसह रुपये पैसे | अंकात ४ पानाने घट किंवा वाढ झाल्यास प्रती अंक छपाई दर रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| ०१ | साईलीला अंक मराठी ३२ + ४ पाने =३६ पाने | १५,००० नग | ११.६८ | १.३७ |
| ०२ | साईलीला अंक हिंदी-इंग्रजी ३२+४=३६ पाने | २५,००० नग | ११.६८ | १.३७ |
| ०३ | दसरा विशेषांक मराठी ६४ +४ = ६८ पाने | १५,००० नग | २०.०३ | १.३७ |
| ०४ | दसरा विशेषांक हिंदी-इंग्रजी ६४+४=६८ पाने | २५,००० नग | २०.०३ | १.३७ |

तरी वरील नमुद केलेले छपाई दरानुसार मे.परफेक्ट प्रिंट प्रॉडक्ट प्रॉ. लि., मुंबई यांनी त्यांचेकडील दि.०९.०६.२००७ चे पत्रान्वये उपरोक्त दोन्ही अकांचे छपाईचे काम हे मागिल छपाई दराने पुढील एका वर्षासाठी ( जुलै-ऑगस्ट २००७ ते मे-जून २००८ ) करुन देण्याची तयारी दर्शविली आहे. मागिल वर्षी मे.परफेक्ट प्रिंट प्रॉडक्ट प्रॉ. लि., मुंबई यांनी श्रीसाईलीला अकांचे छपाईचे काम समाधानकारक व बिनतक्रार केली असल्याने त्यांनाच पुढील एका वर्षासाठी श्री साईलीला अंक छपाईचे काम देण्यात यावे असे वाटते.

तरी उपरोक्तप्रमाणे श्री साईलीला अंकाचे छपाईचे काम हे मे.परफेक्ट प्रिंट प्रॉडक्ट प्रॉ. लि., मुंबई यांचेकडून वरील मागिल छपाईदराने करुन घेणेस अथवा मुंबई येथील निवडक प्रेसधारकांकडून कोटेशन मागवून करुन घेणे याबाबत निर्णय होणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रुपये ४०,००,०००/- (अक्षरी रुपये चाळीस लाख) मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईलीला अंकाचे छपाईचे काम हे मे.परफेक्ट प्रिंट प्रॉडक्ट प्रॉ. लि., मुंबई यांचेकडून मागिल छपाईदराने करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ४०,००,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२८** **श्रीसाईसत्‌चरित्र तेलगु ऑडिओ सी.डी. निर्मीती खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४८३** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०७.२००६ रोजीचे सभेतील विषय नं.१४ निर्णय क्र.४३० अन्वये झालेल्या निर्णयानुसार श्रीसाईसत्‌चरित्र तेलगू ऑडिओ सी.डी. (२ सी.डी. चा १ संच) पॅकींग बॉक्ससह साईभक्तांना उपलब्ध करुन देणे आहे. त्याकरीता श्रीसाईसत्‌चरित्र तेलगू ऑडिओ सी.डी. (२ सी.डी. चा १ संच) पॅकींग बॉक्ससह ५,००० संच तयार करणेकामी अंदाजे प्रती संच दर रुपये ७५/- याप्रमाणे रुपये ३,७५,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी श्रीसाईसत्‌चरित्र तेलगू ऑडिओ सी.डी. (२ सी.डी. चा १ संच, एम.पी. ३ ) ५,००० संच तयार करणेकामी अंदाजे प्रती संच दर रुपये ७५/- याप्रमाणे रुपये ३,७५,०००/- मात्रचे खर्चास व मुंबई/पुणे येथील सी.डी.निर्मात्यांकडून कोटेशन्स मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२९** **पाणीपुरवठा विभागाकडील वापरुन खराब झालेले मटेरिअल विक्री करणे बाबत**

**निर्णय क्र.४८४** पाणी पुरवठा विभागाकडील डेडस्टॉकला नोंद असलेल्या वस्तू या वापरुन खराब झालेल्या असल्याने त्या डेडस्टॉकमधून कमी करणेसाठी मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांची पूर्व परवानगी घेणेकरीता जा.नं./एसएसएस/वशी/पा.पु./१५७११/२००६,दिनांक ०९/११/२००६. चे पत्र दिलेले होते.

तथापी सदरचे मटेरियल कमी करणेसाठी आपले मा. व्यवस्थापन समितीचे सभेत नमूद केलेल्या वस्तूंच्या लिलाव विक्रीबाबत त्या वस्तूंची आधारभूत किंमत ठरवून संस्थानच्या व्यवस्थापन समितीमध्ये निर्णय घेवून त्याची प्रत शासनास पाठविण्यात यावी असे महाराष्ट्र शासन क्रमांक- सासंवि २००७/८६६/(४६)-का. सोळा, विधी व न्याय विभाग,मंत्रालय, दि.मे,२००७. चे पत्रान्वये कळविलेले आहे.

सदरच्या वस्तूंचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**०१. हॉट वॉटर बॉयलर - डेडस्टॉक नं. HTWB-००१ (ASSET TYPE- HTWB)- किंमत रूपये ९,९१,१०५/-**

सदरचे उपकरण हे दिनांक १०/०३/१९९३ रोजी नविन भक्तनिवासस्थान (५०० रूम) येथे गरम पाण्याकरीता बसविण्यात आलेले होते. परंतू सदरचा बॉयलर वापरून खराब झालेला आहे. शिवाय त्यानंतर सदर ठिकाणी गरम पाण्याकरीता सोलर सिस्टिम बसविण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर बॉयलरकरीता होणारा डिझेल खर्च वाचविण्यात आलेला आहे. सोलर सिस्टिम कार्यान्वित असल्याने सदरचा बॉयलर वापरात नसल्याने लिलावात काढावा लागेल.

**०२. केयर फ्रि कॅटेलिक वॉटर कंडिशनर - डेडस्टॉक नं. INS-७५६३ (ASSET TYPE- MCHN) किंमत रूपये १,५३,०९३/-**

सदरचे उपकरण हे नविन धर्मशाळा येथे विहिरीचे पाणी शुध्दीकरणांकरीता श्रेयस ॲग्रो राहूरी यांचेकडून खरेदी करून दिनांक २३/१०/२००१ रोजी बसविण्यात आलेले होते. सदरचे उपकरण वापरून खराब झ ाालेले असल्याने लिलावात काढावे लागेल.

**०३. क्लोरीनेटर - डेडस्टॉक नं. MCH-W००१ (ASSET TYPE- MCHN) - किंमत रूपये २,४६,४८०/-**

सदरचे उपकरण हे मिठाच्या द्रावणांपासून क्लोरीन वायू तयार करून पाणी शुध्दीकरणांकरीता दिनांक १३/०३/२००१ रोजी बसविण्यात आलेले होते. सध्या हे उपकरण नादुरूस्त असल्याने वापरात नाही. तरी सदरचे उपकरण खराब झाल्याने लिलावात काढावे लागेल.

तरी सदरच्या डेडस्टॉक नोंद असलेल्या तीनही वस्तू लिलावाने विक्री करून व त्याची नोंद किंमतीसह पाणी पुरवठा विभागाचे डेडस्टॉकमधून तसेच लेखाशाखेच्या डेडस्टॉकमधून कमी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३०** **लॉण्ड्रीकरीता केमिकल्स/डिटर्जंट व इंधन खरेदी करणे बाबत**

**निर्णय क्र.४८५** अ) श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील लॉण्ड्रीमध्ये निवासस्थाने साईनाथ रुग्णालय, मंदिर इ. विभागाकडील चादर, बेडशीट, गादीकव्हर, लिनन, ॲप्रन, बसेसचे शिट कव्हर आदी कपडे धुवून इस्त्री करुन देण्यात येतात. याकामी सध्या हिंदुस्थान लिव्हर कंपनीचे उत्पादित डिप पेनेट्रेटींग लॉण्ड्री कॉन्संट्रेट हे वापरण्यात येत आहे. त्याची वार्षिक मागणी ३६५ लिटर माहे ऑक्टोबर २००६ ते सप्टेंबर २००७ या कालावधीकरीता करण्यात आलेली होती. साईबाबा रुग्णालय नव्याने कार्यान्वित करण्यात आले आहे. त्यांचेकडील कापड व लिननची वाढ झाल्याने नव्याने दुसरे एक धुलाई मशिन बसविण्यात आलेले असून सदरचे काम दोन पाळयांमध्ये आवश्यकतेप्रमाणे चालते त्यामध्ये साधारणतः दैनेदिन १५०० कपडे धुवून इस्त्री केले जातात. मागणी केलेले ३६५ लिटरपैकी आत्तापर्यंत ३०७ लिटर डिप पेनेट्रेटींग लॉण्ड्री कॉन्संट्रेटची मागणी करुन ते वापरण्यात आलेले आहे. शिल्लक असलेले डिप पेनेट्रेटींग लिअर हे साधारणतः माहे जुन अखेरपर्यंत पुरु शकेल. तद्नंतर माहे जुलै- २००७ ते माहे जून २००८ या पुढील एक वर्षाकरीता खालीलप्रमाणे केमिकल्स/ डिटर्जंट खरेदी करणे आवश्यक आहे.

| तपशील | मागणी |
|---|---|
| हिंदुस्थान लिव्हर कंपनी | डिप पेनेट्रेटींग लॉण्ड्री कॉन्संट्रेट |
| अंदाजे मागणी | ७३० लिटर |
| प्रति लिटर दर रुपये | ४००/- |
| एकूण खर्च रुपये | २,९२,०००/- |

हिंदुस्थान लिव्हर कंपनीचे डिप पेनेट्रेटींग लॉण्ड्री कॉन्संट्रेट हे सध्यात विक्रांत एजन्सीज अहमदनगर यांचेकडून प्रति लिटर रु.४००/- या मंजुर दराने खरेदी करण्यता येत आहे. सदरचे केमिकल्स त्याच मंजूर दराने विक्रांत एजन्सीज, अहमदनगर यांचेकडुन खरेदी करणेस व त्याकामी येणारे रु.२,९२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**ब)** तसेच, लॉण्ड्रीत येणारे कपडे धुण्यासाठी, सुकविणेसाठी स्टीम बॉयलर कार्यान्वित आहे. त्याचे करीता डिझेल वापरण्यात येते. वरील एका वर्षाचे कालावधीकरीता अंदाजे ३००० लिटर डिझेलची

आवश्यकता असुन त्याकामी रु.१,०५,०००/- खर्च अपेक्षित आहे. सदरचे डिझेल परीसरातील पेट्रोल पंपावरुन खरेदी करता येईल.

वरील "अ" प्रमाणे केमिकल्स/ डिटर्जंटकरीता रु. २,९२,०००/- व "ब" प्रमाणे इंधन खरेदीस रु.१,०५,०००/- असे अ+ब प्रमाणे एकूण रु. ३,९७,०००/- मात्रचे खरेदीस व खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी ययांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,भक्तनिवासस्थान/अधिक्षक,खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३१ निकामी झालेल्या प्लास्टिकच्या व व्हिलच्या लोखंडी खुर्च्या दप्तर विभागामार्फत कोटेशनच्या वार्षिक उच्चतम दराने विक्री करुन स्टॉकमधुन कमी करणेबाबत.**

**निर्णय क्र.४८६** वैधानिक लेखापरिक्षक यांनी निकामी अनावश्यक साहित्य वेळचे वेळी मंजुरी घेऊन स्टॉकमधुन कमी करावे अशा सुचना दिलेल्या आहेत.

धर्मशाळा विभागामार्फत सन १९९९ साली भक्तांना रुममध्ये बसनेकरीता निलकमल कंपनीच्या प्लास्टीक खुर्च्या व ऑफिस स्टॉक करीता व्हिलच्या लोखंडी खुर्च्या भांडार व पी.आर.ओ. मधुन देणगी आणलेल्या होत्या. सदर खुर्च्या रुम/ कॅन्टीन इत्यादी ठिकाणी नेहमीच्या वापराने चिरा पडुन/ पाय तुटुन खराब झालेल्या आहे. अशा खराब निकामी झालेल्या प्लास्टीक खुर्च्या भक्तांना वापरास योग्य नाही. त्यामुळे सदर खुर्च्या धर्मशाळा विभागाच्या स्टोअरमध्ये पडुन आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | संगणक कोड नंबर | ॲसेट टाईप | तपशिल | नग | घसारा वजा जाता किंमत |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | CHR- २००५ | FURN | प्लास्टीक खुर्च्या | १२३ | ८६५५.०० |
| ०२ | CHR- ८८०१ | FURN | व्हिलच्या लोखंडी खुर्च्या | ०१ | ४२७.०० |

वरील खराब झालेल्या खुर्च्या पैकी आठ खुर्च्यांची भक्तांकडून मोडतोड/ नुकसान झाल्यामुळे प्रति खुर्चीसाठी रु. २००/- प्रमाणे भक्तांकडून नुकसान भरपाई वसुल करुन घेऊन त्याचा भरणा वेळोवेळी सेवा आकार पावती नं. (०१) १३२७५-दि.१८.१०.२००३, (०२) १३२८१-दि.१५.११.२००३, (०३) ३२७-दि.०८.०४.२००४, (०४) ३११५-दि.२०.०५.२००४, (०५) ८६०७-दि.१८.०७.२००४, (०६) ९१०४-दि.२६.०७.२००४, (०७) ९१५५-दि.२७.०७.२००४, (०८) ३८१३८-दि.१२.०५.२००६ नुसार लेखाशाखेत केला आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम १७ (४) मध्ये विश्वस्त संस्थेमध्ये निहित केलेले पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक किमतीचे कोणतेही जडजवाहितर, दागिने व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता राज्य शासनाच्या पुर्व मंजुरी असे त्याखेरीज समितीकडुन विकण्यात येणार किंवा अन्यसंक्रमीत करण्यात येणार नाहीत. असे निर्देश आहेत, सदर निर्देश विचारात घेता खालील बाबी निदर्शनास येतात.

उपरोक्त तपशिलाप्रमाणे कालबाहय व नादुरुस्त झालेले साहित्य हे जडजवाहिर अगर मौल्यवान जंगम मालमत्ता (घसारा किंमत विचारात घेता) नाही. तसेच प्रत्येक साहित्याची किंमत रु.५०,०००/- नाही सबब अशा वस्तुची विल्हेवाट लावणेसाठी शासनाची पुर्वपरवानगीची आवश्यकता नाही. सदर खुर्च्या धर्मशाळा विभागाचे स्टोअरमध्ये ठेवलेले आहे यामुळे तेथील बरीच जागा या खुर्च्यांमुळे अडलेली आहे. सबब वर नमुद केलेली परिस्थिती विचारात घेता निकामी झालेल्या प्लास्टिकच्या व व्हिलच्या लोखंडी खुर्च्या दप्तर विभागामार्फत कोटेशनच्या वार्षिक उच्चतम दराने विक्री करुन स्टॉकमधुन कमी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, धर्मशाळा विभागाकडील निकामी झालेल्या प्लास्टिकच्या व व्हिलच्या लोखंडी खुर्च्या लिलावने विक्री करण्यात यावी व त्या स्टॉकमधून कमी करण्यात याव्यात असे ठरले. (कार्यवाही-धर्मशाळा विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३२ कालबाह्य व निकामी झालेले संगणक व संगणकीय साहित्य विक्री करणे बाबत**

**निर्णय क्र.४८७** वैधानिक लेखापरिक्षक यांनी निकामी अनावश्यक साहित्य वेळचे वेळी मंजूरी घेऊन स्टॉक मधून कमी करावे अशा सुचना दिलेल्या आहेत. संदर्भ क्र. १ व २ नुसार डेडस्टॉकच्या वस्तू स्टॉक मधून कमी करतांना मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात यावी, असे नमूद करण्यात आलेले आहे.

माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत विविध विभागांना कार्यालयीन कामकाजासाठी संगणके, प्रिंटर्स, युपीएस व इतर अनुषांगिक साहित्य, अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेचे साहित्य, मोबाईल हॅन्डसेट देण्यात आलेले आहे. यापैकी बहुतांशी साहित्य दैनंदिन वापरामुळे निकामी/ खराब व कालबाह्य झाल्याने तसेच तंत्रज्ञानात वेळोवेळी बदल झाल्याने, काही साहित्यांचे उत्पादन बंद झालेले आहे. त्यामुळे नादुरुस्त झालेले साहित्य दुरुस्त करणेसाठी आवश्यक पार्टस् बाजारात उपलब्ध होत नाही. त्यामुळे निकामी झालेले साहित्य माहिती तंत्रज्ञान विभागाचे स्टोअरमध्ये पडून आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम १७(४) मध्ये "विश्वस्त संस्थेमध्ये निहित केलेले पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक किमतीचे कोणतेही जडजवाहीर दागिने व इतर मौल्यवान जंगम

मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्व मंजूरी असेल त्याखेरीज समितीकडून विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रमीत करण्यात येणार नाहीत." असे निर्देश आहेत. सदर निर्देश विचारात घेता खालील बाबी निदर्शनास येतात.

उपरोक्त तपशीलाप्रमाणे कालबाह्य व नादुरुस्त झालेले साहित्य हे जडजवाहिर दागिने अगर मौल्यवान जंगम मालमत्ता (घसारा किंमत विचारात घेता ) नाही. तसेच प्रत्येक साहित्याची किंमत रुपये ५०,०००/- नाही. सबब अशा वस्तूंची विल्हेवाट लावणेसाठी शासनाची पूर्वपरवानगीची आवश्यकता नाही. सदर साहित्य हे माहिती तंत्रज्ञान विभागाचे दुरुस्ती देखभाल कक्षात व स्टोअरमध्ये ठेवलेले आहे. यामुळे तेथील बरीच जागा या साहित्यामुळे अडलेली आहे. परिपत्रकानुसार दप्तर विभागामार्फत ज्या स्क्रॅप वस्तूंची वार्षिक उच्चतम दराने विक्री केली जाते त्या यादीत या वस्तूंचा समावेश नाही. सबब वर नमूद केलेली परिस्थिती विचारात घेता सदर वस्तूची विक्री लिलावाने करणेस तसेच विक्रीनंतर सदर साहित्यांच्या नोंदी माहिती तंत्रज्ञान विभागाचे मालमत्ता नोंदवहीतून (डेडस्टॉकमधून) कमी करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३३** **डाटाबेस प्रणालीचे व्यवस्थापनासाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेबाबत.**
**निर्णय क्र.४८८** संस्थानचे संगणकीकरण कार्यक्रमांतर्गत संगणकीय नेटवर्कव्दारे सध्या संस्थानची विविध कार्यालये, देणगी काऊंटर्स, खोली वाटप कक्ष, चहा कॅन्टीन, लेखाशाखा चेक / डी. डी., स्वागत कक्ष, प्रसादालय भोजन तिकीट विक्री, दोन्ही रुग्णालये, ब्लड बॅन्क इ. ठिकाणची साधारणत: ६५ ते ७० संगणके फायबर ऑप्टीक केबलव्दारे एकमेकांशी जोडण्यात आलेले आहे. सध्या १८ संगणक प्रणाली संस्थानचे विविध कार्यालयांत ऑनलाईन आहे. या सर्व संगणकांवरील डेटा मध्यवर्ती सर्व्हर रुममध्ये ठेवण्यात आलेल्या २ GB RAM क्षमतेच्या तसेच साधारणतः २१९ GB साठवणूक क्षमता असलेल्या सर्व्हरमध्ये संकलीत करण्यात येत आहे. सध्या दिवसेंदिवस संगणकीय कामकाजाचा वापर वाढत असून, सर्व्हरवरील संकलीत करण्यात येणारा डाटा दिवसेंदिवस वाढत आहे. विविध विभागांतील संगणक प्रणालीव्दारे संकलीत होणाऱ्या डाटाचा तपशील पुढीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Monthly Data Feeding In MB |
|---|---|---|
| ०१. | Donation | १० MB |
| ०२. | Money Order | ६ MB |
| ०३. | Cheque / D.D. | ५ MB |
| ०४. | Accommodation | ४ MB |
| ०५. | Payroll | ५ MB |
| ०६. | Book Stall | ५ MB |
| ०७. | Prasadalaya Booking | ८ MB |
| ०८. | Inward | ५ MB |
| ०९. | Membership | ५ MB |
| १०. | Cashier | २ MB |
| ११. | Dead-Stock | २ MB |
| | Total | ५७ MB |

उपरोक्तप्रमाणे, विविध विभागांत चालणाऱ्या संगणक प्रणालींव्दारे एक महिन्याला साधारणत: ५७ एमबी डाटा संकलीत केला जातो. तसेच खरेदी व भांडार विभागासाठी नवीन संगणक प्रणाली तयार करण्याचे काम चालू असून, लवकरच कार्यान्वीत करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे लेखाशाखेचेही संपूर्ण संगणकीकरण करण्यात येणार आहे. यामुळेही सदरच्या डाटामध्ये सतत वाढ होत राहणार आहे. या सर्व डाटाचे संरक्षण व नियोजन करणेकामी सध्या आयटी विभागाकडे असलेल्या सर्व्हरमध्ये खालील तांत्रिक बाबींचा अभाव आहे.

०१. **डिझास्टरी रिकव्हरी / समांतर सर्व्हर-** सध्या सुरु असलेल्या डेटाबेस सर्व्हरमध्ये काही तांत्रिक अडचणी आल्यास, सर्व्हर अचानक बंद पडल्यास या सर्व्हरमधील डाटा सुरक्षित ठेवणेसाठी या सर्व्हरला दुसरा समांतर डेटाबेस सर्व्हर उपलब्ध नाही.

०२. **डेटा सिक्युरिटी-** सध्या कार्यरत असलेल्या डेटाबेस सर्व्हरमध्ये विविध विभागांत चालू असलेल्या १८ संगणक प्रणालींचा डाटा ( चेक/डी.डी., मनीऑर्डर, देणगी कार्यालये, खोली वाटप कक्ष आदि.) साठविण्यात येत आहे. याची दिवसेंदिवस वाढ होत असल्याने, सदर डेटा सुरक्षित ठेवणेसाठी या डेटाबेस सर्व्हरमध्ये डेटा सिक्युरिटी सुविधा उपलब्ध करुन घ्यावी लागणार आहे.

०३. **परफॉर्मन्स ट्युनिंग (Performance Tunning)-** सध्या कार्यरत असलेल्या डेटाबेस सर्व्हरवरील डाटा दिवसेंदिवस वाढत असल्याने, डाटा संकलीत करुन त्याने नियोजन करणे गरजेचे आहे. जेणेकरुन चालू असलेल्या संगणक प्रणालींना कोणत्याही प्रकारचा अडथळा येणार नाही व त्याची कार्यक्षमता कमी होणार नाही.

वेळोवेळी तंत्रज्ञानात बदल होत असल्याने, सदर कामकाज सुरळीतपणे होण्याच्या दृष्टीने संस्थानमधील डेटाबेसबाबत प्राप्त परिस्थितीची संपूर्ण माहिती असणारे तांत्रिक अर्हता उपलब्ध असलेले मनुष्यबळ संस्थान आस्थापनेकडे उपलब्ध नाही. डेटाबेस सव्हर अचानक बंद झाल्यास, यामध्ये सर्व विभागांचा साठविण्यात आलेला डाटा पूर्ण नष्ट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यादृष्टीने डेटाबेस सर्व्हरचे व्यवस्थापन करणे, डेटाबेस प्रणाली व्यवस्थापन व्यवस्थित करुन वेळोवेळी सदर डेटा सुरक्षित ठेवण्याची कार्यवाही व नियोजन करणे, सर्व्हरमध्ये येणाऱ्या अडचणी सोडवून घेऊन डेटाबेस प्रणाली सुरळीत कार्यरत ठेवणे, सर्व्हरमध्ये अपूर्ण असलेल्या तांत्रिक बाबींची पूर्तता करणे तसेच दिवसेंदिवस वाढत असलेला डेटा व बाजारात उपलब्ध असलेले नविन तंत्रज्ञान यांची सांगड घालून डेटाबेस सर्व्हर प्रणाली व्यवस्थापनासाठी या क्षेत्रात कार्यरत असलेल्या नामांकित कंपनीला सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणे आवश्यक आहे. याबाबत संस्थानचे स्थानिक तांत्रिक सल्लागार श्री विजय नायडू, कोपरगाव यांचेशी चर्चा केली असता, त्यांनीही डेटाबेस सर्व्हर प्रणाली व्यवस्थापनासाठी या क्षेत्रात कार्यरत असलेल्या नामांकित कंपनीला तातडीने सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देण्यात यावे, असे सुचविले आहे. डेटाबेस सर्व्हर प्रणाली व्यवस्थापनासाठी या क्षेत्रात कार्यरत असलेल्या नामांकित कंपनीला सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेसाठी एक वर्षासाठी अंदाजे रुपये ४,००,०००/- ( कर अतिरिक्त) पर्यंत खर्च अपेक्षित आहे. सदरची कार्यवाही नामांकित कंपन्यांकडून सिलबंद निविदा मागवून करता येईल.

उपरोक्तप्रमाणे, डेटाबेस सर्व्हर प्रणाली व्यवस्थापनासाठी या क्षेत्रात कार्यरत असलेल्या नामांकित कंपनीला एक वर्षाचे सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेसाठी सिलबंद निविदा मागविणेस व यासाठी येणारे अंदाजे रक्कम रुपये ४,००,०००/- (कर अतिरिक्त) च्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-आय.टी विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३४ शिधा मागणीकामी आलेल्या अर्जांबाबत.**

**निर्णय क्र.४८९** अ) खाली दर्शविलेल्या समितीने मा.अध्यक्षसाहेब,.श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|
| 01. | सचिव, श्री संत सद्गुरु जनार्दन स्वामी (मौनगिरीजी)महाराज आश्रम, श्री क्षेत्र पुणतांबा, ता.राहाता, जि.अहमदनगर (अर्ज दि.18/05/2007) | पुणतांबा येथे दि.5/6 ते दि.9/6/07 अखेर अधिकमास जपानुष्ठान सोहळ्याचे धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. | मा.अध्यक्ष, यांचा श्री वाक्चौरे विनंती मान्य करावी, असा शेरा. |

तरी सचिव, श्री संत सद्गुरु जनार्दन स्वामी (मौनगिरीजी)महाराज आश्रम, श्री क्षेत्र पुणतांबा, ता.राहाता, जि.अहमदनगर यांना पुणतांबा येथे दि.५/६ ते दि.९/६/०७ अखेर अधिकमास जपानुष्ठान सोहळ्याचे धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी रु.११,०००/- पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देण्यात आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबत प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

ब) खाली दर्शविलेल्या ग्रामस्थांनी मा.कार्यकारी अधिकारीसाहेब,.श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री बाबासाहेब जाधव व समस्त ग्रामस्थ, व सरपंच, ग्रा.का., रुई (कोहकी) ता.राहाता, जि.अ. नगर (अर्ज दि.२२/०५/२००७) | रुई कोहकी येथे दि.२४/५ ते दि.३१/५/०७ अखेर अधिकमासाचे निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. | सौ.समित्रा कोते, नगराध्यक्षा व विश्वस्त यांची शिफारस |

तरी श्री बाबासाहेब जाधव व समस्त ग्रामस्थ, व सरपंच, ग्रा.का., रुई (कोहकी)ता.राहाता, जि.अ. नगर यांना रुई कोहकी येथे दि.२४/५ ते दि.३१/५/०७ अखेर अधिकमासाचे निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी रु.११,०००/- पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देण्यात आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबत प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

क) खाली दर्शविलेल्या ग्रामस्थांनी मा.कार्यकारी अधिकारीसाहेब,.श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | सौ.सिमा निवृत्ती पवार, अध्यक्ष, श्रीमहात्म पोथी समिती, लक्ष्मीनगर,कोपरगांव, जि.अ.नगर (अर्ज दि.०८/०६/२००७) | अधिकमासाचे निमित्ताने दि.१४/५/०७ पासुन श्री महात्म पोथी वाचन कार्यक्रम समाप्ती दि.१४/०६/०७ रोजी असून पोथीवाचन सोहळ्याचे धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी शिधा स्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. | श्री अशोक खांबेकर, विश्वस्त यांची शिफारस |
| ०२. | ह.भ.प.राजेंद्र महाराज थोरात, चालक, व समस्त ग्रामस्थ मंडळ, शहाजापूर, व सरपंच, ग्रा.का.,शहाजापूर, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर (अर्ज दि. ०८/०६/२००७) | शहाजापूर येथे हनुमान मंदिरात दि.५/६ ते दि.१२/६/०७ अखेर अखंड हरिनाम सप्ताह असून सप्ताहाचे धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी शिधा स्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. | डॉ..गोंदकर, विश्वस्त यांची शिफारस |

तरी सौ.सिमा निवृत्ती पवार, अध्यक्ष, श्री महात्म पोथी समिती, लक्ष्मीनगर , कोपरगांव, यांना श्री महात्म पोथी वाचन कार्यक्रम समाप्ती दि.१४/०६/०७ रोजी असून पोथीवाचन सोहळ्याचे धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी रु.१०,०००/- तसेच ह.भ.प.राजेंद्र महाराज थोरात, चालक, व समस्त ग्रामस्थ मंडळ, शहाजापूर, व सरपंच, ग्रा.का.,शहाजापूर, ता.कोपरगांव, यांना शहाजापूर येथे हनुमान मंदिरात दि.५/६ ते दि.१२/६/०७ अखेर अखंड हरिनाम सप्ताह असून सप्ताहाचे धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी रु.१०,०००/- पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देण्यात आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबत प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

ड) खाली दर्शविलेल्या ग्रामस्थांनी मा.कार्यकारी अधिकारीसाहेब,.श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री रामदास चंद्रभान पा.देठे, अध्यक्ष, हनुमान मंदिर जिर्णोध्दार समिती, कुरणपूर, ता.श्रीरामपूर, जि.अ. नगर (अर्ज दि.११/०६/२००७) | मौजे कुरणपूर येथे दि.८/६/०७ ते दि.१५/६/०७ अखेर श्रीमद् भागवत सप्ताह असून सोहळ्याचे धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी शिधा स्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. | मा.अध्यक्ष, यांचे तोंडी निर्देशानुसार |

तरी श्री रामदास चंद्रभान पा.देठे, अध्यक्ष, हनुमान मंदिर जिर्णोध्दार समिती, कुरणपूर, ता.श्रीरामपूर, जि.अ. नगर यांना मौजे कुरणपूर येथे दि.८/६/०७ ते दि.१५/६/०७ अखेर श्रीमद् भागवत सप्ताह असून सप्ताहाचे धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी रु.११,०००/- पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देण्यात आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबत प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

इ) खाली दर्शविलेल्या ग्रामस्थांनी मा.कार्यकारी अधिकारीसाहेब,.श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | अध्यक्ष,साहित्यसम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे संघर्ष समिती, कोपरगांव, जि.अ. नगर (अर्ज दि.१५/०६/२००७) | कोपरगांव येथे दि.१८/६/०७ रोजी साहित्यसम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची पुण्यतिथी असून या सोहळ्याचे सामाजिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी शिधा स्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. | मा.श्री.खांबेकर, विश्वस्त यांचे रु.२०,०००/-पर्यंत शिधा देणेबाबत शिफारस पत्र. |

तरी अध्यक्ष,साहित्यसम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे संघर्ष समिती, कोपरगांव, जि.अ. नगर यांना कोपरगांव येथे दि.१८/६/०७ रोजी साहित्यसम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची पुण्यतिथी असून या सोहळ्याचे सामाजिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी रु.११,०००/- पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देण्यात आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबत प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

ई) खाली दर्शविलेल्या ग्रामस्थांनी मा.कार्यकारी अधिकारीसाहेब,.श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री दत्तात्रय रुपचंद काले, अध्यक्ष, श्री महालक्ष्मी नारायण यज्ञ याग समिती, कोपरगांव, जि. अ. नगर मो.नं.९८८१८६७०८० (अर्ज दि.१६/०६/२००७) | बाजारतळ, कोपरगांव येथे दि.१३/६ ते दि.१७/६/०७ अखेर श्री महालक्ष्मी नारायण यज्ञ याग आयोजित केला असून या सोहळ्याचे धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी शिधा स्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. | मा.श्री.खांबेकर, विश्वस्त यांचे रु.११,०००/- पर्यंत शिधा देणेबाबत शिफारस पत्र. |

तरी श्री दत्तात्रय रुपचंद काले, अध्यक्ष, श्री महालक्ष्मी नारायण यज्ञ याग समिती, कोपरगांव, जि. अ. नगर यांना बाजारतळ, कोपरगांव येथे दि.१३/६ ते दि.१७/६/०७ अखेर श्री महालक्ष्मी नारायण यज्ञ याग आयोजित केला असून या सोहळ्याचे धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी रु.११,०००/- पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देण्यात आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबत प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३५** **श्रीसाई सच्चरित पारायण सोहळा.**
**निर्णय क्र.४९०** सन २००७-०८ या सालात श्री साई सच्चरित पारायण सोहळा वर्ष १३ हा नेहमीचे प्रथेप्रमाणे श्रावण शुध्द १ ते श्रावण शुध्द ८ शके १९२९, म्हणजे सोमवार, दि.१३/०८/२००७ ते मंगळवार, दि.२१/०८/२००७ अखेर साजरा करण्यात येणार असून त्यासाठी श्री शांताराम रं मिराणे(सर) संस्थापक, नाट्य रसिक संच, शिर्डी यांनी दि.२२/०६/२००७ रोजीचे पत्राने नाट्य रसिक संच, शिर्डी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) यांचे संयुक्त विद्यमाने साजरा करावयाचा असून संस्थानमार्फत पुढीलप्रमाणे सहकार्य मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

०१) मंडप व मंडप डेकोरेशन (०२) नियोजीत कलाकार बिदागी-जाणे-येण्याचे प्रवास खर्चासह.
०३) मिरवणूक खर्च रथ, बँड इ. (०४) पत्रिका, हँडबील, बॅनर इ. छपाई
०५) श्रींचे पारायण समाप्ती नंतर महाप्रसाद भंडारा.

तसेच नाट्य रसिक संच, शिर्डी हे ०१) वाचक नोंदणी बॅच, ०२) कर्तृत्ववान महिला सत्कार व हळदी-कुंकू समारंभ खर्च, ०३) मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व मा.विश्वस्त मान्यवर व जेष्ठ नागरीक सत्कार इ. चा खर्च करणार आहे.

दरवर्षी श्रावण मासात श्री साई सच्चरित पारायण सोहळ्याचे आयोजन मंदिर परिसरात करण्यात येते. या पारायण सोहळ्यामध्ये स्थानिक गांवकरी, स्त्री-पुरुष, तसेच बाहेरील गांवचे साईभक्त मोठ्या संख्येने पारायण सोहळ्यात सहभागी होत असतात.

पारायण सोहळ्याचे स्वरुप सर्वसाधारणपणे सकाळी ७.०० ते ११.०० - साई सच्चरिताचे पारायण, दुपारी ४.०० ते ५.०० प्रवचन व रात्रौ ७.३० ते ९.३० कीर्तन कार्यक्रम असे असते. याशिवाय हळदी-कुंकू, सरस्वती पूजन कार्यक्रम, कर्तृत्ववान महिला सत्कार, जेष्ठ नागरिकांचा सत्कार, श्रींच्या ग्रंथाची गांवातुन शोभा यात्रा , कालाकीर्तन व महाप्रसाद भंडारा असे असते. यात पारायणात भाग घेणा-यांची नांव नोंदणी करणे, प्रवचनकार, कीर्तनकार यांचेशी फोनवरुन संपर्क साधुन त्यांची तारीख, वार इ.निश्चीत करुन त्यांना पत्र पाठविणे, त्यानुसार निमंत्रण पत्रिका तयार करणे, छपाई करुन घेणे, इ. कामे करावी लागतात. त्यासाठी साधारणपणे १ ते २ महिन्याचा कालावधी आवश्यक असतो.

सन २००६-०७ सालापासून शिर्डी ग्रामस्थ व संस्थानचे संयुक्त विद्यमाने श्री साई सच्चरित पारायण सोहळ्याचे आयोजन सुरु केले असून सदर बाबतीत नाट्य रसिक संच, शिर्डी यांची मदत घेऊन सदरचा पारायण सोहळा व्यवस्थितरित्या पार पाडण्यात आलेला आहे. सन २००६-०७ या सालात श्री साई सच्चरित पारायण सोहळ्याचे आयोजनास साधारणपणे रु. ३,८३,७७८/- इतका अंदाजीत खर्च आलेला आहे.

श्री साईबाबांच्या जीवन चरित्राचा प्रचार व प्रसार करण्याचे महत्वाचे काम श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत चालु आहे. हा उद्येश लक्षात घेता यावर्षीचा हा पारायण सोहळा संस्थानमार्फत नऊ दिवस साजरा करावा लागेल. याकामी साधारणपणे खालीलप्रमाणे अंदाजीत खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | तपशील | अंदाजीत खर्च |
|---|---|---|
| ०१. | मंडप व्यवस्था खर्च | रु. ०१,००,०००.०० |
| ०२. | बोर्डस्, बॅनर्स व निमंत्रण पत्रिका इ. खर्च | रु. ००,५०,०००.०० |
| ०३. | प्रवचनकारी/कीर्तनकार इ. चे मानधन, प्रवासभाडे इ.खर्च | रु. ०१,५०,०००.०० |
| ०४. | मिरवणुक, बँड, सत्कार - बक्षिसे इ. खर्च | रु. ००,५०,०००.०० |
| ०५. | इतर किरकोळ खर्च | रु. ००,५०,०००.०० |
| | **एकूण खर्च** | **रु. ०४,००,०००.००** |
| | **(अक्षरी रु. चार लाख मात्र)** | |

तरी पारायण सोहळा आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजीत रु. ४,००,०००/- (अक्षरी रु. चार लाख मात्र) चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,

यावर सविस्तर चर्चा होऊन, मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी श्री साईसच्चरित पारायण सोहळा आयोजित करण्यास व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ४ लाखचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३६** **अंतर्गत देवस्थान परिषदेसाठी झालेल्या खर्चाबाबत**
**निर्णय क्र.४९१** मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक १९/०८/२००६ रोजीच्या सभेतील निर्णय क्रमांक ६७४ अन्वये देश परदेशातील देवस्थानांना एका मंचावर आणून त्यांच्या विचारांची एकमेंकांत देवाण-घेवाण करण्यासाठी शिर्डी येथे व्दितीय आंतरराष्ट्रीय देवस्थान परिषद भरविणेचा निर्णय मा. व्यवस्थापन समितीने दिनांक १९/०८/२००६ चे सभेत घेतला होता. त्यास अनुसरुन, उपरोक्त संदर्भ क्रमांक ०२ व ०३ नुसार सदर परिषद दिनांक २८ ते ३० एप्रिल, २००७ चे दरम्यान घेण्याचे ठरविण्यात येऊन, देवस्थान परिषद यशस्वीपणे पार पाडणेसाठी समीट को-ऑर्डीनेशन कमिटी नेमणे, त्यांचे मानधन व परिषदेसाठी येणाऱ्या अंदाजे रुपये २५,००,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

या परिषदेसाठी जास्तीत जास्त देवस्थानांना माहिती दूरध्वनीव्दारे देणे, त्यांना निमंत्रण पत्रिका पाठविणे व तत्संबधीचे कामे, समीट को-ऑर्डीनेशन कमीटी यांना मानधन आदि. बाबींवर माहे फेब्रुवारी, २००७ ते माहे एप्रिल, २००७ अखेर खालील तपशीलाप्रमाणे खर्च करण्यात आला आहे.

| अ.नं | तपशील | एकूण |
|---|---|---|
| १ | अे. आर. नाडकर्णी - मानधन | १,००,०००.०० |
| २ | अशिष वेंगुर्लेकर - मानधन | ७५,०००.०० |
| ३ | मानिषा जोशी - मानधन | ६०,०००.०० |
| ४ | श्रीराम पेंडणेकर - मानधन | ७५,०००.०० |
| ५ | दिप्ती जोशी | १२,५००.०० |
| ६ | पारकर बॉलपेन खरेदी | २९,०००.०० |
| ७ | बॅग खरेदी | ३,५०,०००.०० |
| ८ | रायटींग पॅड छपाई | १८,००९.०० |
| ९ | निमंत्रण पत्रिका | ९,३६०.०० |
| १० | निमंत्रण पत्रिका व प्रमाणपत्र | १९,३४४.०० |
| ११ | टेलिफोन केबल खरेदी | १२,५८४.०० |
| १२ | पेटी कॅश खर्च (मुंबई कार्यालय) २४.०२.०७ ते २७.०४०७ | ३०,७२५.०० |
| १३ | लॅपटॉप भाडे | १५,०००.०० |
| १४ | पोस्टेज | १२,८६०.०० |
| १५ | अर्पिता शहा यांचे मानधन (परिषदेची तारीख बदला बाबद कळविणे करिता) | १०,०००.०० |
| १६ | शशिकांत पाटील यांचे मनाधन, शिपाई | ५,०००.०० |
| १७ | डिझाईनिंग चार्जेस (निर निराळी स्टेशनरी) | १७,१६०.०० |
| १८ | स्टेशनरी (लहान व मोठी कव्हर , लेटर हेड , सीडी स्टिकर , रजिस्ट्रेशन फॉर्म व इतर ) | ४३,९५५.०० |
| १९ | प्रवास खर्च (श्री नाडकर्णी व इतर मूंबई शिर्डी मुंबई ) | २३,२७६.०० |
| २० | दोन गरुडा वायरलेस फोन जोडणी खर्च | १,०००.०० |
| २१ | केबल व इंटरोट चार्जेस | ९७०.०० |
| २२ | दोन रिलायस इंटरनेट कार्ड चार्जेस् | ९,९८०.०० |
| २३ | दोन रिलायंस इंटरनेट बिल | २,४९७.०० |
| २४ | गरुडा वायरलेस बिल | १,९८५.०० |
| २५ | डिझायनिंग कामकाजाचे बिल | १०,४००.०० |
| २५ | हवाई तिकीट रद्दीकरण | ३,६००.०० |
| | **एकूण** | **९,४९,२०५.००** |

परंतु, काही अपरिहार्य कारणास्तव २८ ते ३० एप्रिल, २००७ चे दरम्यान भरविण्यात येणारी आंतरराष्ट्रीय देवस्थान परिषद ही दिनांक ०२ मे, २००७ रोजी भरविण्याचे निश्चित करण्यात आले होते. तथापि दिनांक ०२ मे, २००७ रोजी शिर्डी येथे भरविण्यात येणारी आंतरराष्ट्रीय देवस्थान परिषद काही अपरिहार्य कारणास्तव तहकुब करण्यात आलेली आहे. सदर देवस्थान परिषद भरविण्यासाठी शिर्डी व मुंबई कार्यालयामधून उपरोक्त तपशीलाप्रमाणे खर्च करण्यात आलेला आहे. त्याची नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३७** **श्री.आप्पासाहेब भिमराज ढुस, रा. देवळाली प्रवरा, ता. राहुरी यांना स्कायडायव्हिंग या खेळातील प्राविण्यासाठी आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.४९२** **१)** विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र. सासंवि २००७/४१६/(६७)-का.सोळा, दि.३० मे २००७ चे पत्रान्वये "मा.ना.श्री बाळासाहेब थोरात कृषी व जलसंधारण मंत्री महाराष्ट्र राज्य यांचे शिफारस पत्रात, श्री आप्पासाहेब ढुस,राहणार राहुरी हा पॅराग्लायडींग या खेळातील खेळाडु असुन त्यांना सन १९९९ पासुन १० हजार फुट ऊंचीपर्यंत १०० तासाहुन अधिक हवेत उडण्याचा अनुभव आहे. ते स्पेन येथे जाऊन फ्री फॉल ॲडिक्ट या संस्थेत स्कायडाव्हिंगचे प्रशिक्षण, साहित्य व इंटरनॅशनल पायलट लायसन्स प्राप्त करुन विश्वविक्रम करु इच्छितात. त्यासाठी त्यांना एकूण रुपये ३२ लाख इतका खर्च अपेक्षित आहे. यास्तव त्यांना श्री साईबाबा संस्थानकडुन रुपये १५ लाख आर्थिक मदत देण्याची शिफारस केली आहे. त्यावर मा.मुख्यमंत्री महोदयांनी "pl. consider" असे निर्देश दिलेले आहेत. तरी श्री. ढुस यांना आर्थिक मदत देण्याबाबत आपल्या व्यवस्थापन समितीच्या बैठकित योग्य तो निर्णय घेऊन त्याचा अहवाल शासनास पाठविण्यात यावा," असे निर्देश दिलेले आहे.

**२)** तसेच मा.ना.श्री.आर.आर.पाटील,उपमुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य,मंबई यांनी त्यांचे दि.१ जुन २००७ चे पत्रान्वये "श्री प्रसाद तनपुरे,उपाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश रा.कॉ.पार्टी राहुरी यांनी श्री. आप्पासाहेब ढुस यांना स्काय डायव्हिंगचे प्रशिक्षण व साहित्य घेण्यासाठी श्री साईबाबा संस्थान कडुन आर्थिक मदत देण्याबाबत विनंती केलेले आहे. तरी श्री. प्रसाद तनपुरे यांच्या विनंतीनुसार श्री. ढुस यांना श्री साईबाबा संस्थानचे निधीतुन आर्थिक मदत देणेबाबत नियमानुसार कार्यवाही करणेची शिफारस केलेली आहे."

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१ (२) (एक) "छाननी समितीच्या शिफारसीनुसार राज्य शासनाचे मान्यतेने अनुदान देण्याची तरतुद आहे. "

तसेच यापुर्वी श्री. ढुस यांनी दि.०१/०२/०७ चे पत्रान्वये आर्थिक मदत मिळणेबाबत अर्ज केला होता, त्यावर मा.व्यवस्थापन समितीचे **दि.१७/०२/२००७** चे सभेत चर्चा होऊन **निर्णय क्र.२२३** अन्वये आर्थिक मदत मागणी अमान्य करण्यात आलेली आहे.

आजचे सभेत मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री यांचे पत्रास अनुसरुन सविस्तर चर्चा होऊन, श्री ढुस यांना रुपये ७.५० लाख अर्थिक मदत शासनाची मान्यता घेऊन देण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-३)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३८** **शासनाने मंजुरी दिलेल्या प्रस्तावास मंजुर रक्कम अदा करणेबाबत..**

**निर्णय क.४९३** **१)** श्री क्षेत्र तुळजापुर, **२)** श्री रेणूकादेवी देवस्थान माहूर, **३)** श्री महालक्ष्मी देवस्थान,कोल्हापूर, **४)** महारोगी सेवा समिती वरोरा चंद्रपूर या ४ प्रस्तावंना आर्थिक मदत देण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. परंतु श्री क्षेत्र तुळजापूर यांचे कडुन अद्याप प्रकल्प अहवाल प्राप्त झालेला नाही.

वरील **अ.नं.:-१** श्री क्षेत्र तुळजापुर, यांना मा.व्य.समितीचे दि.०४/३/०६ चे सभेतील निर्णय क्र.१६२ अन्वये रु. १ कोटी आर्थिक मदत देण्यास मान्यता दिलेली आहे. त्यास शासनाने दि.५ मे २००६ चे पत्रान्वये **रु.१ कोटी** देण्यास मान्यता दिली असून सदर निधी कामाच्या प्रगतीनुसार टप्प्याटप्प्याने वितरित करण्यात यावा व त्यांना अदा करण्यात आलेल्या निधीचे उपयोजन प्रमाणपत्र तपशिलासह प्राप्त करुन त्याची प्रत शासनास सादर करावी असे निर्देश दिलेले आहे संबंधित देवस्थानला दि.०८/०९/२००६ दि.२१/०३/२००७, दि.०४/०६/२००७ रोजी स्मरणपत्र दिलेले आहेत परंतु त्यांचेकडून अद्याप **प्रकल्प अहवाल** प्राप्त झालेला नाही. त्यांचेकडून प्रकल्प अहवाल आल्यानंतर शासनाचे निर्देशानुसार आर्थिक मदत देण्याबाबत विचार करता येईल.

**अ.नं.:-२** श्री रेणुकादेवी संस्थान माहूरगड यांना मा.व्य.समितीचे दि.१७/०२/०७ चे सभेतील निर्णय क्र.१७२ अन्वये रु. ५० लाख देण्यास मान्यता दिलेली आहे. त्यांना शासनाने दि. दि.१३ एप्रील २००७ चे पत्रान्वये देवस्थानाच्या विकास कामाचा प्रकल्प अहवाल आल्यानंतर मंजुर अर्थसहाय्य **(रु.५० लाख)**अदा करण्यात यावे. तसेच श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांच्या व्यवस्थापन समितीस संबंधित विकास कामाच्या प्रगतीवर देखरेख करण्याचा अधिकार असेल. तसेच देवस्थानचे कामकाज पुर्ण झाल्यानंतर कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांनी सदर देवस्थानकडून उपयोगिता प्रमाणपत्र घेऊन शासनास सादर करावे, असे निर्देश दिलेले आहेत. देवस्थानने दि.२८/०६/२००७ चे पत्रासोबत प्रकल्प अहवाल व इतर आवश्यक कागदपत्र सादर केलेले आहे.

**अ.नं.३** श्री महालक्ष्मी देवस्थान कोल्हापूर, मा.व्य.समितीचे दि.१७/०२/०७ चे सभेतील निर्णय क्र.१७३ अन्वये रु. ५० लाख देण्यास मान्यता दिलेली आहे. त्यांना शासनाने दि. दि.१३ एप्रील २००७ चे पत्रान्वये " देवस्थानाच्या विकास कामाचा प्रकल्प अहवाल आल्यानंतर मंजुर अर्थसहाय्य **(रु.५० लाख)**अदा करण्यात यावे. तसेच श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांच्या व्यवस्थापन समितीस संबंधित विकास कामाच्या प्रगतीवर देखरेख करण्याचा अधिकार असेल. तसेच देवस्थानचे कामकाज पुर्ण झाल्यानंतर कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांनी सदर देवस्थानकडून उपयोगिता प्रमाणपत्र घेऊन शासनास सादर करावे," असे निर्देश दिलेले आहेत.

देवस्थानने त्यांचे दि.२६/०४/२००६ चे पत्रान्वये **८ प्रकारचे** कामांसाठी **रु.३ कोटी ७३ लाख** खर्चाचे पत्र सादर केलेले होते. मात्र शासनाने **रु.५० लाख** मदत मंजुर केल्यानंतर फक्त भक्तनिवास

बांधकामाचेच **रु.१ कोटी ३३ लाख** खर्चाचे प्लॅन एस्टीमेट सादर केलेले असल्याने त्यांनी नियोजीत कामाचे खर्चात केलेल्या बदलास मान्यता असावी ही विनंती.

**अ.नं.४:-**महारोगी सेवा समिती वरोरा,जि.चंद्रपूर मा.व्य.समितीचे दि.१७/०२/२००७ चे सभेतील निर्णय क्र.१७५ अन्वये रु.१ कोटी आर्थिक मदत देण्यास मान्यता दिलेली आहे. यांनी प्रथम **चेतना अभियान व आनंदवन प्रकल्पासाठी** आर्थिक मदतीची मागणी केली होती नंतर दि.९ मे २००७ चे पत्रान्वये नियोजित प्रकल्पात बदल करुन महारोग्यांचे कल्याणार्थ विविध उपक्रमातील शेती, पाणीपुरवठा,पेशंटची वहातूक,तसेच महारोग्यांच्या कल्याणार्थ विविध प्रकारची वाहने व इतर साहित्य खरेदी करणे करीता आर्थिक मदत मिळणेस विनंती केलेली आहे. त्यास शासनाने त्यांचे दि.१८ जुन २००७ चे पत्रान्व्ये **रु.१ कोटी** निधी देण्यास मान्यता दिली आहे. "सदर निधी टप्प्याटप्प्याने वितरीत करण्यात यावा व त्यांना अदा करण्यात आलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र तपशिलासह प्राप्त करुन घेऊन त्याची प्रत शासनास सादर करावी " असे कळविले आहे.

तरी **अ.नं.:-१** श्री क्षेत्र तुळजापुर, यांचेकडून प्रकल्प अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कार्यवाही करता येईल. व **अ.नं.२** श्री रेणुकादेवी संस्थान माहूरगड, **अ.नं.३-**श्री महालक्ष्मी देवस्थान कोल्हापूर, **अ.नं.४** महारोगी सेवा समिती वरोरा यांना शासनाचे निर्णयानुसार आर्थिक मदत अदा करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३९** **श्री ताराचंद म्हस्के यांचे दिनांक २९.६.२००७ चे पत्राबाबत**
**निर्णय क्र.४९४** श्री ताराचंद विठ्ठल म्हस्के यांनी त्यांचे दिनांक २९.६.२००७ चे पत्रान्वये ते संस्थानमध्ये जनसंपर्क अधिकारी या पदावर काम करत होते. दरम्यानच्या काळात त्यांना कामावरुन कमी केले. संस्थानचा हा आदेश बेकायदेशिर ठरवत मा.कामगार न्यायालयाने त्यांना परत जनसंपर्क अधिकारी या पदावर पूर्वलक्षी प्रभावाने नेमणूक केली असून आतापर्यन्तचे या पदासाठीचे सर्व वेतन,भत्ते,ग्रॅच्युटी, पी.एफ इत्यादी अन्य लाभ देण्याविषयी आदेश कोर्टाने दिलेले आहेत ते सर्व देणी मिळावी अशी विनंती केलेली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री ताराचंद विठ्ठल म्हस्के यांचेबाबत सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना/कामगार अधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ४०** **श्री सुभाष किसन जगताप, प्रशासकीय अधिकारी यांचे सेवेबाबत.**
**निर्णय क्र.४९५** संस्थानचे ध्येय धोरणानुसार विहीत वयोमान (वयाची ६० वर्षे) पुर्ण झाल्याने श्री सु.कि.जगताप,प्रशासकीय अधिकारी हे दि.३०/०६/२००७ रोजी सेवानिवृत्त होत आहेत.

तथापि त्यांनी दि.२०/०५/२००७ रोजी अर्ज सादर करुन त्यात," **३० जुन २००७** रोजी मी सेवानिवृत्त होत आहे.रविवार दिनांक २०/०५/२००७ रोजी व्यवस्थापन मंडळाची सभा होती.मा.अध्यक्ष यांनी समक्ष बोलावून ०१ वर्षे काम करण्याची तयारी आहे काय ? अशी विचारणा केली आहे.एक वर्षासाठी मला आहे त्या पदावर पदाचे अधिकार व असलेले वेतनावर काम करण्याची संधी दिल्यास मी माझे भाग्य समजेन.तरी माझ्या अर्जाचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन मला एक वर्षे सेवा करण्याची संधी द्यावी."अशी विनंती केलेली आहे.

याआधी संस्थान आस्थापनेवरील " श्री ए.आर.शिंदे चौकशी व निवासस्थान विभाग प्रमुख हे सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी तसेच डॉ.पी.एस.देशपांडे,वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांनीही यापूर्वी सेवानिवृत्तीनंतर सेवेत मुदतवाढ मागितली होती. तथापि त्यांची विनंती नामंजूर करण्यात आली होती.

दिनांक ३१/०१/२००४ रोजी श्री श्यामसुंदर लक्ष्मण शहाणे स्वागत अधिकारी,हे वयाची ६० वर्ष पुर्ण झाल्याने सेवानिवृत्त झाले होते.ते त्या कालावधीत व्यवस्थापन मंडळाचे विश्वस्त,(कर्मचारी प्रतिनिधी म्हणून) होते.त्यावेळच्या विश्वस्त मंडळाची मुदत दि.३१/०८/२००४ या कालावधी अखेर संपत असल्याने मा.विश्वस्त मंडळाच्या मुदती अखेर पावेतो त्यांना विश्वस्त (त्यांची विश्वस्तपदी **"कर्मचारी प्रतिनिधी "**म्हणून नेमणूक असल्याने सेवानिवृत्तीनंतर त्यांना विश्वस्त पदावर राहाता आले नसते म्हणून) या पदावर राहाता यावे,या करीता **एक खास बाब म्हणून** उपरोक्त तारखे अखेर (सात महिने) प्रतिमहा रुपये- ११,०००/- मानधनावर कंत्राटी पध्दतीने स्वागत अधिकारी या पदावर नेमणुक करण्यात आली होती त्यावेळी त्यांचा एकूण मासिक पगार रुपये- ११,२३८/- इतका होता.

तरी श्री जगताप यांचे विनंती अर्जाचा विचार करुन त्यांना कंत्राटी पध्दतीने एक वर्षासाठी नेमणूक द्यावी. व त्यांचे मानधन निश्चित करावे असा प्रस्ताव मा.कार्यकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे प्रशासकीय कामाचा वाढता व्याप विचारात घेता प्रशासकीय कामाचा प्रदीर्घ अनुभव असलेले श्री.जगताप यांना कंत्राटी पद्धतीने प्रशासकीय अधिकारी या पदावर एक वर्ष कालावधीसाठी नेमणूक करण्यात यावी.या कालावधीत त्यांनी मंदिरातील वर्षभर साजरे होणारे विविध कार्यक्रम, उत्सव, दैनंदिन पुजा, विधी इत्यादींचे डॉक्युमेंटेशन प्राधान्याने करवुन घ्यावे. याकालावधीत त्यांना प्रतीमहा रुपये २०,०००/-इतके नियत वेतन देण्यात यावे, असें ठरलें. (कार्यवाही-अधिक्षक आस्थापना)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ४१** **मंदीर परिसराभोवती सिक्यूरिटी सर्च टॉवर बनविणेकरिता प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून कोटेशनसादरकर्त्यांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.४९६** दिनांक १७ जून,२००७ रोजी मंदीर सुरक्षेसंबंधी झालेल्या मिटींगमध्ये मंदीर परिसराभोवती ४ सिक्यूरिटी टॉवर उभे करण्याबाबत निर्णय झालेला आहे. प्रती टॉवर रक्कम रुपये ६७,६५८/- इतका खर्च अपेक्षित असून, चार टॉवरसाठी रक्कम रुपये २,७०,६३२/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार सिक्यूरिटी सर्च टॉवर बनविणेकामी कोटेशन मागविण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्याचे नाव |
|---|---|
| ०१ | मे.अभिषेक फॅब्रिकेशन,अहमदनगर |
| ०२ | मे.साईकृपा फॅब्रिकेशन वर्क्स,बाभळेश्वर |
| ०३ | मे.के.जे.स्टील ॲण्ड फॅब्रिकेशन,श्रीरामपूर |
| ०४ | मे.श्रीराम इंजिनिअरिंग वर्क्स,साकुरी-राहाता |
| ०५ | मे.दिपक फॅब्रिकेशन वर्क्स,कोल्हार |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता,त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्याचे नाव | निविदेतील दर रुपये | वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मे.अभिषेक फॅब्रिकेशन,अहमदनगर | १,०६,२७५.०० | १,०३,७७५.०० |
| ०२ | मे.साईकृपा फॅब्रिकेशन वर्क्स,बाभळेश्वर | १,०३,२२२.५० | अनुपस्थित |
| ०३ | मे.के.जे.स्टील ॲण्ड फॅब्रिकेशन,श्रीरामपूर | १,०५,३३७.५० | १,०५,३३७.५० |
| ०४ | मे.श्रीराम इंजिनिअरिंग वर्क्स,साकुरी-राहाता | ८०,६९७.०० | ८०,६९७.०० |
| ०५ | मे.दिपक फॅब्रिकेशन वर्क्स,कोल्हार | १,०४,५५०.०० | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.श्रीराम इंजिनिअरिंग वर्क्स,साकुरी-राहाता यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असे ठरले.

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ४२** **: समाधी मंदीर कळस व गोपूराला सोन्याचा मुलामा देणेबाबत.**

**निर्णय क्र.४९७** समाधी मंदिर कळस व त्यासोबत चार छोटे चबुतऱ्यांच्या गोपूराला सोन्याचा मुलामा देणेबाबत साईभक्त श्री बी. विजयकुमार, हैद्राबाद यांनी दि. २८/०४/२००७ चे पत्रान्वये इच्छा व्यक्त केली आहे.

याबाबत, दिनांक २८/०४/२००७ चे मंदिर विभागाकडील टिपणीनुसार याकामी एकूण रु. ३३,४६,२००.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे. सदरचे काम स्वामी नारायण आर्ट क्रिएशन, नाशिक यांचे मार्फत साईभक्त विजयकुमार, हैद्राबाद यांनी देणगीदाखल करुन देणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि. ३०/०४/२००७ चे सभेत नि.क्र. ३४० अन्वये मान्यता देण्यात आली आहे. मंदिर विभागाकडील पत्र . क्र. ८४३५ दि. ३१/०५/२००७ ने काम सुरु करणेबाबत त्यांना परवानगी देण्यात आली आहे.

स्वामी नारायण आर्ट क्रिएशनचे श्री. गढवी यांनी या कामासाठी बांधकाम विभागामार्फत पहाड बांधून देण्याबाबत मागणी केली होती, पहाड उभारणीसाठी येणारा खर्च साईभक्त देणार असल्याचे मंदिर विभाग प्रमुख यांनी सांगितले आहे. त्यानुसार आय.व्ही.आर.सी.एल.कंपनी मार्फत पहाड बांधून देण्यात आला आहे. दि. ०५/०६/२००७ पासून आर्ट क्रिएशनचे कारागीर यांनी शिखराचे पॉलिशिंगचे काम सुरु केले आहे.

समाधी मंदिर कळस व गोपुराला सोन्याचा मुलामा देणारे कारागिर कशाप्रकारे काम करणार आहेत, सोन्याचा मुलामा कसा देणार आहे, सदर मुलामा किती दिवस टिकणार आहे, यापुर्वी अशाप्रकारचे त्यांने कोठे कामे केली आहेत इ. माहिती आर्ट क्रिएशनचे श्री गढवी यांचेकडून मागविण्यात आली होती. दि. १२/०६/२००७ चे पत्रान्वये श्री गढवी यांनी खालील प्रमाणे काम करण्यात येणार असल्याचे कळविले आहे.

**टप्पा क्र. ०१ :-**

**पृष्ठभाग साफ करणे :-** शिखराचा पृष्ठभाग रंगाच्या अनेक थरांनी आच्छादलेला आहे. सदरचे थर बाहेर निघाले आहेत व एकसारखे नाहीत. त्यांना चिकटून राहण्याची ताकद उरलेली नाही. त्यामुळे ते थर कधीही बाहेर येऊ शकतात त्यामुळे धूळ , रंगाचे थर इ. सुरुवातीस घासून साफ करुन घेण्यात येतील.

**टप्पा क्र. ०२:-**

**पृष्ठभाग तयार करणे :-** शिखर सिमेंटचे बनविले आहे. त्यामुळे त्याचा बाहेरील पृष्ठभाग फारच खडबडीत आहे. सुवर्ण कला कामामध्ये अगदी बारीक कण देखील स्पष्टपणे उठून दिसतात. त्यामुळे पृष्ठभाग तयार करण्याचे काम खालील तिन टप्प्यात केले जाईल.

**अ) घासणे व गुळगुळीत करणे :-** खडबडीत व वर खाली असणारा पृष्ठभाग या प्रक्रीयेत एका पातळीत आणला जाईल ही प्रक्रीया अत्यंत हळुवार पणे केली जात असल्याने शिखराच्या मुळ कामाला कुठल्याही प्रकारे ईजा होणार नाही.

**ब) स्तरीकरण :-** पृष्ठभाग घासल्यानंतर सर्व भागाला (STRONG) लांबी भरली जाईल त्यामुळे सर्व तडे / खड्डे भरले जाऊन पृष्ठभाग मऊ होऊन जलप्रतिबंधक होईल.

**टप्पा क्र. ०३ :-**

**गुळगुळीत करणे व सिलीकॉनीकरण करणे :-** वर भरलेली लांबी पूर्णपणे सॅंड पॉलीश पेपरने घासून गुळगुळीत केली जोईल आणि त्यानंतर सर्व शिखराला सिलीकॉन आधारीत रंग दिला जाईल.

**देण्यात येणारा सिलीकॉन रंग :-**

खास दगड, सिमेंट व संगमरवरी कामांसाठी आहे. ते सिमेंट बांधकामाशी आयुष्यभरासाठी जोडले जाते आणि ते बांधकामावर हवामानांचा परिणाम होऊ देत नाही. ते उष्णतेचे दुर्वाहक असल्याने ते शिखराला अत्युच्य उष्णतेत सुध्दा संरक्षण देईल व त्यामुळे त्याचे आयुष्य मोठ्या प्रमाणात वाढेल.

**टप्पा क्र. ०४ :-**

**सुवर्ण कला काम :-** या टप्प्यावर खरे सुवर्ण कला काम सुरु होते. सदर सुवर्ण कला काम तीन टप्प्यात केले जाते.

०१. सर्व शिखर खास रसायनाने आच्छादित केले जाईल. त्यानंतर त्यावर शुध्द सुवर्ण पत्र विशिष्ट रसायन वापरुन बसवले जाईल. या रसायनाने सुवर्णपत्रे कळसावर पक्की बसतील.

०२. सर्व शिखरावर सोन्याचा पहिला थर दिल्यानंतर शिखराला दुसरे 'वज्रलेप' नावाचा रसायन लावले जाईल. हे रसायन अत्यंत सशक्त व पारदर्शी आहे. ते सोन्याचे नैसर्गिक आपत्तींपासून संरक्षण करते.

०३. आणखी एक शुध्द सोन्याचा थर पूर्ण शिखरावर दिला जाईल तसेच त्याला गुळगुळीत व चकचकीत केले जाईल. यामुळे शिखर सुवर्ण रंगाने चमकेल व त्यामुळे भक्त हे दृश्य पाहून चकीत व आनंदी होतील.

**टप्पा क्र. ०५ :-**

**सजावट :-**

लाल, हिरवे व पांढरे अमेरीकन रत्ने वापरुन शिखराची सजावट केल्यावर शिखर एखाद्या मुकुटासारखे दिसेल.

आर्ट क्रिऐशन यांनी खालील प्रमुख ठिकाणी काम केलेले आहे. कळसाला देण्यात येणारा सोन्याचा मुलाम्यावर वारा, पाऊस, ऊन या हवामानाचा परिणाम कमीत कमी १५ वर्षे होणार नाही. अशी ग्वाही त्यांनी दिली आहे.

| अ.नं. | ठिकाण | अ.नं. | ठिकाण |
|---|---|---|---|
| ०१ | भिलवाडा, राजस्थान | ०२ | झारखंड |
| ०३ | बिहार | ०४ | अमेरिका |
| ०५ | गुजरात | ०६ | मुंबई |
| ०७ | चेन्नई | ०८ | सुरत |
| ०९ | अहमदाबाद. | | |

उपरोक्त ठिकाणांचे कामापैकी काही छायाचित्रे सादर केली असून याबाबत सविस्तर करारनामा करुन घेणे बाबत मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ३० एप्रिल, २००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३४० अन्वये साईभक्त श्री.बी.विजयकुमार, हैद्राबाद यांना समाधी मंदिर कळस व चार छोटया चबुतऱ्यांच्या गोपुराला देणगीदाखल सोन्याचा मुलामा देणेसाठी मान्यता देण्यात आलेली होती व त्यानुसारच मंदिर विभागाकडील दिनांक ३१ मे, २००७ रोजीचे पत्रान्वये उपरोक्त काम सुरु करणेकामी साईभक्त श्री.बी.विजयकुमार,हैद्राबाद यांना कळविण्यात आलेले होते. यानुसार,साईभक्त श्री.बी.विजयकुमार, हैद्राबाद यांनी या कामातील तज्ञ व कुशल संस्था स्वामीनारायण आर्टक्रिएशन, नाशिक यांना नेमलेले आहे. त्यानुसार स्वामीनारायण आर्टक्रिएशन, नाशिक चे श्री.गढवी यांनी उपरोक्त परिच्छेदांमध्ये विवेचन केल्यानुसार सोन्याचा मुलामा देण्यासाठी वापरण्यात येणारी कार्यपध्दती विषद केली आहे. या कार्यपध्दतीनुसार समाधी मंदिर कळस व चार छोटया चबुतऱ्यांच्या गोपुराला सोन्याचा मुलामा देण्याचे काम सुरु आहे. या कार्यपध्दतीस मान्यता देऊन, या कामासाठी वापरण्यात येणाऱ्या कार्यपध्दतीसह अनुषंगिक साहित्याचे टिकाऊपणा व सुशोभिकरणाबाबत साईभक्त श्री.बी.विजयकुमार, हैद्राबाद व स्वामीनारायण आर्ट क्रिएशनचे श्री.गढवी यांचेकडून कामाचे हमीपत्र करुन घेण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,मंदीर/बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४३** **नविन प्रसादालयाकडे जाणेसाठी बस थांबा करणेबाबत**

**निर्णय क्र.४९८** संस्थानतर्फे भक्तांचे सोयीसाठी नविनभक्तनिवास येथे जाणेसाठी विनामुल्य बससेवा सुरु करणेत आलेली आहे. संस्थानतर्फे लवकरच प्रसादालयाची सोय जुने प्रसादालय इमारतीतून नविन प्रसादालय इमारतीमध्ये स्थलांतरीत होणार आहे. नविन प्रसादालयाची इमारत मंदिर परिसरापासून साधारणतः ४०० मिटर अंतरावर आहे. तसेच सध्याचे प्रसादालयापासून सुमारे ३०० मिटर अंतरावर आहे.

संस्थानतर्फे भक्तांसाठी जुने प्रसादालय ते नविन प्रसादालय पर्यंत बससेवा सुरु करावयाची आहे. याकामी बस पिक अप शेड करुन मिळणेबाबत वाहन विभाग प्रमुख यांनी कळविले आहे.

याकरिता खालील पर्यायांचा विचार करता येईल-

१. सध्या प्रसादालय पार्किंग येथे नविन भक्तनिवासस्थान ते प्रसादालय अशी बससेवा सुरु आहे. त्याठिकाणी बस पिक अप शेड तयार करणेत आलेले आहे. त्याच शेडचा वापर नविन प्रसादालयासाठी सुरु होणाऱ्या बससेवेसाठी करता येईल.

२. प्रसादालय परिसरात कॅंटीन समोर पत्राशेड आहे. तसेच त्यासमोर नगर-मनमाड रोडवर कंपाउंड वॉल गेट बसविणेत आलेले आहे. सदरचे गेट सुरु करणेसाठी त्याठिकाणी आतील बाजूस पायऱ्या बांधून गेट सुरु करता येईल व भक्तांना बसणेसाठी सदर पत्राशेडमध्ये खुर्च्या/ बाकडे टाकून व्यवस्था करुन नगर- मनमाड रोडवर पूर्व बाजूकडील फुटपाथचे कडेला बस उभी करुन बससेवा चालू करता येईल.

३. जुना पिंपळवाडी रस्त्यावर प्रसादालय महाव्दार समोर संस्थानचे टॉयलेट ब्लॉक आहे. सदरचा टॉयलेट ब्लॉक काढून त्या ठिकाणी बस पिक अप शेड करता येईल.

प्रसादालय परिसरात कॅंटीन समोर पत्राशेड आहे. तसेच, नगर-मनमाड रोडवर कंपाऊंड वॉल गेट बसविणेत आलेले आहे. सदरचे गेट सुरु करणेसाठी आतील बाजूस २-३ पायऱ्या बांधून गेट चालू करता येईल. याप्रमाणे भक्तांना थांबविण्यासाठी असलेल्या शेड मध्ये खुर्च्या/ बाकडे टाकून व्यवस्था करुन बस नगर-मनमाड रोडवर पूर्व फूटपाथच्या कडेला उभी करुन प्रायोगिक तत्वावर चालू करुन भक्तांना नवीन प्रसादालयात जाण्याचे वळण लागेल व प्रसादालयातून परत आलेल्या बसेस सध्याच्या भक्तनिवासस्थानच्या साईप्रसाद नं.२ च्या शेजारी बस स्टॉपवर भक्तांना उतरवावे. या प्रकारे नगर-मनमाड रोडवर कमीत कमी वर्दळ होईल व भक्तांना नवीन प्रसादालयात जायचे वळण लागेल व सोयीचे होईल.

वरील पर्यायाप्रमाणे आवश्यकतेनुसार साईभक्तांचे सोयीचे दृष्टीने बस सेवा सुर करण्यात यावी, असें ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४४** **डॉ. यशोधन पितांबरे मेडीकल ऑफिसर (जनरल डयुटी) यांचा भूलतज्ञ पदनाम मिळणेबाबत अर्ज .**

**निर्णय क्र.४९९** डॉ. यशोधन वाय पितांबरे, यांची संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयात रु.८०००-१३५०० या वेतनश्रेणीत वैद्यकिय अधिकारी (जनरल डयुटी ) या पदावर नेमणूक करण्यात आलेली असून ते दि.०७/०६/१९९९ रोजी कामावर हजर झालेले आहेत. त्यांना दि.०७/०६/२००० पासून संस्थान सेवेत कायम करण्यात आलेले आहे.

भूलतज्ञ या उच्च प्रशिक्षणासाठी त्यांनी केलेल्या विनंती नुसार मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. १९३ जा.नं.एसएसएस/वशी-०१/७१८५/२००५ दि. ११/०७/२००५ अन्वये उच्च प्रशिक्षण संपल्यानंतर ०३ वर्षे संस्थानकडे सेवा देण्याच्या रु. १००/- च्या स्टॅंप पेपरवर बंधपत्र देण्याच्या अटीवर दि. ०१/०२/२००५ पासून पुढे १८ महिन्यांची विनावेतन अध्ययन रजा मंजूर करुन त्यांना उच्च प्रशिक्षणासाठी जाण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. सदर प्रतिज्ञा पत्रामध्ये खालील ०१ ते ०६ अटी-शर्ती नमूद केलेल्या असून त्या मान्य असलेबाबत त्यांनी दि.३०/०७/२००५ रोजी प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी केली असून डॉ. व्ही बी.धस व डॉ. बाकलीवाल साक्षीदार आहेत.

०१) माझे दि. **२२/०५/२००५** चे विनंती अर्जानुसार **"भूलतज्ञ "**या पदाचे उच्च शिक्षणासाठी मला खाजगी रित्या दि. **०१/०२/२००५** पासून **पुढे १८ महिने** कालावधीसाठी माझी विनावेतन अध्ययन रजा मंजूर केलेली आहे. ती मला मान्य आहे.

०२) माझे **"भूलतज्ञ"** या उच्च पदाचे प्रशिक्षण संपल्यानंतर मी त्वरीत संस्थान मध्ये माझे मूळ पदावर ( वैद्यकिय अधिकारी जनरल डयुटी ) रुजू होऊन या पदावर तीन वर्षे सेवा देण्याचे मला मान्य आहे.

०३) उच्च शिक्षण संपलेनंतर कामावर हजर झाल्यानंतर मी **तीन वर्षे** पर्यंत राजीनामा देणार नाही. उच्च शिक्षण घेऊन आल्यानंतर उच्च वेतनश्रेणीची व पदाची मागणी करता येणार नाही. हे मला मान्य आहे.

०४) उच्च शिक्षणाचा कालावधी संपवून मी संस्थान सेवेत कामावर रुजू झाल्यानंतर सेवाजेष्ठतेबाबत संस्थान सेवानियमाप्रमाणे झालेली कार्यवाही मला मान्य व बंधनकारक राहील.

०५) उच्च शिक्षणाचे कालावधीत कोणत्याही प्रकारचे वेतन, महागाई भत्ता सानुग्रह अनुदान इत्यादी रक्कमा मिळणेस पात्र रहाणार नाही व तशी मागणीही मी करणार नाही.

०६) मी उच्च शिक्षणाचा कालावधी संपताच कामावर हजर न झाल्यास व त्यामुळे संस्थान कामकाजात खोटी निर्माण झाल्यास मी सर्वस्वी जबाबदार राहील त्याकामी संस्थानला **तीन महिन्याचे एकूण वेतनाइतकी रक्कम** जमा करणेस बांधील आहे व ते माझेवर बंधानकारक आहे.

डॉ. पितांबरे हे उपरोक्त प्रमाणे उच्च प्रशिक्षण पूर्ण करुन ते दि.०१/०८/२००६ रोजी संस्थानकडे वैद्यकिय अधिकारी जनरल डयुटी या पदावर कामावर हजर झालेले आहेत.

आता डॉ. पितांबरे यांनी दि. २७/०३/२००७ रोजी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यात " I Dr. Y.A. Pitambare working as M.O. (Casualty ) has complited my Diploma in Anaesthesia. I here by requesting you to kindly offer me post of Anaesthesist in Sainath Hospital to work in operation theature as Anaesthestist. Certificate of passing D.A. Examination is attached here with application. Kindly do the needful. " अशी विनंती केली आहे.

सदर अर्जावर वैद्यकिय अधिक्षीका श्री साईनाथ रुग्णालय यांनी टिपणी सादर करुन त्यात डॉ. यशोधन पितांबरे वैद्यकिय अधिकारी हे श्री साईनाथ रुग्णालयात दि. ०६/०६/१९९९ पासून सेवेत आहेत. डॉ. पितांबरे, वैद्यकिय अधिकारी संस्थानच्या पूर्व परवानगीने Post Graduate diploma in Anaesthesia करण्यासाठी अठरा महिन्यांची विनावेतन रजा घेऊन गेले होते. त्या कालातील त्यांची रजा विनावेतन होऊन त्यांना पगारवाढ दिलेली नाही. त्यावेळी त्यांनी बॉन्ड लिहून दिला होता. त्याकाळी चार भूलतज्ञ श्री साईनाथ रुग्णालयात होते.आता फक्त एकच भूलतज्ञ असून त्याही रजेवर आहेत. हया परिस्थितीत बॉडच्या अटी शिथील करुन डॉ.पितांबरे यांना भूलतज्ञ म्हणून पदनाम देऊन श्री साईनाथ रुग्णालयात काम करण्याची परवानगी देणेस हरकत नाही.

डॉ. पितांबरे यांनी उच्च शिक्षण घेऊन आल्यापासून आतापर्यंत ६४५ च्या आसपास रुग्णांना भूल देण्याचे काम केलेले आहे. त्यांचेबाबत काहीही तक्रारी आलेल्या नाहीत. श्री साईनाथ रुग्णालयात एकच कायमस्वरुपी भूलतज्ञ आहे. डॉ.मृणालीनी गोंदकर वैद्यकिय अधिकारी ( भूलतज्ञ) हे काम पहाते आहे. शस्त्रक्रियांची वाढती संख्या लक्षात घेता सदर काम श्री साईनाथ रुग्णालयाचे पॅनल वरील भूलतज्ञाकडून करण्यात येते.त्यांचे महिन्याचे बील पाहता नवीन एखाद्या वैद्यकिय अधिकारी भूलतज्ञाची नेमणूक करणे योग्य व आवश्यक वाटते. " असे नमूद केले आहे.

सदर टिपणीवर " भूलतज्ञाची नितांत आवश्यकता असल्यामुळे व भूलतज्ञांचा उपयोग करतांना पद हे भूलतज्ञाचेच असावे लागते. करीता भूलतज्ञ पद देण्याची शिफारस करण्यात येत आहे. असे अभिप्राय वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी दिले आहेत.

डॉ. पितांबरे यांचेकडून करुन घेण्यात आलेल्या बॉन्डचे अटी शिथील करुन त्यांना पदनाम देणेसंबंधी विचार व्हावा कारण भूलीसाठी बाहेरुन डॉक्टर्स घेणे खुप खर्चिक आहे. असे अभिप्राय प्रशासकिय अधिकारी रुग्णालये यांनी दिले आहेत.

डॉ.पितांबरे यांना उच्च शिक्षणासाठी परवानगी देतांना त्यांचेकडून घेतलेले बंधपत्र हे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार करुन घेण्यात आलेले आहे. त्यात अटी शर्ती

क्र. ०२.माझे **"भूलतज्ञ"** या उच्च पदाचे प्रशिक्षण संपल्यानंतर मी त्वरीत संस्थान मध्ये माझे मूळ पदावर ( वैद्यकिय अधिकारी जनरल डयूटी ) रुजू होऊन या पदावर तीन वर्षे सेवा देण्याचे मला मान्य आहे.

क्र.०३ .उच्च शिक्षण संपलेनंतर कामावर हजर झाल्यानंतर मी **तीन वर्षे** पर्यंत राजीनामा देणार नाही. उच्च शिक्षण घेऊन आल्यानंतर उच्च वेतनश्रेणीची व पदाची मागणी करता येणार नाही. हे मला मान्य आहे. अशी आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ. पितांबरे यांनी केलेली विनंती व वैद्यकिय अधिक्षिका श्री साईनाथ रुग्णालय, वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल, व प्रशासकिय अधिकारी रुग्णालये यांचे अभिप्रायानुसार बंधपत्रामधील इतर अटी-शर्ती कायम ठेवून अट क्र. ०३ थोडी शिथील करुन मेडीकल ऑफिसर ॲनास्थेशिया हे पद ( फक्त ) द्यावे . त्यामुळे कायदेशीर दृष्टया त्यांचेकडून कामही करवून घेता येईल. त्यांना बंधपत्रानुसार त्यासाठीचे वेतन किंवा इतर कुठलाही मेहनताना मागता येणार नाही अशी अट त्यांना घालण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ४५** **श्री घनश्याम प्रमोद कुलकर्णी यांचे बंधू श्री जयंत कुलकर्णी, यांचे नाकाच्या ऑपरेशनमध्ये झालेल्या गुंतागुंतीसंबंधी तक्रारीबाबत...**

**निर्णय क्र. ५००** श्री घनश्याम प्रमोद कुलकर्णी यांनी त्यांचे दि.०२/०६/२००७ रोजीचा अर्जान्वये त्यांचे बंधू श्री जयंत कुलकर्णी यांचे नाकाच्या ऑपरेशनमध्ये झालेल्या गुंतागुंतीबाबत तक्रार केली आहे. त्याबाबत संक्षिप्त घटनाक्रम पुढीलप्रमाणे-

०१) डॉ.शंतनु टंडन, ई.एन.टी.सर्जन यांनी दि.३०/०४/२००७ रोजी श्री जयंत कुलकर्णी यांचे नाकावर इंडोस्कोपीव्दारे पॉलिप काढणेची शस्त्रक्रिया केली.

०२) सदर शस्त्रक्रियेमध्ये कवटीच्या अंतर्भागातील नाजूक हाडाला इजा पोहचून मेंदुभोवतालचे सी.एस.एफ. लिक्वीड लिक होऊ लागले.
०३) वरील घनटेमुळे मेंदुच्या आतमध्ये रक्तात गुठळया तयार होऊन मेंदुला इजा पोहचली.
०४) नाकातील अंतर्भागातून मेंदूपर्यंत इजा पोहचल्यामुळे वातावरणातील जंतूंचा प्रादुर्भाव मेंदूपर्यंत पोहचला.
०५) उपरोक्त कारणांमुळे पुढील उपचारासाठी रुग्णाला बॉम्बे हॉस्पिटलमध्ये हलवावे लागले व तेथे डोक्यावर मोठी शस्त्रक्रिया करावी लागली. तरीसुध्दा अदयापही रुग्णाची तब्येत पूर्णपणे सुधारलेली नाही.

**सदर घटनेबाबत श्री घनश्याम कुलकर्णी यांनी केलेले आरोप पुढीलप्रमाणे :-**

०१) डॉ.टंडन यांनी हे ऑपरेशन छोटे असून रुग्णाला एक दिवसात सुट्टी मिळेल असे सांगितले.
०२) डॉ.टंडन यांना अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया करण्याचा अनुभव नसल्यामुळे मेंदूमध्ये गुंतागुंत निर्माण झाली आहे.
०३) शस्त्रक्रियेपूर्वी (रक्त, मेडीकल फिटनेस इ.) कुठल्याही प्रकारची तपासणी न करता श्री जयंत कुलकर्णी यांचेवर शस्त्रक्रिया करण्यात आली.
०४) बॉम्बे हॉस्पिटलचे डॉक्टरांचे अभिप्रायानुसार डॉ.टंडन यांचे चुकीच्या पध्दतीच्या शस्त्रक्रियेमुळेच श्री जयंत यांच्या जीवाला धोका पोहचून गंभीर परिस्थिती निर्माण झाली.

**सदर पत्रात श्री घनश्याम कुलकर्णी यांनी पुढील शंकाही व्यक्त केल्या आहेत.**

०१) सुपर स्पेशालिटीमधील सर्व डॉक्टर्स स्पेशालिस्ट आहेत का?
०२) कित्येक रुग्णांवर आवश्यकता नसतांनाही शस्त्रक्रिया होतात का?
०३) अनावश्यक शस्त्रक्रिया पैशांच्या हव्यासापायी होत आहेत का?
०४) श्री साईबाबांचे शिकवणीचा गोर गरिबांना लाभ होईल का?

**जा.क्र.एसएसएस/वशी-७ए/१५५०/२००७ दि.१८/०६/२००७ अन्वये डॉ.टंडन यांना कारणे दाखवा नोटीस बजावली असता त्यांनी सविस्तर खुलासा केला आहे. त्यातील प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे :-**

**०१) श्री जयंत कुलकर्णी यांचे**वर औषधांचा उपयोग न झालेमुळे शस्त्रक्रिया करणे क्रमप्राप्त झाले व शस्त्रक्रिया करणेबाबत रुग्णाने स्वत:हून निर्णय घेतला आहे.
०२) सदर गुंतागुंत जाणूनबूजून झालेली नसून ती दृदैवी घटना होती. मात्र याकामीचे जरुर ते उपचार त्याचवेळी तातडीने करणेत आले.
०३) या गुंतागुंतीसंबंधी मा.डॉ.ढवळे, वैदयकीय संचालक, व मा.डॉ.टिंगरे, न्युरो सर्जन, यांचा सल्ला घेऊन दि.०१/०५/२००७ रोजी नाशिक येथे नेऊन त्यांच्या डोक्याचा एम.आर.आय. स्कॅन करण्यात आला. या स्कॅनचे प्राप्त रिपोर्ट नुसार पुढे मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांचेशी चर्चा करुन श्री जयंत यांना दि.०२/०५/२००७ रोजी पुढील उपचारार्थ बॉम्बे हॉस्पिटलला हलविण्यात आले.
०४) श्री जयंत यांना **'होमोसिस्टिनयुरिया'** होता. (हा विकार दोन ते तीन लाख व्यक्तीमध्ये एखादयाला आढळतो या विकारात शस्त्रक्रियेमध्ये रक्ताच्या गुठळया होणेची संभावना अधिक असते, ज्याव्दारे शस्त्रक्रियेत किंवा शस्त्रक्रियोत्तर गुंतागुंत निर्माण होऊ शकते.) ही श्री जयंत यांच्या संदर्भातील वस्तुस्थिती ऑपरेशननंतर उजेडात आलेली आहे.
०५) श्री जयंत कुलकर्णी यांना शस्त्रक्रियेत झालेली गुंतागुत ही निष्काळजीपणाने झालेली नसून नाकाच्या इंडोस्कोपी शस्त्रक्रियेत अशा प्रकारच्या गुंतागुंतीची क्वचितच घडणारी शक्यताही गृहीत धरावीच लागते.

**सदर प्रकरणी केलेल्या चौकशी अंती स्पष्ट झालेले मुद्दे पुढीलप्रमाणे**

- सदर रुग्णास संबंधित डॉक्टर टंडन यांनी कुठल्याही प्रकारचा औषधोपचाराचा प्रयोग न करता थेट शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतल्याचे दिसून येते.
- सदर रूग्णाच्या शारिरिक तपासणी संबंधित कुठल्याही टिपण्या नाहीत व ऑपरेशन संदर्भात (Preoperative check up) कुठल्याही तपासण्या केलेल्या नाही. या रुग्णाला Thyroid व Homocysteinuria चा त्रास असूनही त्या संदर्भात विशेषज्ञांचे मत घेतले गेले नाही वा पुर्वीपासून चालू असलेल्या औषधांचा केसपेपर वर उल्लेख केल्याचे आढळून येत नाही.
- ऑपरेशन नोट्स अतिशय त्रोटक असून त्यात जास्त रक्तस्त्राव होणे व मेंदूच्या आवरणापर्यंत इजा होणे अशा ठळक बाबी आढळतात. या शिवाय Ant. & Post Ethmoidectomy चा उल्लेख आहे.
- नाकात मुळातच Sino nasal (Ethmoidal) Polyp असल्याबद्दल केसपेपर वा सी. टी. स्कॅन मध्ये उल्लेख नाही. तात्पर्य,याचा अर्थ योग्य डायग्नोसिस निश्चित झाल्याचे आढळून येत नाही उलट योग्य निदानाशिवायच ऑपरेशन केले असल्याचे दिसून येते.
- ऑपरेशन मध्ये काढलेले Polyps पुढील तपासणीसाठी पॅथॉलॉजी लॅब मध्ये पाठवले गेलेले नाहीत त्यामुळे ऑपरेशन मध्ये नेमके कुठले भाग काढले गेले हे आता स्पष्ट होऊ शकत नाही.

➢ ऑपरेशनची तातडी नसूनही इतर वैद्यकीय उपचार न करता तडकाफडकी ऑपरेशन केले गेले आहे, ही बाब वैदयकीय दृष्टया योग्य वाटत नाही.

➢ नातेवाईकांना या ऑपरेशनबद्दल Minor Surgery असल्याची माहिती दिली होती पण Case paper व बीलींगमध्येही हेच ऑपरेशन Supra Major दाखवले गेले आहे.

➢ रुग्णाचे नातेवाईकास डॉ.टंडन यांनी ऑपरेशन व तद्नुषंगाने क्वचित का होईना पण घडणाऱ्या गुंतागुंतीबाबत संपूर्णपणे अंधारात ठेवले होते.

**<u>निष्कर्ष :-</u>** डॉ.टंडन यांनी श्री जयंत कुलकर्णी यांचेवर केलेल्या शस्त्रक्रिया अंतर्गत गुंतागुंत झाल्याचे मान्य केले आहे. तपासणी अंती डॉ.टंडन यांनी वैदयकीय दृष्टया कुठल्याही सबळ कारणाशिवाय घाईघाईने शस्त्रक्रिया केल्याचे जाणवते व सदर ऑपरेशनबाबत नातेवाईकांना मायनर सर्जरी असल्याचे सांगून केस पेपरवर प्रत्यक्षात सदर ऑपरेशन सुप्रा मेजर दाखवले आहे.

**<u>तात्पर्य:-</u>** झालेल्या गंतागुंतीचे गंभीर परिणामांना डॉ.टंडनच जबाबदार असल्याचे दिसून येते.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रकरणास डॉ.टंडन जबाबदार असल्याने त्यांची सेवा त्वरीत समाप्त करण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना/कामगार अधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.४६ मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे आपत्ती व्यवस्थापनांतर्गत मदत व पुन:र्वसन पूर्वतयारी नियोजनाबाबत मदत मिळणेसाठीचे पत्र.**

**निर्णय क्र.५०१ (अ)** मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी त्यांचेकडील दिनांक २८ जून, २००७ रोजीचे पत्रान्वये इकडील कार्यालयास उपरोक्त विषयांस अनुसरुन खालीलप्रमाणे कळविलेले आहे. त्याचा थोडक्यात गोषवारा :

माहे ऑगष्ट, २००६ मध्ये महाराष्ट्रात झालेल्या पावसामुळे मोठया प्रमाणावर पुर परिस्थिती निर्माण झाली होती. पुराच्या या आपत्तीचा फटका अहमदनगर जिल्ह्यालाही मोठया प्रमाणावर बसला. जिल्ह्यातील कोपरगांव, श्रीरामपूर, संगमनेर, राहता, राहुरी, नेवासा, शेवगांव, श्रीगोंदा तालुक्यांमध्ये पुराचे पाणी लोकवस्तीत घुसल्यामुळे मोठया प्रमाणावर मदत व पुनर्वसन कार्य राबविले गेले. जिल्हा प्रशासनाने स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीचा वापर करुन तसेच या कामासाठी लष्कराच्या बोटीव्दारे व हेलिकॉप्टरव्दारे आपतग्रस्तांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले.

आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने जिल्हाधिकारी कार्यालयात आपत्कालीन नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. यासाठी जिल्हा स्तरावर व तालुका स्तरावर शोध व बचाव पथक स्थापण्यात आलेले असून, या पथकातील सदस्यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

सन २००७ मध्ये हवामान खात्याकडून प्रसिध्द झालेल्या हवामान व पर्जन्यमानाच्या अंदाजानुसार सरासरी पेक्षा अधिक पर्जन्यमान होण्याची शक्यता वर्तवलेली आहे. त्यानुसार अहमदनगर जिल्हयात मागील वर्षासारखी पुर परिस्थिती उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही.

जिल्हा प्रशासनाकडे उपलब्ध असलेल्या साधनसामग्री व्यतिरिक्त आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक असलेल्या खालील साधनसामग्रीची उपलब्धता श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेमार्फत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास करुन दिल्यास आपत्ती व्यवस्थापनाचे कार्य प्रभावीपणे पार पाडता येईल.

| अ.नं. | साहित्याचे नांव | तपशील | अंदाजे किंमत रुपये | आवश्यक संख्या |
|---|---|---|---|---|
| ०१ | बोट | फायबर बोट क्षमता ८ ते १० व्यक्ती, ४० एचपी इंजीन, स्टेअरींग सहित | ६,००,०००/- | ००६ नग |
| ०२ | लाईफ जॅकेट | फुल साईज फोम टाईप | १,५००/- | ३०० नग |
| ०३ | लाईफ बोया (रिंग) | | २,८००/- | ०५० नग |
| ०४ | सर्च लाईट | पेली निमो डायव्हींग टॉर्च | ७,०००/- | ०२० नग |
| ०५ | वायर रोप (४०० मीटर) | ०२ किलोमीटर लांब | ३५०/- प्रति किलो | १०० किलो |

उपरोक्त साहित्य आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने प्राथम्याने तात्काळ उपलब्ध करुन देणेबाबत मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी विनंती केली आहे.

**(ब)** उपरोक्तप्रमाणे अंदाजित रक्कम रुपये ४३,६५,०००/- मात्रचे आपत्ती व्यवस्थापनाचे साहित्य मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीमार्फत उपलब्ध करुन देण्यात यावे किंवा कसे याबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर करण्यात आला होता.

तसेच आजचे सभेपुढे मा.श्री.नंदकुमार सुर्यवंशी, उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर व जिल्हा प्रकल्प अधिकारी डॉ. वीरेंद्र बडदे हे मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे प्रतिनिधी म्हणून उपरोक्त पत्राची प्रत घेऊन हजर होते. या उपस्थित असलेल्या शासकीय प्रतिनिधींशी याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यांनी मागील वर्षाचे पुर परिस्थितीचे वर्णन करुन, जिल्हा प्रशासनाने आपत्ती निवारणार्थ कशा प्रकारे सर्वंकष मदत केली याबाबत सभेस माहिती दिली तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीने मागील वर्षी केलेल्या सक्रिय मदतीबाबत व्यवस्थापनाचे आभार मानले.

याचबरोबर चालू वर्षी पावसाच्या स्थितीचे विश्लेषण करुन, हवामान खात्याचे अंदाजानुसार याही वर्षी सरासरीपेक्षा जास्त पर्जन्यमान होणार असल्याचे सुचित केले व गेल्या दोन आठवडयापासून अहमदनगर जिल्हयात पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे याची प्रचिती आपण सर्व घेत आहोत, असे निदर्शनास आणून दिले. तसेच याबाबत मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी दिनांक २४ जानेवारी, २००७ रोजी साहित्य उपलब्ध करुन देण्याबाबतचे विनंती पत्र दिलेले असून, त्याबाबत मा.व्यवस्थापन समितीने सकारात्मक निर्णय घेतला असल्याचे सांगितले.

मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे प्रतिनिधींशी झालेल्या चर्चेनुसार मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली. उपरोक्त प्रस्तावाबाबत यापुर्वी मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी दिलेल्या दिनांक २४ जानेवारी, २००७ रोजीचे पत्रानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १७ फेब्रुवारी, २००७ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक १७४ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. या निर्णयानुसार प्रशासन शाखेकडील पत्र क्रमांक एसएसएस/वशी-०३/४५७३/२००७, दिनांक २० मार्च, २००७ रोजीचे पत्राव्दारे मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. सदरहू प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे. तथापी, सध्याची पर्जन्यस्थिती पहातां, मानवतेच्या व सहिष्णूतेचे दृष्टीकोनातून आपतकालीन परिस्थितीमध्ये सर्वसामान्य जनतेस मदत व सहकार्य करण्याचे सद्‌हेतूने साहित्याची निकड व तातडी विचारात घेतां, मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी दिनांक २८ जून, २००७ रोजीचे पत्रात नमूद केल्याप्रमाणे ०५ प्रकारचे साहित्य श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीमार्फत खरेदी करुन, मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस आपतकालीन परिस्थितीत वापरणेसाठी सुपूर्द करण्यात यावे. ही बाब आपतकालिन पुर परिस्थितीशी संबधित असल्याने सदर कार्यवाही संस्थानमार्फत तातडीने करण्यात यावी. व तसे मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना कळविण्यात यावे .तसेच मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना पुर्वी सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी पाठपुरावा करण्यात यावा. सदरील साहित्य मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस सुपूर्द केल्यानंतर त्याबाबतच्या नोंदी प्रशासन शाखेकडे रितसर विहीत पध्दतीने ठेवण्यात याव्यात. उपरोक्त साहित्य खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन सिलबंद निविदा मागविण्यात याव्यात. याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देणे, साहित्य खरेदी करणे, आदि. आवश्यक अशा योग्य त्या सर्वसमावेशक अंदाजित रक्कम रुपये ५० लाख मात्रपर्यन्तचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४७** **श्री.संजय रामराव शेळके व श्री.विलास रंगनाथ शेळके व इतर यांची मौजे शिर्डी येथील आरक्षण क्रमांक ३८ (क्रिडांगण) मधील जमीन खरेदी घेणेबाबत.**

**निर्णय क्र.५०२** श्री. संजय रामराव शेळके व श्री. विलास रंगनाथ शेळके यांनी मौजे शिर्डी येथील आरक्षण क्रमांक ३७ व ३८ मधील जमीन संस्थानने खरेदी घ्यावी अशा आशयाचा प्रस्ताव-वजा-अर्ज दिनांक २८ मार्च, २००७ दिनांक ३१ मार्च, २००७ रोजी दिलेला आहे. सदर आरक्षण क्रमांक ३७ व ३८ हे सर्व्हे नंबर १२४ पैकी मधील क्षेत्रात येते.

अर्जदार यांनी इकडील कार्यालयास हजर केलेले ७/१२ उतारे पाहिले असता खालीलप्रमाणे वस्तु:स्थिती आहे :

| अ.नं. | नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र | आकार | इतर हक्क |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | संजय रामराव शेळके | १२४/११ | ०० हे ५९ आर<br>०० हे ०१ आर पोटखराबा<br>**०० हे ६० आर** | रु. १=३५ पै. | शिर्डी सो.इ.प.क.घे. |
| ०२ | विलास रंगनाथ शेळके | १२४/१२ | ०० हे ५८ आर<br>०० हे ०२ आर पोटखराबा<br>**०० हे ६० आर** | रु. १=३५ पै. | काही नाही. |
| | **एकूण --** | | **०१ हे २० आर** | | |

शिर्डी विकास आराखडयात, आरक्षण क्रमांक ३७ सर्व्हे नंबर १२४ सिटी सर्व्हे क्रमांक ९५१ क्षेत्र ०० हे ७८ आर हे प्राथमिक शाळा व क्रिडांगणासाठी राखीव असून तसेच आरक्षण क्रमांक ३८ सर्व्हे नंबर १२४ सिटी सर्व्हे नंबर ९५१ क्षेत्र ०१ हे ८९ आर हे क्रिडांगणासाठी राखीव असून या दोन्ही आरक्षणांचे भूंसपादन मंडळ शिर्डी नगरपंचायत, शिर्डी आहे. यापैकी आरक्षण क्रमांक ३८ मधील उपरोक्त दोन खातेदारांनीच फक्त जमीन विक्रीचा प्रस्ताव दिलेला आहे.

आरक्षण क्रमांक ३८ मधील जमीन जागा संस्थानने विकत घ्यावयाची किंवा भूसंपादनाने घ्यावयाची ठरल्यास भूसंपादन मंडळ शिर्डी नगरपंचायत, शिर्डी ऐवजी श्री साईबाबा संस्थान

विश्वस्तव्यवस्था, शिर्डी असे होणेसाठी नगरपंचायतीने ठराव करुन शासनाकडे असा बदल होणेबाबत प्रस्ताव पाठविणे आवश्यक राहिल.

उपरोक्त दोन अर्जदारांनी त्यांचे दिनांक ३१ मार्च, २००७ चे अर्जामध्ये जमिनीचा दर ८० लाख रुपये प्रति एकर अशी मागणी केलेली आहे. तसेच त्यामध्ये असलेली जुनी चिकूची झाडे यांचा देखील मोबदला मागितलेला आहे. सदर खरेदी १५ दिवसांचे आत करावी अशी देखील अट घातलेली आहे.

**(अ)** सदर सर्व्हे नंबर १२४ मध्ये एकंदर ४ आरक्षण असल्यामुळे सदर आरक्षणाबाबत मा.सहाय्यक संचालक, नगर रचना, अहमदनगर यांचेकडे पार्ट प्लॅनच्या नकला मागविणे आवश्यक राहिल. जेणे करुन आरक्षण क्रमांक ३७ व ३८ ची हद्द निश्चित करता येईल व जमीन खरेदी करावयाची ठरल्यास त्याप्रमाणे खरेदीखत करता येईल.

**(ब)** अर्जदार यांनी रक्कम रुपये ८० लाख प्रति एकरची केलेली मागणी उचित नाही. सन २००७ चे रेडिरेकनरमध्ये प्रस्तुत जमिनीचे दर झोन क्रमांक १/२१ मध्ये दर्शविलेले असून, हा दर प्रति चौरस मीटर १४००/- मात्र दर्शविलेला आहे. या दराने सरळ पध्दतीने दर एकरी रुपये ५६,००,०००/- मात्र असा दर येत आहे.

आरक्षण क्रमांक ३९ मध्ये उपरोक्त खरेदी करावयाच्या सर्व्हे नंबर १२४ चा काही क्षेत्र भूसंपादनात येत आहे. सन २००७ च्या रेडिरेकनर मध्ये सर्व्हे नंबर १२४ चा दर प्रति चौरस मीटर १४००/- मात्र दर्शविलेला आहे. या दराप्रमाणे प्रति आरला दर रुपये १,४०,०००/- मात्र येत असून दर एकरी रुपये ५६,००,०००/- मात्र असा येत आहे.

आरक्षण क्रमांक ३९ मध्ये सर्व्हे नंबर १२६ हा ही येत असून, त्याचा दर झोन क्रमांक १/१६ मध्ये रुपये १८००/- प्रति चौरस मीटर दर्शविलेला असून, प्रति आरला रुपये १,८०,०००/- मात्र असून, दर एकरी रुपये ७२,००,०००/- मात्र येत आहे. तसेच सर्व्हे नंबर १२५ याचा ही काही भाग आरक्षण क्रमांक ३९ मध्ये असून त्याचा दर झोन क्रमांक १/२० मध्ये रुपये १३००/- मात्र प्रति चौरस मीटर दर्शविलेला असून, त्याचा प्रति आर दर रुपये १,३०,०००/- मात्र असून, दर एकरी रुपये ५२,००,०००/- मात्र येत आहे.

**(क)** अर्जदार यांनी प्रस्तुत जमिनीत असलेल्या जुन्या झाडांची मोबदल्याची रक्कम मागितलेली आहे, हे उचित नाही. खरेदी खत करीत असतांना त्यात असलेल्या तद्ंगभूत वस्तूसह खरेदीखत होते. त्यामध्ये प्रत्येक बाबींची वेगवेगळी किंमत केली जात नाही.

**(ड)** सदर जमिनीवर असलेल्या विविध वित्तीय संस्थांचे कर्जाबाबत माहिती घेण्यात येत आहे.

**(इ)** सदरच्या जमिनी ज्या कारणाकरीता आरक्षित आहे त्याच कारणाकरीता संस्थानने त्याचा वापर करणे बंधनकारक राहिल.

**(ई)** उपरोक्त खातेदाराने नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांना दिलेले पत्र क्रमांक नपं/बांध/कावि/११/१०९/२००७, दिनांक १९ मे, २००७ रोजीचे पत्र इकडील कार्यालयाकडे सादर केलेले आहे. त्यात श्री.देवराम हनुमंता शेळके यांचे सर्व्हे नंबर १२४/१३ पैकीचे रेखांकन मंजूर केलेले आहे. तसेच या भूखंडाचे दक्षिण बाजूने पुर्व-पश्चिम ०९ मीटर रुंदीचा व उत्तर बाजूने ०६ मीटर रुंदीचा रस्ता पश्चिमेकडील लगतचे सर्व्हे नंबर १२४ पैकीचे जमिनीपर्यन्त दर्शविलेला आहे. सदरचा रस्ता शिर्डी नगरपंचायतीच्या ताब्यात आल्यावर व त्यांनी विकसित केला तर सदर रस्त्याचा संस्थानला भविष्यात वापर करता येईल.

उपरोक्त प्रश्नाधिन जमीन खरेदीबाबत खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती.

आरक्षण क्रमांक ३८ यांचे भूसंपादन मंडळ म्हणून शिर्डी नगरपंचायत, शिर्डी ऐवजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी होणेबाबत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना विनंती करणे व शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी असा प्रस्ताव शासनाकडे पाठविणेबाबत पाठपुरावा करणे.

आरक्षण क्रमांक ३८ यांचे भूसंपादन मंडळ म्हणून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अशी शासनाने मंजुरी देण्यापूर्वी प्रस्तुत जमिनी संस्थानने खरेदी घेणेस शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांची हरकत नसल्याबाबत ना हरकत दाखला देणेकामी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना विनंती पत्र देणे.

प्रश्नाधिन जमीन खरेदी करण्यापूर्वी संस्थान वकीलांमार्फत सर्च रिपोर्ट घेणे व इतर कायदेशीर बाबी पूर्ण करणेबाबत.

जमीन खरेदी करणेबाबत निर्णय झाल्यास, याबाबत आवश्यक त्या सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करुन जमीन खरेदी करणेसाठी येणारा आवश्यक व योग्य तो सर्वसमावेशक खर्च श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत करणेस मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव आजचे सभेपुढे विचारार्थ सादर करण्यात आला होता.

या प्रस्तावावर साधक-बाधक चर्चा होऊन, खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला :

०१. मौजे शिर्डी येथील आरक्षण क्रमांक ३७ : प्राथमिक शाळा व क्रिडांगण व आरक्षण क्रमांक ३८ : क्रिडांगण या कारणासाठी आरक्षित आहेत. मात्र याचे भूसंपादन मंडळ शिर्डी नगरपंचायत, शिर्डी असे आहे. सदरील आरक्षणाचे भूसंपादन मंडळ (विकसन संस्था) म्हणून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी असा बदल होणेबाबत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडेस प्रस्ताव पाठविण्यात यावा व शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव शासनाकडे पाठविणेकामी पाठपुरावा करण्यात यावा. सदरील आरक्षणे ही प्राथमिक शाळा व क्रिडांगणासाठी आरक्षित आहेत. संस्थानचे शैक्षणिक संकुलासाठभ सध्या जागेची अत्यंत आवश्यकता आहे. सदरची जागा शिर्डी शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असून, बस स्थानकाजवळ आहे. त्यामूळे विद्यार्थ्यांबरोबर स्थानिक रहिवाशांकरीता या ठिकाणी संस्थानचे शैक्षणिक संकुल (प्राथमिक/माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालय इ.) होणे उचित राहील.

०२. आरक्षण क्रमांक ३८ मधील उपरोक्त दोन खातेदार श्री.संजय रामराव शेळके व श्री. विलास रंगनाथ शेळके यांच्या सर्व्हे नंबर १२४ पैकी मधील जमिनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीने खरेदी करण्यास शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांची हरकत नसल्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणेकामी नगरपंचायतीस पत्र देण्यात यावे.

०३. शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून असे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर संस्थान वकीलांमार्फत उपरोक्त श्री. शेळके यांच्या सर्व्हे नंबर १२४ पैकी मधील जमिनीचे सर्च रिपोर्ट व इतर कायदेशीर बाबी पूर्ण करण्यास मान्यता देण्यात आली.

०४. तसेच, आजचे सभेपुढे जमीनमालक श्री. संजय रामराव शेळके व श्री. विलास रंगनाथ शेळके हे उपस्थित होते. त्यांचेशी जमिनीचे किंमतीबाबत सविस्तर चर्चा करण्यात येऊन रुपये ७०,००,०००/- (अक्षरी रुपये सत्तर लाख मात्र) प्रति एकर, म्हणजेच रुपये १,७५,०००/- (अक्षरी रुपये एक लाख पंच्याहत्तर हजार मात्र) प्रति दर या दराने खरेदी करण्यात यावी. याबाबत आवश्यक त्या सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करुन जमीन खरेदी करणेसाठी येणारा आवश्यक व योग्य तो सर्वसमावेशक खर्च श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत करणेस मान्यता देणेत येत आहे. तथापि, खरेदीखताचे वेळेस जमिनीची पूर्ण रक्कम आदा न करता, खरेदीखत झालेनंतर सरकारी मोजणी होऊन उपरोक्त जमिनीचे ७/१२ चे उताऱ्यानुसार, हद्दी कायम होऊन संपूर्ण जमिनीचे क्षेत्र ताब्यात मिळेपर्यन्त १० (दहा) टक्के रक्कम श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीकडे राखून ठेवण्यात यावी.आरक्षण क्र.३७ व ३८ संस्थानचे माध्यमातून विकसीत करण्यात यावीत. सदर आरक्षणामधील इतर जमिन मालक रुपये १,७५,०००/- प्रति आर या दराने जमीन देण्यास तयार असल्यांस त्यांची जमीन खरेदी करण्यात यावी. अन्यथा भूसंपादनाचे माध्यमातून वरील आरक्षणामधील जमीन संपादित करण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ४८** **श्रीक्षेत्र शिर्डी ते श्रीक्षेत्र पंढरपुर साईबाबा दिंडी सोहळयास अन्नदानाची मदत मिळणेबाबत श्रीसाईबाबा पालखी सोहळा समिती यांचे पत्राबाबत..**

**निर्णय क्र.५०३** श्रीसाईबाबा पालखी सोहळा समिती शिर्डी यांनी त्यांचे दिनांक२९.६.२००७ चे पत्रान्वये दि.११.७.२००७ ते दि.२७.७.२००७ दरम्यान शिर्डी येथून पंढरपूर आषाढी वारीसाठी श्रीसाईंची दिंडी निघणार आहे. दिंडी सोहळ्यामध्ये अंदाजे आठशे ते एक हजार साईभक्त सहभागी होणार आहेत. त्यांची जेवणाची व्यवस्था होणेसाठी संस्थानतर्फे खालीलप्रमाणे शिधा मिळावा अशी केली असून, त्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| अ.नं. | मालाचे नाव | मागणी |
|---|---|---|
| ०१. | रवा | १५ क्विंटल |
| ०२. | साखर | १३ क्विंटल |
| ०३ | तांदूळ | १५ क्विंटल |
| ०४. | शेंगदाणे | ३ क्विंटल |
| ०५. | मूग डाळ | १.५ क्विंटल |
| ०६. | तूर डाळ | १ क्विंटल |
| ०७. | मठ | ५ क्विंटल |
| ०८. | गोडे तेल | ३४ डबे |
| ०९. | गहू आटा | १५ क्विंटल |
| १०. | हिरा बेसन | २ क्विंटल |
| ११. | साबुदाणा | ५ क्विंटल |
| १२. | गावरान तूप | २ डबे |
| १३. | वनस्पती तूप | ३४ डबे |

यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.११.७.२००७ ते दि.२७.७.२००७ दरम्यान आषाढी एकादशी निमित्त श्रीक्षेत्र शिर्डी ते श्रीक्षेत्र पंढरपुर येथे जाणाऱ्या दिंडी सोहळयासाठी खालीलप्रमाणे शिधा देण्यात यावा, तसेच त्याअनुषंगिक पिण्याचे पाण्यासाठी टँकर, निवासव्यवस्था इत्यादी खर्चास मान्यता देण्यात यावी असें ठरलें.

| अ.नं. | मालाचे नाव | मागणी |
|---|---|---|
| ०१. | रवा | १० क्विंटल |
| ०२. | साखर | १० क्विंटल |
| ०३ | तांदूळ | १० क्विंटल |
| ०४. | शेंगदाणे | ३ क्विंटल |
| ०५. | मूग डाळ | १.५ क्विंटल |
| ०६. | तूर डाळ | १ क्विंटल |
| ०७. | मठ | २ क्विंटल |
| ०८. | गोडे तेल | १७ डबे |
| ०९. | गहू | १५ क्विंटल |
| १०. | हिरा बेसन | २ क्विंटल |
| ११. | साबुदाणा | ५ क्विंटल |
| १२. | भगर | २ क्विंटल |
| १३. | वनस्पती तूप | १७ डबे |

आजचे सभेते पालखी समितीचे सदस्यं उपस्थित होते, त्यांना सभेने श्रीक्षेत्र शिर्डी ते श्रीक्षेत्र पंढरपुर या आषाढी एकादशी निमित्त जाणारी दिंडी ही श्रीसाईबाबा संस्थानची आहे असे समजण्यात येऊ नये. याऐवजी शिर्डी ग्रामस्थांचे वतीने श्रीक्षेत्र शिर्डी ते श्रीक्षेत्र पंढरपुर पालखी असा उल्लेख करण्यात यावा, असे सांगितले. (कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ४९ सन २००७-२००८ करीता सोना मसुरी तांदुळ खरेदी बाबत.**

**निर्णय क्र. ५०४** सन २००७-२००८ मध्ये प्रसादालय व कँटीन विभागासाठी आवश्यक किराणा माल वार्षिक दराने खरेदीकामी व्यवस्थापन समितीचे दिनांक ३०.४.२००७ चे सभेत निर्णय होऊन, निविदाधारकांशी चर्चा /वाटाघाटीअंती दिलेले निम्नतम दर स्विकारणेत यावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार मे.जयहिंद किराणा स्टोअर्स,नाशिक रोड यांचा दर न्युनतम येत होता. मात्र मे.हिरालानल चुनीलाला भराडीया कंपनी, नांदेड यांनीही त्यांचेकडील नमून्याचा तांदूळ न्युनतम दराने देऊ केल्याने दोन्ही पुरवठाधारकांकडून प्रायोगिक तत्वावर दोन गाड्या तांदुळ घेऊन प्रसादालयात वापरणेत यावा. सदरील तांदूळ वापरल्यानंतर योग्य वाटल्यास दोन्ही पुरवठाधारकांकडून प्रत्येकी ५०% तांदूळ खरेदी करावा अन्यथा मा.सदस्यांनी नांदेड तसेच हैद्राबाद येथे जाऊन टेंडरधारकांकडील तांदूळाची समक्ष पहाणी करुन तांदूळ खरेदी करावा व पुरवठा आदेशाची कार्योत्तर मान्यता पूढील सभेपूढे घेण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ५० निवासस्थानकरीता बेडशीट व उशीकव्हर खरेदी.. कार्योत्तर मान्यता.**

**निर्णय क्र.५०५**मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१४.१०.२००६ मधील निर्णय क्र.८२२ नुसार श्री साईबाबा भक्तनिवासस्थान कडील खोल्यांकरीता प्रिंटेड बेडशीट (54”x90”) व उशीकव्हर (18”x24”) प्रत्येकी ८००० नग खरेदी करणेस व त्याकामी येणारी रक्कम रु.१५,२०,०००/-पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

बेडशीट खरेदीकामी मागविणेत आलेल्या निविदा मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०६.०१.२००७ मध्ये उघडणेत येऊन संबंधितांना सुट दर पत्र देण्यास सांगणेत आलेले होते. निर्णयाअंती बॉम्बे डाईंग व प्रकाश कॉटन या दोन कंपनीचे बेडशीट घेणेबाबतचा निर्णय झालेला होता मात्र प्राप्त ११ पैकी ४ कोटेशनधारकांनीच प्रकाश कॉटन व बॉम्बे डाईंग दर दिलेले असल्याने मा.व्यवस्थापन समिती सभा दि.३१.०३.२००७ निर्णय क्र.२४८ नुसार बेडशीट कोटेशनसाठी फेरनिविदा मागविण्यात याव्यात असे ठरले. त्यास अनुसरुन मागविणेत आलेल्या निविदा मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२०.०५.२००७ मध्ये उघडणेत येऊन संबंधितांना चर्चेसाठी आमंत्रित करणेत येऊन सुट दर देणेबाबत सांगणेत आले होते. निर्णयाअंती मा.विश्वस्त श्री अभंग साहेब व श्री वाबळे साहेब यांनी मुंबई येथे कंपनीत समक्ष जाऊन नमुने निवडावे असे ठरले.

मा.विश्वस्तांसमवेत अधिक्षक खरेदी यांनी दि.२१.०५.२००७ रोजी बॉम्बे डाईंग या कंपनीस भेट दिलेली असून बॉम्बे डाईंग-गोल्डलाईनच्या बेडशीटचे काही नमुने पाहीलेले आहे. निवडणेत आलेल्या नमुन्यापैकी गोल्डलाईन बेडशीटसाठी त्यांना दरांचा फॅक्स पाठविणेस सांगणेत आलेले होते. त्यानुसार कंपनीचे बारगेन बेसमेंट या रिटेल शॉपने दि.२३.०५.२००७ रोजी दराचे फॅक्स पत्र पाठविलेले आहे. त्यांचे फॅक्सपत्रानुसार एका गोल्डलाईन बेडशीटची किंमत रु.३८२/-प्रती सेट आलेली असून सर्व पेमेंट आगाऊ तसेच डिलेव्हरी मुंबई येथून घेणेबाबत नमुद केलेले आहे. मात्र सदरील किंमत ही मागविणेत आलेल्या कोटेशनमधील दरांपेक्षा फारच जास्त आल्याने बेडशीटसाठी प्राप्त निविदामधून बॉम्बेडाईंग गोल्डलाईन बेडशीटसाठी ज्या निविदाधारकांचा दर न्युनतम आलेला आहे त्यांचेकडून बेडशीट खरेदी करावे असे मा.विश्वस्तांनी सांगितलेले आहे. त्यानुसार येणाऱ्या सुट दरांचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | कोटेशनधारकाचे नाव व गांव | कंपनी | मुळ दर प्रती सेट | वाटाघाटीनंतरचे दर |
|---|---|---|---|---|
| ०१ | मालपाणी टेक्सटाईल्स, नाशिक | अ.नं.९ | २१७.०० | २०५.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | अ.नं.११ सुपरफाईन | ३८०.०० | ३६०.०० |
| ०२ | सोनु एजन्सीज, नाशिक | नं.१ | ३५४.०० | ३३६.३० |
| | | नं.२ | ५९९.०० | ५६९.०५ |
| | | एक्सपोर्ट | ३५०.०० | ३३२.५० |
| ०३ | सारडा इंटेरीअर, अहमदनगर | गोल्डलाईन | २४३.८४ | २१७.०० |
| | | गोल्डलाईन एक्सपोर्ट | २९२.१० | २५९.९७ |
| ०४ | एम.बी. ट्रेडींग कंपनी, नाशिक | फ्लोरा | २८०.०० | २७४.४० |
| | | गोल्डलाईन | २८५.०० | २७९.३० |
| | | ब्लॉसम | ३३०.०० | ३२३.४० |
| ०५ | पी.पी.कापोरेशन,विंचुर ता.निफाड | गोल्डलाईन | २८६.०० | २८६.०० |
| ०६ | शिंगी ट्रेडींग कंपनी, अहमदनगर | गोल्डलाईन | २७२.०० | २१७.०० |
| ०७ | कृष्णा कलेक्शन्स, श्रीरामपूर | गोल्डलाईन | १४२.०० | २७२.०० |
| ०८ | ओम गुरुदेव एजन्सी, सावळविहीर | फ्लोरा | २६१.२० | २५५.९७ |
| | | गोल्डलाईन | ३१९.८० | ३१३.४० |
| | | बिकल | ४०१.०० | ३९२.९८ |
| | | ब्लॉसम | २७१.०० | २६५.५८ |
| | | अल्ट्राकेअर | ४२०.०० | ४११.६० |
| | | रिबल | ३५५.०० | ३४७.९० |
| | | ब्ल्यु.व्हाईट | २४५.०० | २४०.१० |
| | | न्यु.बॉ.डाईंग | २३४.०० | २२९.३२ |

**बॉम्बे डाईंग- गोल्डलाईन**

| अ.नं | कोटेशनधारकाचे नाव व गांव | कंपनी | मुळ दर प्रती सेट | वाटाघाटीनंतरचे दर |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| ०१ | सारडा इंटेरीअर, अहमदनगर | गोल्डलाईन | २४३.८४ | **२१७.००** |
| | | गोल्डलाईन एक्सपोर्ट | २९२.१० | २५९.९७ |
| ०२ | एम.बी. ट्रेडींग कंपनी, नाशिक | गोल्डलाईन | २८५ | २७९.३० |
| ०३ | पी.पी.कापोरेशन,विंचुर ता.निफाड | गोल्डलाईन | २८६ | २८६.०० |
| ०४ | शिंगी ट्रेडींग कंपनी, अहमदनगर | गोल्डलाईन | २७२.०० | **२१७.००** |
| ०५ | कृष्णा कलेक्शन्स, श्रीरामपूर | गोल्डलाईन | १४२.०० | २७२.०० |
| ०६ | ओम गुरुदेव एजन्सी, सावळविहीर | गोल्डलाईन | ३१९.८० | ३१३.४० |

वरील दरांनुसार मे.सारडा इंटेरीअर, अहमदनगर व मे.शिंगी ट्रेडींग कंपनी, अहमदनगर यांचे रु.२१७.०० पैसे प्रती बेडशीट सेटसाठी न्युनतम दर येतात. न्युनतम दराने ८००० सेट बेडशीट खरेदीस रु.१७,३६,०००/- खर्च येईल. मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयानुसार रु.१५,२०,०००/-पर्यंतचे खर्चास मान्यता असल्याने ७००० सेट बेडशीट खरेदी करता येईल. त्याकरीता १५,१९,०००/-खर्च येईल. तसेच दोन्ही पुरवठाधारक मे.बॉम्बे डाईंग मॅन्युफॅक्चरींग कंपनी लिमीटेड, मुंबई यांचे स्टॉकीस्ट असल्याने दोन्ही पुरवठाधारकांना विभागून पुरवठा आदेश देणेत आलेला आहे.

तरी मा.विश्वस्तांचे अभिप्रायानुसार बॉम्बे डाईंग-गोल्डलाईन बेडशीट व उशीकव्हर प्राप्त झालेल्या निविदामधील न्युनतम दराने खरेदीस देणेत आलेल्या आदेशास व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ५१** **श्री साईबाबा कन्या विद्या मंदिरातील मुलींसाठी स्कुल बस सुरु करणे बाबत.**

**निर्णय क्र. ५०६** संस्थान संचलित श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, शिर्डी या शाळेतील इ.५वी ते १० या वर्गात ५०० विद्यार्थीनी शिकत आहे. यापैकी २६० विद्यार्थीनी इ.५वी ते ७ वी या वर्गात शिकत आहेत. या सर्वच विद्यार्थीनी सध्या पायी अथवा सायकलने शाळेत येतात. नगर-मनमाड रोडवर खूप मोठया प्रमाणात वाहतूक असल्याने या रस्त्यावर सतत छोटे मोठे अपघात होत असतात. यापैकी इ.५वी ते ७ वी या लहान वर्गातील लहान मुलींना रस्त्याने पायी अथवा सायकलवर जाणे-येणे दिवसेंदिवस त्रासदायक, धोक्याचे व थकवणारे ठरत आहे.

संस्थानच्याच श्री साईबाबा इंग्लिश मिडीअम स्कूल, शिर्डी या शाळेतील इ.१०वी पर्यंतची मोठी मुले मात्र स्कूल बसने शाळेत येतात. कन्या शाळेतील मुलींना मात्र स्कूलबस सुविधा उपलब्ध नाही. केवळ मराठी माध्यमाच्या शाळेत शिकणाऱ्या मुली असल्याने स्कूलबस सुविधेच्या बाबतीत भेदभाव होत आहे, असे काही पालकांनी मा.कार्यकारी अधिकारी यांचे निदर्शनास आणून दिले आहे. ही स्कूलबस सुविधेच्या बाबतीतील भेदभाव करणारी बाब, दूर करावी असे पालकांकडून सुचविण्यात आले आहे. इंग्लिश मिडीअम स्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी स्कूलबस सुविधेकरीता आकारल्या जाणाऱ्या शुल्काइतके शुल्क भरण्यास, कन्या शाळेतील संबंधित विद्यार्थीनींचे पालक तयार आहेत, असे पालकांकडून सांगण्यात आले.

पालकांची मागणी लक्षात घेऊन खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

०१. सध्या इ.५वी ते ७ वी या वर्गात शिकणाऱ्या लहान वयोगटातील विद्यार्थीनींनाच स्कूलबस सुविधा उपलब्ध करुन देता येईल.

०२. याकरीता एका स्कूलबसची आवश्यकता आहे, यासाठी एक स्कूलबस खरेदी करावी लागेल. सदरची स्कूलबस उपलब्ध होईपर्यंत सध्या वाहन विभागाकडे उपलब्ध असलेल्या बसमधून फक्त शिर्डी नगरपंचायत हद्दीतील विद्यार्थीनींसाठी प्रायोगिक तत्वावर एक स्कूलबस सुरु करता येईल.

०३. ज्यांना स्कूलबस सुविधा हवी आहे अशा विद्यार्थीनींकडून श्री साईबाबा इंग्लिश मिडीअम स्कूलच्या दराने स्कूलबस फी आकारता येईल.

वरीलप्रमाणे, कन्या शाळेतील इ.५वी ते ७ वी या लहान वर्गातील विद्यार्थीनींना, स्कूलबस सुविधा सुरु करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख/प्राचार्या, कन्या विद्या मंदिर)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ५२** **साई सिक्युरिटी प्रिंटर्स् प्रा.लि., बँगलोर यांचेकडून देणगी दाखल झालेली पुस्तके/फोटो विक्री करणेबाबत.**

**निर्णय क्र.५०७** साई सिक्युरिटी प्रिंटर्स् प्रा.लि., बँगलोर यांनी त्यांचे दि.२३.०४.२००७ व दि.२७.०४.२००७ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे पुस्तके/फोटो संस्थानकडे जमा केली आहेत.

०१. बाबांची सहस्त्रनामावली आणि अष्टोत्तरम - इंग्रजी भाषेतील ८,०८० नग
०२. दगडावर बसलेले बाबा कृष्णधवल साईज- ए४ (८.२५" X ११.५०") १०,००० नग
०३. बाबा चेहरा फोटो कृष्णधवल साईज - ए४ (७.५०" X १०") ५,००० नग

उपरोक्तप्रमाणे पुस्तके व फोटो संस्थानद्वारा विक्री करण्यात यावी व त्यातून मिळणारी रक्कम संस्थान खाते देणगी स्वरुपात जमा करण्यात यावी असे वरील दि.२३.०४.२००७ चे पत्रात नमुद केले आहे.

०१. बाबांची सहस्त्रनामावली आणि अष्टोत्तरम - इंग्रजी भाषेतील ८,०८० नग जमा असून पत्रात प्रती नग विक्रीचा दर नमुद केलेला नाही मात्र प्रती पुस्तक छपाई दर रु.२०/- मात्र खर्च आलेला आहे. संस्थानद्वारा काऊंटरवर प्रती नग रु.२५/- प्रमाणे विक्री केल्यास रुपये २,०२०००/- मात्र जमा होईल.
०२. दगडावर बसलेले बाबा कृष्णधवल साईज- ए४ (८.२५" X ११.५०") १०,००० नग व
०३. बाबा चेहरा फोटो कृष्णधवल साईज- ए४ (७.५०" X १०") ५,००० नग असे एकूण १५,००० नग फोटो जमा असून, पत्रात प्रती नग विक्रीचा दर व छपाई दर नमुद केलेला नाही मात्र बिल नं.३२

दि.२५.०४.२००७ अन्वये १५,००० नग फोटो छपाईसाठी रु.३०,०००/- मात्र इतका खर्च आलेला म्हणजेच प्रती नग दर रुपये २/- मात्र खर्च आलेला आहे. सध्या संस्थान विक्री काऊंटरवर ०१. दगडावर बसलेले बाबा रंगीत साईज ७" X १०" प्रती नग रु.१/- व २) साईबाबा चेहरा रंगीत फोटो साईज ४" X ६" प्रती नग विक्री दर रु ०.५० पैसे प्रमाणे विक्री केली जात आहे. त्यामुळे वरील प्रेसकडून जमा झालेली फोटोंची साईज व तपशिल विचारात घेता प्रती नग दर रु.१/- या प्रमाणे विक्री करता येईल. त्यातून रुपये १५,०००/- जमा होईल.

वरील पुस्तके/फोटो संस्थान काऊंटरवर विक्री केल्यास एकूण रुपये २,१७,०००/- मात्र रक्कम संस्थान खाते देणगी स्वरुपात जमा करुन घेता येईल व देणगी पावती पाठविण्यात येईल.

तरी साई सिक्युरिटी प्रिंटर्स् प्रा.लि., बँगलोर यांचेकडून उपरोक्तप्रमाणे देणगी म्हणून प्राप्त झालेली पुस्तक वरील अ.नं. १ प्रमाणे बाबांची सहस्त्रनामावली आणि अष्टोत्तरम - इंग्रजी भाषेतील प्रती नग रु.२५/- प्रमाणे तसेच फोटो वरील अ.नं.२ व ३ नुसार जमा झालेले प्रती नग रु.१/- प्रमाणे संस्थान प्रकाशने विभाग - पुस्तके/फोटो विक्री काऊंटरवर विक्रीस ठेवणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, अ.नं. १ प्रमाणे पुस्तके प्रति नग रुपये २५/- व अ.नं. ०२ व ०३ चे फोटो प्रति नग रुपये २/- प्रमाणे विक्री करण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.५३** **मौजे पांढुर्ली ता.सिन्नर येथे पालखी थांबा उभारणे कामाचे ठेकेदार मे. एन.एस. बनकर पाटील ॲन्ड कं यांचे दरवाढ मागणीबाबत...**

**निर्णय क्र.५०८** मौजे पांढुर्ली ता.सिन्नर येथील सौ.सिंधुबाई विजय दळवी यांनी मौजे पांढुर्ली येथील गट नं १९ मधील ०० हेक्टर ४९ आर जमीन संस्थानला दि.३१/०८/२००६ रोजीच्या बक्षीस पत्राने दिलेली आहे. आर्किटेक्ट निकम पाटील असोसिएटस, श्रीरामपूर यांचेकडून सदरच्या कामासाठी बांधकाम आराखडा व तपशीलवार अंदाजपत्रक घेण्यात आले. मौजे पांढुर्ली येथील जागा ताब्यात घेण्यासाठी तालुका निरिक्षक, भुमी अभिलेख (सिन्नर) यांचेमार्फत मोजणी करण्याचे काम चालू होते दरम्यान सरदरचे काम करणेसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामासाठी प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समीतीच्या दि.०६/०१/२००७ रोजीच्या सभेत उघडून उपस्थित निविदा सादरकर्त्यांशी चर्चा व वाटाघाटी करण्यात आल्या. सदरहू सभेतील निर्णय क्र.०६ अन्वये मे.एन.एस.बनकर पाटील, श्रीरामपुर यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना सदरच्या कामाचा कार्यादेश देण्याचे ठरले. त्यानुसार जा.नं.६८१ दि.१२/०१/२००७ अन्वये त्यांना कार्यादेश देण्यात आला आहे. सदर कामाचा तपशिल खालिलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | कामाचे नावं | साईभक्तांसाठी मौजे पांढुर्ली ता.सिन्नर येथे पालखी थांबा उभारणे. |
| ०२ | आर्किटेक्ट | मे.निकम पाटील असो., श्रीरामपुर |
| ०३ | ठेकेदाराचे नांव | मे. एन.एस. बनकर पाटील ॲन्ड कं, श्रीरामपूर |
| ०४ | अंदाजपत्रकीय रक्कम | रु. ३९,२१,२२१/- |
| ०५ | निविदा टक्केवारी | ३% अधिक |
| ०६ | मंजूर निविदा रक्कम | रु. ४०,३८,८५८/- |
| ०७ | कार्यादेश क्रमांक | जा.नं.६८१, दि.१२.०१.२००७ |
| ०८ | निविदेनुसार काम पुर्ण करण्याची मुदत | सहा महिने. |
| ०९ | कामाची सद्यस्थिती | प्रस्तुतची जागा दि.११/०६/२००७ रोजी मोजणी नंतर ताब्यात मिळाली असून अद्याप कामास सुरवात झालेली नाही. |

मौजे पांढुर्ली येथील सदरची जागा दि. ११/०६/२००७ रोजी मोजणी नंतर ताब्यात मिळाली. त्यानंतर इकडील दि. २०/०६/०७ रोजीचे पत्रान्वये ठेकेदार बनकर पा. यांना पालखी थांब्याचे काम सुरू करण्यासाठी कळविण्यात आले. परंतू ठेकेदार यांनी त्यांचे दि.२०/०६/२००७ रोजीचे पत्रान्वये विटा, खडी, वाळु या मटेरीयल बरोबरच सिमेंटचे भावात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने सदर कामाचे दर १५% वाढवुन मिळावे अशी विनंती केली आहे.

सदरच्या कामाचे आर्किटेक्ट मे.निकम पाटील असो., श्रीरामपुर यांनी दि.२७/०६/२००७ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, सिमेंट व इतर बांधकाम मटेरीयल मध्ये भाववाढ झाली आहे. परंतु सदर कामाच्या निविदेत भाववाढ देणेबाबत कुठल्याही तरतुदीचा समावेश करण्यात आलेला नाही. त्यामुळे सदरचे काम पूर्ण करण्यासाठी फेर निविदा मागविता येतील किंवा ठेकेदार यांना निविदा रकमेच्या १५% अधिक दराने काम देणेबाबत संस्थानने आपले स्तरावर निर्णय घ्यावा.

ठेकेदार यांनी वरीलप्रमाणे केलेल्या विनंतीबाबत निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त पालखी थांब्याची जागा ठेकेदार यांना कार्यादेश दिल्यानंतर सुमारे पाच महीन्यांनी ताब्यात मिळालेली आहे. सदर कामासाठी निविदेच्या अंदाजपत्रकिय दरामध्ये गृहित धरण्यात आलेली सिमेंट, स्टिल व स्ट्रक्चरल स्टिलचे बेसिक रेटमध्ये दरम्यानच्या काळात मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. आता सदर कामासाठी फेरनिविदा मागविणे खर्चाचे व कालापव्यय करणारे ठरेल. तथापी ठेकेदार यांचे मागणीप्रमाणे सरसकट भाववाढ देण्यात येऊ नये. त्याऐवजी सदर कामाचे अंदाजपत्रक बनविण्यासाठी सिमेंट, स्टील व स्ट्रक्चरल स्टीलसाठी गृहित धरण्यात आलेले बेसिक रेट व ठेकेदार यांनी काम करतेवेळी वापरलेल्या प्रस्तुत सामग्रीचे खरेदीचे दर यामधला फरक ठेकेदार यांना अदा करण्यात यावा, असे ठरले. त्यासाठी येणारे योग्य त्या वाढीव खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५४** **सिन्नर (मुसळगांव) औद्योगिक वसाहत येथील संस्थानचे पालखी थांबा बांधकामाचे ठेकेदार मे.साहेबराव कोकाटे ॲण्ड असो. यांचे भाववाढ व मुदतवाढ मागणीबाबत.**

**निर्णय क्र.५०९** साईभक्तांसाठी उपरोक्त विषयांकित पालखी थांबा वास्तुचे बांधकाम करण्याचे काम ठेकेदार मे.साहेबराव कोकाटे ॲण्ड असो. यांचेमार्फत करण्यात येत आहे. सदरच्या कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | कामाचे नावं | साईभक्तांसाठी सिन्नर तालुका औद्योगिक सहकारी वसाहत सिन्नर यांचेकडून भाडे तत्वाने घेतलेल्या जागेत पालखी थांबा वास्तुचे बांधकाम करणे . |
| ०२ | आर्किटेक्ट | मे.निकम पाटील असो., श्रीरामपुर |
| ०३ | ठेकेदाराचे नांव | मे.साहेबराव कोकाटे ॲण्ड असो., नाशिक |
| ०४ | अंदाजपत्रकीय रक्कम | रु. ३९,९९,८२९/- |
| ०५ | निविदा टक्केवारी | ४% कमी |
| ०६ | मंजूर निविदा रक्कम | रु. ३८,३९,८३६/- |
| ०७ | कार्यादेश क्रमांक | जा.नं.वशी-बांधकाम-१४७७८ दि.२३.१०.२००६ |
| ०८ | काम सुरु केल्याची दिनांक | दि.१७.११.२००६ |
| ०९ | निविदेनुसार काम पुर्ण करण्याची मुदत | सहा महिने (दि.१६.०५.२००७ पर्यंत) |
| १० | आतापर्यंत झालेल्या कामाची रक्कम | रु.४,६४,६५१/- |
| ११ | दोष दायित्व कालावधी | -- |
| १२ | कामाची सद्यस्थिती | १. मुख्य शेडचे काम प्लिंथलेव्हल पर्यंत पूर्ण<br>२. कंम्पाउंड वॉलचे काम ७०% पूर्ण<br>३. किचन शेड व टॉयलेट ब्लॉकचे काम सुरु केलेले नाही.<br>४. मुख्य शेडचे स्ट्रक्चरल स्टिलचे काम सुरु केलेले नाही. |

ठेकेदार मे. साहेबराव कोकाटे ॲण्ड असोसिएटस्. नाशिक यांनी दि. १८/०५/२००७ चे पत्राव्दारे काम पूर्ण करणेसाठी दोन महीने (दि. १६/०७/२००७ पर्यंत ) मूदतवाढ मिळणेबाबत विनंती

केली आहे. तसेच दि.११.०६.२००७ चे पत्राव्दारे सिमेंट व स्टीलची भाववाढ मिळणेबाबत विनंती केली आहे. ठेकेदार यांचे कामाचे प्रगतीचा वेग अत्यंत कमी असल्याने वेग वाढविण्यासाठी त्यांना इकडील विभागाचे १) जा.नं.१७३२९, दि.१४.१२.२००६, २) जा.नं.१४८४ दि.२९.०१.२००७, ३) जा.नं. २२६१ दि.१४.०२.२००७, ४) जा.नं.३०७१ दि.२७.०२.२००७, ५) जा.नं.४९७० दि.२७.०३.२००७ अन्वये पत्र देवून सुचना देण्यात आल्या होत्या. याव्यतिरिक्त मा.विश्वस्त श्री.अभंग सो. व श्री.सुरेश वाबळे सो. यांनी दि.१६.०३.२००७ रोजी प्रत्यक्ष कामाची पहाणी केली व ठेकेदार कोकाटे यांना कामाचा वेग वाढविणे संदर्भात सुचना केल्या. दि.०३.०४.२००७ रोजी ठेकेदार यांनी सदर कामाच्या करारनाम्यावर स्वाक्षरी करुन उर्वरित इनिशियल सिक्युरिटी डिपॉझीट भरले. अद्याप संपुर्ण कामापैकी ठेकेदार यांनी फक्त १२% काम पूर्ण केले आहे. ठेकेदार साहेबराव कोकाटे यांनी त्यांचे दिनांक १८/०५/२००७ रोजीचे पत्रान्वये विनंती केली आहे की, साईट पुर्णपणे साफ नसल्यामुळे व साईटवर मोठमोठी बांबुची व आंब्याची झाडे असल्यामुळे कामाचा वेग कमी होता. मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे समवेत ठेकेदार यांनी केलेले चर्चेमध्ये पुढील दोन महिन्यात (दि.१६.०७.२००७) काम पूर्ण करुन देतो असे सांगितले होते. त्यानुसार दोन महिन्यासाठी दि. १६/०७/२००७ पर्यंत मूदतवाढ दयावी अशी विनंती केली आहे. तसेच ठेकेदार साहेबराव कोकाटे यांनी त्यांचे दिनांक ११/०६/२००७ रोजीचे पत्रान्वये विनंती केली आहे की, सिमेंट व स्टिल यांच्या दरात भाववाढ झाल्याने निविदाशर्तीनुसार ४% कमी दरात काम करणे शक्य नसल्याने त्यांना Price Escalation व Material Advance द्यावा, अशी विनंती केली आहे.

आर्किटेक्ट मे.निकम पा.असो., श्रीरामपुर यांनी आपल्या दि१९.०६.२००७ च्या पत्रान्वये कळविले आहे की ठेकेदार यांचे मागणी नुसार त्यांना फक्त एकदाच दि. १६/०७/२००७ पर्यंत (०२ महिने) मूदतवाढ देण्यास हरकत नाही. Price Escalation व Material Advance या शर्तीचा निविदेत समावेश केलेला नाही व ठेकेदार यांनी निविदेतील या शर्तीचा अभ्यास करुन निविदा भरणे अपेक्षीत आहे. त्यामुळे निविदा शर्तीनुसार ठेकेदार यांना सदरच्या बाबी देय होत नाहीत. तरी संस्थानने आपले स्तरावर याबाबत निर्णय घ्यावा असे आर्किटेक्ट यांनी कळविले आहे.

ठेकेदार साहेबराव कोकाटे यांनी सदरच्या कामाचे पहिले रनिंग बिल दि.१८/०५/२००६ रोजी सादर केले. निविदा शर्ती नुसार आर.ए बिलाची किमान रक्कम रु. ६,५०,०००.०० इतकी असावी अशी अट आहे. तथापी काम लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने सदरच्या कामाचा वेग वाढावा यासाठी ठेकेदार यांनी दि. २६/०५/२००७ रोजीच्या पत्रान्वये केलेल्या विनंती वरुन व आर्किटेक्ट यांचे शिफारशी नुसार प्रथम रनिंग बिलापोटी रु. ४,३०,०००.०० मात्र इतकी रक्कम ॲडव्हान्स म्हणून अदा करण्यात आलेली आहे. ठेकेदार यांना दि.०९/०६/२००७ रोजी पहिले रनिंग बिलाच्या ॲडव्हान्सचा डी.डी. मिळालेपासुन साईटवरील काम पुर्ण बंद आहे.

ठेकेदार यांनी वरीलप्रमाणे केलेल्या विनंतीबाबत निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर कामासाठी निविदेच्या अंदाजपत्रकिय दरामध्ये गृहित धरण्यात आलेली सिमेंट, स्टिल व स्ट्रक्चरल स्टिलचे बेसिक रेटमध्ये ठेकेदार यांनी काम सुरू केलेपासूनचे काळात मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे ठेकेदार यांना काम पूर्ण करणे जिकीरीचे असल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर कामाचे अंदाजपत्रक बनविण्यासाठी सिमेंट, स्टील व स्ट्रक्चरल स्टीलसाठी गृहित धरण्यात आलेले बेसिक रेट व ठेकेदार यांनी काम करतेवेळी वापरलेल्या प्रस्तुत सामग्रीचे खरेदीचे दर यामधला फरक ठेकेदार यांना अदा करण्यात यावा, असे ठरले. याप्रमाणे फरकाची रक्कम ही फक्त साईटवर अद्याप अपुर्ण असलेल्या उर्वरीत कामासाठीच देण्यात यावी. तसेच ठेकेदार यांचेकडून सदरचे काम ३ महिन्यात पूर्ण करुन देणेबाबत लेखी स्वरुपात हमी घेण्यात यावी, असे ठरले.यासाठी येणाऱ्या योग्य त्या वाढीव खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ५५** **सर्व्हे नं १४८/२/१ रक्कम अदाईबाबत.**

**निर्णय क्र.५१०** **१)** संस्थानने दिनांक २९/०९/१९९८ रोजी मौजे शिरडी येथील सर्व्हे नं १४८/२ /१ एकूण क्षेत्र ०५ हेक्टर ३ आर तीन जमीन मालकांकडून खरेदी केलेल्या आहेत. त्यामध्ये श्रीमती शांताबाई ह शेळके यांचे खालील क्षेत्राचा समावेश आहे.

| **स.नं** | **क्षेत्र<br>हेक्टर आर** | **चतु : सिमा** |
|---|---|---|
| १४८/२ /१ | १ -६२<br>०-०७ पोख<br>**१ - ६९** | पूर्व - नांदुर्खी रस्ता<br>दक्षिण - १४८/१ श्रीमती साखराबाई शेळके यांची जमीन<br>पश्चिम - स.नं १४७ पैकी<br>उत्तर - स.नं १४८/ २ /२ |

सदर जमीन संस्थानने प्रति एकर १२,०००००/- बारा लाख प्रति एकर म्हणजे ३०,०००००/- तीस लाख प्रति हेक्टर म्हणजेच रुपये ३०,०००/- प्रति आर याप्रमाणे खरेदी केलेली आहे. यापमाणे एकूण जमिनीची होणारी किंमत रुपये ५०,७०,०००-०० पन्नास लाख सत्तर हजार ( १६९ आर X ३०,००० ) खरेदी खतात नमुद करुन खरेदी खताचे वेळी जमीन मालकांस रुपये ४४,७०,०००/- चेकने अदा केली आहे. उर्वरित रक्कम रुपये ६,००,०००/- सहा लाख मात्र क्षेत्राची मोजणी करून निश्चित करून दिलेनंतर द्यावयाचे ठरले आहे. जमीन विहीरीचे हक्कासह दिलेली आहे.

**२)** उपरोक्त जमिनीचे खरेदी खतामध्ये खरेदी देणार यांनी पॅरा नं ३ मध्ये " .. मी तुम्हाला ७ X १२ उताराप्रमाणे प्रत्यक्ष १ हेक्टर ६९ आर जमीन देऊ शकत नाही जमीन मोजली असता क्षेत्र सुमारे १८ /२० आर कमी भरल्याने मी तुम्हांस आज रोजी रुपये ५०,७०,०००/- या रकमेचे खरेदी खत लिहून नोंदून देत आहे. मी तुम्हास ७ X १२ उता-याप्रमाणे कमी क्षेत्र देत असल्यामुळे मी या क्षेत्राची किंमत कमी केली आहे.मी तुम्हांस कमी पडलेले १८ / २० आर अथवा जे निघेल ते क्षेत्र, प्रत्यक्ष मोजून ताब्यांत दिलेनंतर तुम्ही मला राहिलेली रक्कम रुपये ६,००,०००/- सहा लाख देणे आहे आज मला तुमचनेकडून रुपये ४४,७०,०००/- मिळाले असून ते भरणा पुढील प्रमाणे मिळाला तक्रार नाही. " असे खरेदीदाराने लिहून दिलेले आहे. त्याचप्रमाणे पॅरा नं ६ मध्ये पुढे जेव्हा श्री साईबाबा संस्थान शिर्डीस सदरचे जमीनीबाबत मोजणी किंवा इतर कारवाई करून कमी असलेले क्षेत्र संस्थानचे ताब्यात देईल त्यावेळी राहिलेल्या क्षेत्राबाबत रक्कम या दराने मिळणेस मी पात्र राहील. तसेच माझे शेजारी स.नं १४८ /१ यांची खरेदी देतांना किंवा इतर कोणतीही कारवाई करतांना माझे हक्क त्याचेवरही बंधनकारक राहतील जमीन खरेदीदाराने परत मागणेचा अधिकार नाही असेही खरेदीदाराने लिहून दिलेले आहे अशा प्रकारचे प्रस्तुतचे खरेदीखत आहे.

**३)** उपरोक्त सर्व्हे नं १४८/ २ /१ चे त्यालगतचे संदर्भात आतापावेतो खाजगी तसेच सरकारी मोजण्या खालील प्रमाणे झालेल्या आहेत.

१) दि २६/८/१९९८ श्री इनामके मोजणीदार यांचेमार्फत खाजगी मोजणी
२) दि.०६/१०/१९९८ परिक्षक भूमापनक यांचेकडून पोटहिस्सा मोजणी मो.र नं २० दि १३/०८/१९९८
३) दि २८/०४/२००० भूमापनक बिनशेती मोजणी मोरनं २२० दि ०७/०४/२०००
४) मो र.नं ४२ दि ०३/०४/२००० सदर मोजणी साखरबाई शेळके यांचे सर्व्हे नं १४८/१बाबत
५) मो र.नं ३८०/१ मोजणी तारीख दि.१९.०८.२००३ पोटखराबा मोजणी.

भूसंपादन ाचे संदर्भात झालेली आहे मोजणी तारीख २८/०४/२०००
१) श्री. जी.एल. वराळ खाजगी मोजणी दिनांक ३१/०८/२००४
२) श्री.जी.एल.वराळ खाजगी मोजणी दिनांक १५/१२/२००४

याप्रमाणे मोजण्या झालेल्या आहेत. सदर मोजणी नकाशेवरुन खालील बाबी दिसून येतात.

**१)** परिक्षक भूमापक शिर्डी यांनी दि ०६/१०/१९९८ रोजी जागेची मोजणी केली सदर मोजणी पोटहिस्सा मोजणी झालेली असून सर्व्हे नं १४८/१ व स.नं १४८/२ श्रीमती शांताबाई शेळके श्रीमती साखराबाई शेळके दोन्हीही सर्व्हे नंबरचे मूळ मालका समक्ष मोजणीसाठी मालक हजर होते. मो.र नं २० दि १३/०८:१९९८

**२)** मो.र.नं २२० दि ०७/०४/२००० ने प्रस्तुत सर्व्हे नं ची बिगरशेती मोजणी केलेली आहे सदर जमीन बिनशेती करून घेणेची आहे हेक्टर ०५-०३ आर असे मोजणी नकाशात नमूद केले आहे.

**३)** मो.र.नं ४८/१ श्रीमती साखरबाई शेळके यांचे जमीनीची भू संपादनासाठी मोजणी करून घेतली .त्यामध्ये भू संपादन होणारी जमीन रंगाने दर्शविलेली असून क्षेत्र ५ हेक्टर २ आर दर्शविलेले आहे. त्याचप्रमाणे संस्थानने प्रस्तुत क्षेत्राचे काही खाजगी मोजणी देखील करून घेतली आहे.

१) श्री. जे.एल.वराळ खाजगी सर्व्हेअर यांचे दि ३०/०८/२००४ चे मोजणी प्रमाणे संस्थानचे ताब्यात ४ हेक्टर ७६ आर क्षेत्र आहे म्हणजे २७ आर क्षेत्र ७x१२ पेक्षा कमी दर्शविलेले आहे. तसेच श्री. वराळ ंचे दि १५/१२/२००४ चे नकाशा मध्ये साखरबाई शेळके सर्व्हे नं १४८/१ यांचे भूसंपादनासाठी प्रस्तावीत क्षेत्र ५ हेक्टर २ आर जमिनीचे नकाशा दर्शविलेला आहे. याच नकाशामध्ये श्रीमती साखराबाई यांचे भू संपादीत प्रस्तावीत जमीन व संस्थान यांचे वहिवाटी जमीनीचे मध्ये पटटी दर्शविलेली आहे. तसेच लागू सर्व्हे नं १५१ मध्येही संस्थानचे काही भाग दर्शविलेला आलेला आहे. परंतु सदर मोजणी खाजगी सर्व्हेअरकडून केलेली आहे.

**४)** श्रीमती शांताबाई ह. शेळके सर्व्हे नं १४८/१ क्षेत्र हेक्टर ०३ आर यांचे वतीने श्री. सुधीर कदम यांचेकडून संस्थानने विकत घेतलेल्या जमीनीचे उर्वरित रकमेची मागणी रुपये ६ लाख होत आहे. अशी मागणी करतांना त्यांचे म्हणणे खालील प्रमाणे आहे.

**५)** मो र.नं ३८०/१ दि.१०.०५.२००१ दि.१९.०८.२००३ चे पोटहिस्सा मोजणीत ७X१२ क्षेत्राशी साधारणतः मेळ (धरसोड) हिशोबी धरलेचे दिसून येते.

१) त्यांचेवतीने जमिनीचा ताबा संस्थानला देणेत आला होता.
२) संपूर्ण ५ हेक्टर ३ आर जमिनीचे ७ X १२ वर नोंद आहे तेव्हा उर्वरित रक्कम संस्थाने राखून ठेवणेचे कारण नाही.
३) संस्थानने जमीनीस कंम्पाऊड केले आहे.
४) प्रस्तुत जमिनीचा व्यवहार अपूर्ण ठेवू नये.
५) जागा कमी भरत असेल तर संस्थानने संबंधीताकडून काढून घ्यावी.

६) यापूर्वी या विषयावर चर्चा झाली आहे रक्कम परत मिळाली नाही. रक्कम परत मिळावी त्याबाबत रजिस्टर कचेरीमध्ये जागेचा ताबा मिळाला असे संस्थानकडून लिहून मिळाले.

७) संस्थानकडून ६ लाख रक्कम परत मिळत नसेल तर रक्कम देऊ नये मात्र ७ X १२ वर संपूर्ण क्षेत्राची नोंद आहे. त्यापैकी १८ /२० किंवा कमी पडलेले क्षेत्राचा ७ X १२ त्यांचे नांवावर करून द्यावा.

उर्वरित रक्कम अदाईकरणे व क्षेत्राचे दृष्टीने संस्थान प्रयत्नशील आहे.

या संदर्भात संस्थानकडून रक्कम अदाईचे दृष्टीने वेळोवेळी खाजगी मोजण्या केलेल्या आहेत सरकारी मोजण्या केल्या आहे. तसेच श्रीमती साखरबाई शेळके यांचेकडे यांचे जमिनीचे भू संपादन चालू आहे. त्यांचेकडील क्षेत्र भू संपादनात समझोत्यामध्ये मिळणेसही वाव होता. उर्वरित रक्कम त्यांना अदा करावी. मात्र सदर प्रकरणांचा निपटारा २०/०७/२००७ पावेतो व्हावा. अन्यत प्रस्तुत व्यवहाराचे प्रसिध्दी अथवा इतर कार्यवाही होईल. मग त्यामध्ये समझोता करता येणार नाही असेही श्रीमती शेळके यांचे प्रतिनिर्धीनी सूचित केले आहे.

१) टिपणीचे सुरवातीस नमूद केलेप्रमाने तसेच सोबतचे खरेदी खताप्रमाणे क्षेत्र निश्चित पावेतो श्रीमती. शांताबाई ह. शेळके यांचेकडून विकत घेतलेले जमिनीचे रक्कम राखून ठेवले आहे. वर नमुद केलेप्रमाणे क्षेत्र निश्चित झाले आहे.मात्र खरेदी खताची उर्वरित रक्कम परत करावी. किंवा खरेदीखतात दुरुस्ती होऊन सदर क्षेत्र त्यांचे नांवे व्हावे असे त्यांचे म्हणणे आहे.

**अशा परिस्थितीत ....**

श्रीमती शांताबाई ह. शेळके यांना त्यांचे राखून ठेवलेली रक्कम रुपये ६ लाख अदाईचे संदर्भात विचारार्थ असा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. उपरोक्त विषयी सविस्तर चर्चा झाली श्रीमती शांताबाई ह. शेळके यांचेकडून खरेदीखतात नमुद केलेले क्षेत्राची ७ X १२ वर नोंद झालेली आहे. त्यानंतर सरकारी मोजणी झालेल्या आहेत. श्रीमती शेळके यांनी १) उर्वरित रक्कम रुपये ६ लाख देऊन व्यवहार पूर्ण करावा किंवा त्याऐवजी क्षेत्र परत मागितले आहे म्हणजेच तेवढयाच क्षेत्राचा ७ X १२ त्यांचे नांव खरेदी खतात दुरुस्ती करुन मिळावे. २० आर कमी मिळाले पण ७ X १२ वर संस्थानचे संपूर्ण क्षेत्र लागले परंतु त्यांना रुपये ६ लाख कमी मिळाले, व्यवहार अपूर्ण आहे. खरेदी खतात दुरुस्ती करून देऊन व्यवहार पूर्ण करावा असे त्यांचे म्हणणे आहे. १) मुळ खरेदी खतात रुपये ५० लाख ७० हजार आहे ते ४४ लाख ७० हजार समजण्यात यावे. २) मुळ खरेदीखतात एकुण १ हेक्टर ६९ आर आहे ते ०१ हेक्टर ४९ आर समजण्यात यावे व ७ X १२ सदरची तशी नोंद करून श्रीमती शेळके यांचे २० आर क्षेत्रास मालक कब्जेदार म्हणून नोंद करावी. खरेदीखत चतु:सिमा मध्ये दक्षिणेस श्रीमती शांताबाई शेळके यांचे सर्व्हे नं १४८/२ पैकी २० आर शेतजमीन असे खरेदीखत नोदांवे असे अर्जदाराचे म्हणणे आहे. त्याप्रमाणे ते लेखी मागणी देत आहेत.

श्रीमती शेळके यांचे मागणीचा विचार करता अशाप्रकारे त्यांना खरेदी खताने दुरुस्ती करुन देणेऐवजी व संस्थानचे नांवाने संपूर्ण ५ हेक्टर ३ आरचा ७ X १२ असणे अधिक योग्य आहे. खरेदी खतात त्यांचे म्हणणे प्रमाणे दुरुस्ती केल्यास त्यांचेकडून इतरांना जमिन विक्री करून संस्थानला सलग जमिन मिळणेस गुंतागुंत होऊ शकते. श्रीमती शेळके यांचेकडून प्राप्त झालेल्या विहीरीचे मालकी हक्कासह ५ हेक्टर ३ आर क्षेत्राचे खरेदी श्रीमती शेळके यांनी करून दिले आहे. त्यामुळे संस्थान मिळकतीचा F.S.I. देखील वाढत आहे. मो र.नं ३८०/१ दि.१०.०५.२००१ चा पोटहिस्सा मोजणीत ७X१२ क्षेत्राशी मेळ हिशोबी धरलेचे दिसून येते. मा.अध्यक्ष महोदय यांनीही जमीन मालकांशी चर्चा केलेली आहे. या सर्व बाबींचा साधक- बाधक विचार करून तसेच वकीलांचे चर्चा मार्गदर्शनाचा विचार करता श्रीमती शांताबाई ह. शेळके मागणीप्रमाणे त्यांना कमी पडलेले क्षेत्राची खरेदी खत दुरुस्त करून देणे ऐवजी रक्कम रुपये ६ लाख देणे व व्यवहार पूर्ण करणे योग्य राहील. अशी चर्चा होऊन उर्वरित रक्कम रुपये रुपये ६ लाख देण्याचे ठरले व त्यास मान्यता देण्यात आली.

तसेच श्री. हरिभाऊ त्रिबंक शेळके यांचे हयातीत त्यांनी संस्थानला सर्व्हे नं १०९ पैकी ७ हेक्टर १६ आर क्षेत्र विक्री केलेले आहे. त्याबाबत अतिक्रमित क्षेत्राचे ताब्यासाठी त्यांचे रक्कम रुपये ५०,०००/- संस्थानकडे जमा आहेत. व शेजारचे सर्व्हे नं ११३ व सर्व्हे नं १८९ चे मालक यांचेविरुध्द श्री. शेळके व संस्थान यांनी दावा (५४६/२०००) दाखल केला आहे. याबाबतही संस्थानचे ७ X १२ वर खरेदी संपूर्ण क्षेत्राची नोंद झालेली आहे. याचा विचार करता त्यांचे डिपॅाझीट रक्कम रुपये ५०,०००/- श्रीमती शांताबाई शेळके यांचे मागणीप्रमाणे दाव्यातील हक्कास बाधा न येता अदा करणेस मान्यता व सदर व्यवहार पुर्ण करणेस मान्यता देणेत आली. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५६ श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा रुग्णालयाकरीता सन २००७-२००८ या वर्षाकरीता लागणारे औषधे खरेदीबाबत....**

**निर्णय क्र.५११** श्री साईनाथ व साईबाबा रुग्णालयाचे दैनंदिन वापरासाठी सन २००७-२००८ या वर्षाकरीता लागणाऱ्या औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब व ब्लड बँक केमीकल्स, क्ष-किरण फिल्म्स, डेंटल मटेरीयल, त्वचा रोग विभाग, आयुर्वेदीक औषधे, कॅथलॅब ओ.टी., कार्डीयाक ओ.टी., सि.टी.स्कॅन इत्यादी खरेदीकामी प्रत्येक विभागाचे वैद्यकिय अधिकाऱ्यांची सभा दि. १४/०४/२००७ रोजी आयोजित करण्यात आली

होती. तसेच दि.१०/०३/२००७ चे परीपत्रकान्वये वॉर्ड / विभाग प्रमुख यांना एक वर्षासाठी लागणारी मागणी देणेबाबत कळविले होते.

सदर विभागांना गतवर्षाची मागणी केलेल्या औषधांचा तक्ता सादर करण्यात आला होता. त्यामध्ये ज्या औषधांची आवश्यकता आहे त्यांची मागणी केलेली आहे. तसेच काही औषधांची मागणी गतवर्षातील खपाचा अनुभव / शिल्लक असलेली मागणी केलेली नाही. तर काही डॉक्टरांनी सुचविल्याप्रमाणे नविन औषधे, साहित्य इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे अशा प्रकारे सर्व औषधांची मागणी कमी करुन व नविन औषधांचा यादीत समावेश करुन अंतिम तक्ता तयार करण्यात आला आहे त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | सन २००७-२००८ ची मागणी |
|---|---|---|
| १ | गोळया | २५,६२,४९७.०० |
| २ | इंजेक्शन व आय. व्ही. फ्ल्युडस् | १,८४,३३,८७१.९६ |
| ३ | लिक्विड ओरल्स् | ४,८०,७१६.०० |
| ४ | आय, एअर, व नोझल ड्राप्स | २,११,०५६.९० |
| ५ | लॅब केमीकल्स | ५९,०३,५१४.५१ |
| ६ | ब्लड बँक केमीकल्स | २२,४३,८७७.५९ |
| ७ | मायक्रोबायोलॉजी केमीकल्स व साहित्य | ५,८४,२०६.३८ |
| ८ | ओ.टी. आणि इतर मटेरीयल | १,११,०१,१८६.८७ |
| ९ | कॅटगट ॲन्ड सुचर्स (जनरल ओ. टी.) | ३८,१२,५३९.०७ |
| १० | कॅटगट ॲन्ड सुचर्स (कार्डीयाक ओ.टी.) | ४५,८०,३७२.५७ |
| ११ | डेंटल मटेरीयल | ४५,५४०.०० |
| १२ | मलम | १८,६३,२०२.९३ |
| १३ | क्ष-किरण फिल्म्स् | ३,१७,५७०.२५ |
| १४ | आयुर्वेदीक औषधे | ५,३५,२५३.८५ |
| १५ | कार्डीयाक ऑपरेशन थिएटरसाठीचे सर्जीकल साहित्य व परफ्युजीनीस्ट यांचे साहित्य | २,६९,८२,३६२.२२ |
| १६ | सि.टी. स्कॅन व एम.आर.आय.विभागासाठी लागणारे फिल्म्स व इतर साहित्य | १,३८,२०,०८१.०० |
| | **एकुण रक्कम रु. -** | **९,३४,७७,८४९.१०** |
| | **पुर्णांकित एकुण रक्कम रु. -** | **९,३४,७७,८४९.००** |

सदरची मागणी तयार करताना -

०१) दर वर्षी गेल्या तीन वर्षाचा खप यांची सरासरी करुन त्यावर २०% वाढ धरुन मागणी तयार करत असतो. परंतु साईबाबा रुग्णालय सुरु होऊन एक वर्ष झालेले आहे. शिवाय येथे रुग्णांची संख्या देखील दिवसेंदिवस वाढतच आहे. एक वर्षामध्ये झालेल्या औषधांचा खप विचारात धरुन नविन मागणी करण्यात आलेली आहे.

०२) श्री साईनाथ रुग्णालयातील अंतररुग्ण व बाहयरुग्णांची संख्या खालीलप्रमाणे आहे-

अ) सन २००४-२००५ बाहयरुग्ण संख्या - २४२७१७ अंतरुग्ण संख्या - ५३९९८

ब) सन २००५-२००६ बाहयरुग्ण संख्या - २४०७०० अंतरुग्ण संख्या - ५७७४६

क) सन २००६-२००७ बाहयरुग्ण संख्या - २४२७९८ अंतरुग्ण संख्या - ५६३९८

०३) उपरोक्त मागणीमध्ये दोन्ही रुग्णालयासाठी लागणारी इंजेक्शन, गोळ्या इत्यादीची एकत्रीत मागणी केलेली आहे. त्यामुळे यावर्षी औषधांच्या एकुण मागणीची रक्कम वाढवुन दिसत आहे.

०४) श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागासाठी लागणारे केमीकल्स याचा गतवर्षाचा झालेला खप व श्री साईबाबा रुग्णालयात वाढणारी संभाव्य रुग्णांची संख्या यांचा विचार करुन मागणी सुचवलेली आहे.

०५) श्री साईबाबा रुग्णालयात नविन कॅथलॅब ऑपरेशन थिएटर, कार्डीयाक ऑपरेशन थिएटर, आर्थोपेडीक, ऑप्थॅलमिक ऑपरेशन थिएटर तसेच सि.टी.स्कॅन, २-डि इको, डायलेसीस हे विभाग सुरु होऊन एक वर्ष झालेले आहेत. तेथे आतापर्यंत झालेल्या शस्त्रक्रियांचा / तपासण्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशिल | संख्या |
|---|---|---|
| १ | ॲन्जीओग्राफी | १०४२ |
| २ | ॲन्जीओप्लास्टी | २०६ |
| ३ | ह्दयशस्त्रक्रिया | २०४ |

| | | |
|---|---|---|
| ४ | हृदय व्हाल्वोप्लास्टी | १०१ |
| ५ | ऑप्थॅलमिक शस्त्रक्रिया | ३६३ |
| ६ | आर्थोपेडीक शस्त्रक्रिया | ४५६ |
| ७ | सि.टी.स्कॅन | ३३२८ |
| ८ | २ - डि इको | ८२५ |
| ९ | डायलेसीस | ५१७ |

श्री साईबाबा रुग्णालयात मे - २००६ पासुन मार्च - २००७ अखेर बाहयरुग्णांची संख्या ३०९५४ तर अंतरुग्ण रुग्णांची संख्या ३९८८ इतकी आहे.

ॲन्जीओग्राफी, ॲन्जीओप्लास्टी, हृदयशस्त्रक्रियांचे रुग्णांना लागणारे सर्जीकल साहित्य, औषधे इत्यादी संस्थानतर्फे ठरलेल्या पॅकेजमध्येच पुरवण्यात येतात त्यामध्ये प्रामुख्याने महागडी स्टेन्ट, बलून, डायग्नोस्टीक कॅथेटर, व्हाल्व, सुचर्स मटेरीयल, इंजेक्शन इत्यादींचा समावेश आहे.

०६) दोन्ही रुग्णालयामध्ये होणारी विविध प्रकारची शिबीरे, संस्थानतर्फे राबविले जाणारे इतर उपक्रम, रोडवरील अपघात इ. मुळे वाढणारी गर्दी (उदा. उत्सव, अध्यात्मीक शिबीरे, फिरते वैद्यकिय पथक, पालखी सोहळा)

०७) श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालय मिळून सात ऑपरेशन थिएटर कार्यान्वित आहेत. सदरचे थिएटरमध्ये होणाऱ्या विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया व त्यासाठी लागणारे सर्जीकल साहित्य इत्यादींचा विचार करण्यात आलेला आहे.

०८) सध्या औषध भांडारात शिल्लक असलेली औषधे व पेन्डींग असलेली ऑर्डर इत्यादींचा देखील औषधे मागणी करताना विचार करण्यात आला आहे.

०९) विविध प्रकारचे स्टेन्ट, व्हाल्व, डायग्नोस्टीक कॅथेटर्स, बलून, पेसमेकर इत्यादी महागडी साहित्य हि On Consignment Basis वर खरेदी करणेबाबत प्रस्तावीत केलेले आहे.

औषधांची रक्कम धरतांना गतवर्षातील मंजुर दराने संस्थानने औषधे खरेदी केलेले आहे ते दर केवळ हिशोबासाठी धरणेत आलेले आहे. प्रत्यक्षात निविदामध्ये प्राप्त होणारे दर ह्या पेक्षा वेगळे येण्याची शक्यता आहे. गतवर्षी दि. ३१/०३/२००७ अखेर औषधे खरेदीवर एकुण रु. ३,६७,२५,२५९/- इतका खर्च झालेला आहे.

औषधे त्वरीत उपलब्ध होणेचे दृष्टीने खालीलप्रमाणे पध्दत अवलंबविण्यात यावी असे नम्र मत आहे

१) औषधे खरेदीकामी दरवर्षीप्रमाणे वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन निविदा मागविण्यात याव्यात.

२) औषधे खरेदीकामी विक्रेत्याऐवजी थेट उत्पादक कंपन्यांना प्रथम प्राधान्य देऊन त्यांचेकडून औषधे घेण्यात यावीत. नामांकित कंपन्यांचे दर स्विकारण्यात यावेत.

३) दरपत्रक मागवितांना उत्पादक कंपन्यांची अट तशीच ठेऊन सर्व उत्पादक कंपन्याचे अधिकृत वितरक यांचेकडून वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात. तसेच थेट उत्पादक कंपन्यांना संस्थान खर्चाने पत्र पाठविण्यात येऊन त्यांचेकडून देखील दर मागवण्यात यावेत.

४) सर्वच निविदाधारकांना निविदा उघडणेचे वेळेस वाटाघाटीसाठी बोलविण्यात यावे. जे निविदाधारक वाटाघाटीसाठी हजर राहणार नाहीत त्यांचे मुळ निविदेतील दर अंतिम धरण्यात यावेत.

५) निवडलेल्या सर्व कंपन्यांचे दर सर्वच औषधांकरीता तुलनात्मक दरांसाठी विचारात घेण्यात यावीत परंतु त्यातील नामांकित कंपन्याचे दर स्विकारण्यात यावेत.

६) ज्या औषधांसाठी / साहित्यासाठी उत्पादक कंपन्यांचे दर येणार नाहीत, त्यासाठी विक्रेत्यांकडून प्राप्त झ ालेल्या दरांमध्ये नामांकित कंपन्यांचे दर स्विकारण्यात यावेत.

७) वाटाघाटीनंतरचा तुलनात्मक दरांचा तक्ता मा. व्यवस्थापन समितीपुढे ठेवून त्याच वेळी पुरवठा आदेश देणेबाबत निर्णय घेण्यात यावा.

८) मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरीक्त मागणी करण्याची आवश्यकता भासल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मा.व्यवस्थापन समितीचे मंजूर दराने खरेदी करण्यात यावी.

तरी मागणी नुसार औषधे, केमीकल्स, साहित्य, कार्डीयाक ऑपरेशन थिएटरसाठीचे सर्जीकल साहित्य व परफ्युजीनीस्ट यांचे साहित्य इत्यादी खरेदी करण्यास व रु. ९,३४,७७,८४९/- चे खर्चास व उपरोक्त प्रमाणे औषधे खरेदीची कार्यपध्दत अ.नं. १ ते ८ चे प्रस्तावास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर चर्चा होऊन सन २००७-०८ या वर्षाकरीता प्रस्तावित केलेली अंदाजे खर्च रु. ९,३४,७७,८४९/- चे खर्चास व सदरचे खरेदीकामी उपरोक्त १ ते ८ या कार्यपध्दतीस मान्यता देण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षक/वैद्यकीय संचालक)

नवीन प्रसादालय लवकरच का र्यान्वीत करावयाचे आहे. त्यासाठी आवश्यक असणारे किचन इक्वीपर्मेंट खरेदीकामी मा.श्री जयंत मुरलीधर ससाणे,अध्यक्ष, मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष, मा.श्री राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील, मा.श्री पांडुरंग गमाजी अभंग, मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव, मा.श्रीमती रिम्पल लोहिया, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर व मा.सौ.सुमित्रा कैलास कोते यांची समितीची सभा समिती दिनांक ०३.०७.२००७ रोजी शिर्डी येथे बोलविण्यात यावी असे ठरले.

वरील निर्णय क्र.४५० ते ५११ सर्वानुमते घेण्यात आले.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरित/-
(भाऊसाहेब रा.वाकचौरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी

स्वाक्षरित/-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी